CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, ३० जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू राष्ट्र म्हणजे केवळ धार्मिक संघटना नव्हे, तर ही एक जीवनपद्धती आहे. धर्म, संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रीयता यांचा समन्वय म्हणजे हिंदू राष्ट्र.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

## महत्त्वाचे

### औषधे, बांधकाम क्षेत्राने बाजाराला तारले



**मुंबई** : गेल्या काही सत्रातील मंदीनंतर बाजारात पुन्हा तेजी परतण्याचे संकेत मिळत आहेत. मंगळवारी देशांतर्गत बाजारात तेजीचा माहौल राहिला. निर्देशांक ४४७ अंकांनी वाढून ८१,३३८ वर बंद झाला, तर निफ्टीत १४० अंकांची वाढ झाली. औषधे आणि बांधकाम क्षेत्रातील शेअर्समध्ये चांगल्या खरेदीमुळे बाजाराचा नूर पालटला. केवळ हे दोनच नव्हे, तर जवळपास सर्वच क्षेत्रातील शेअर्स तेजीत राहिले. अमेरिका-भारत व्यापार चर्चेतील अनिश्चितता आणि १ ऑगस्टच्या टॅरिफ डेडलाईनच्या पृष्ठभूमीवर गुंतवणूकदार सध्या सावध आहेत. मात्र, दरम्यानच्या काळात काही शेअर्समुळे बाजारातील वातावरण सकारात्मक झाले आहे.

### टीसीएसने वेतनवाढ, भरतीही थांबवली

**नवी दिल्ली** : भारतातील सर्वात मोठी आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (टीसीएस) मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपातीच्या तयारीत आहे. कंपनी सहालाख कर्मचाऱ्यांमधून सुमारे दोन टक्के म्हणजेच १२ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करणार आहे. यासोबतच अनुभवी कर्मचाऱ्यांची भरती बंद केली असून, वार्षिक वेतनवाढही थांबविण्यात आली आहे. जागतिक मागणी कमी झाल्यामुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आयटी क्षेत्रातील अनेक नोकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. विश्लेषकांच्या मते, हा निर्णय इतर आयटी कंपन्याही अवलंबू शकतात.

### लवकरच फिंगरप्रिंटद्वारे यूपीआय पेमेंट

**नवी दिल्ली** : यूपीआय वापरकर्ते लवकरच चेहरा किंवा फिंगरप्रिंट वापरून पेमेंट करू शकतील. यूपीआय चालवणारी एजन्सी एनपीसीआय बायोमेट्रिक्सद्वारे पेमेंटची सुविधा देण्याची तयारी करत आहे. यानंतर, यूपीआय पेमेंट करण्यासाठी पिनची आवश्यकता पर्यायी होईल. बायोमेट्रिक पेमेंटमध्ये, ओळख फिंगरप्रिंट, फेस आयडी सारख्या अद्वितीय भौतिक वैशिष्ट्यांद्वारे केली जाईल.

# कोणत्याच नेत्याने युद्ध थांबवले नाही

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लोकसभेत घणाघात | काँग्रेसच्या तुष्टीकरणाने फोफावला दहशतवाद



**संसद पावसाळी अधिवेशन**



**नवी दिल्ली, २९ जुलै**

जगातील कोणत्याही नेत्याने पाकिस्तानसोबतचे युद्ध थांबवायला भारताला सांगितले नव्हते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी लोकसभेत स्पष्ट केले.

'ऑपरेशन सिंदूर'वर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होताना जवळपास दीड तासांच्या आपल्या घणाघाती भाषणात मोदी यांनी काँग्रेस पक्षाने केलेल्या सर्व आरोपांचा खरपूस समाचार घेतला. भारत-पाकिस्तान यांच्यात आपण युद्धबंदी घडवून आणली, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक वेळा केला होता. ट्रम्प यांचे नाव न घेता पहिल्यांदा मोदी यांनी त्यांचा दावा फेटाळून लावला.

९ मेच्या मध्यरात्री आणि १० मेच्या सकाळी आम्ही पाकिस्तानवर क्षेपणास्त्रांचा जोरदार मारा केला, त्यामुळे पाकिस्तानला शरणागती पत्कारावी लागली, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, त्यानंतर पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांनी भारताच्या लष्करी कारवाई महासंचालकांना दूरध्वनी करत युध्द थांबवण्याची विनंती केली. आम्हाला तुम्ही खूप मारले, आता मार खाण्याची आमची क्षमता संपली, आमच्यावरचे हल्ले थांबवा, असे ते कळवळून म्हणत होते.

आम्ही आमचे उद्दिष्ट पूर्ण केले. आता तुम्ही कुरापत काढली, तर त्याची भयंकर अशी किंमत तुम्हाला चुकवावी लागेल, असे आम्ही पहिल्याच दिवशी म्हटले होते, असे नमूद करत मोदी म्हणाले की, लष्कराशी चर्चा करत आम्ही आमची भूमिका ठरवली होती. अतिरेक्यांचे प्रशिक्षण तळ आणि अड्डे आम्हाला नष्ट करायचे होते, ते आम्ही केले.

१० मेला आम्ही युद्धबंदीची घोषणा केली, मात्र या घोषणेवरून मोठ्या प्रमाणात अपप्रचार करण्यात आला. जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला. पाकिस्तानमधूनही असाच अपप्रचार करण्यात आला. आपले लष्कर जे सांगते, त्यावर विश्वास न ठेवता देशातील काही लोकांनी पाकिस्तानची तळी उचलून धरण्याचा प्रयत्न केला. भारताची भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट असतानाही हा प्रयत्न झाला.

भारताचे प्रत्युत्तर अतिशय तगडे असते. याची जाणीव आता पाकिस्तानलाही झाली आहे. भविष्यात पुन्हा असे काही झाले तर भारत कोणत्याही थराला जाऊ शकतो, याची त्यांना खात्री पटली आहे. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर' थांबले नाही तर सुरूच आहे, असा निर्वाळा लोकशाहीच्या या सर्वोच्च मंदिरातून मी देऊ इच्छितो, असे मोदी यांना ठणकावून सांगितले. काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या धोरणामुळे देशात दहशतवाद फोफावल्याचा आरोप त्यांनी केला.

**हेच आमचे उत्तर, हीच हिंमत**

पाकिस्तान भारतावर मोठा हल्ला करणार आहे, असे अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनी मला दूरध्वनीवर सांगितले होते. पाकिस्तानने असे केल्यास त्याची मोठी किंमत चुकवावी लागेल. आम्ही त्याला जशास तसे प्रत्युत्तर देऊ. त्यांच्या गोळीला गोळ्यने उत्तर देऊ, असे मी तेव्हाच अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींना सांगितले होते. ही ९ मेची गोष्ट होती, त्यादिवशी रात्री आणि १० मेच्या सकाळी आम्ही पाकिस्तानच्या लष्करी तळावर जोरदार हल्ला करीत ते उद्ध्वस्त केल. हेच आमचे उत्तर होते, हीच आमची हिंमत होती.

पाकिस्तानने आता कोणतीही कुरापत काढण्याचा प्रयत्न केला तर त्याला ठोस प्रत्युत्तर दिले जाईल, याचा पुनरुच्चार करत मोदी म्हणाले की, आजचा भारत आत्मविश्वासाने भरलेला आहे, आत्मनिर्भरतेच्या मंत्रासह त्याची आगेकुच सुरु आहे. भारताची वाटचार आत्मनिर्बरतेकडे सुरु असली तरी काँग्रेस मात्र दिवसेंदिवस पाकिस्तानवर अवलंबून होत चालला आहे. (वृत्तसंस्था)

# खात्मा केलेले तीनही अतिरेकी पहलगाम हल्ल्यातील : अमित शाह



**नवी दिल्ली, २९ जुलै**

पहलगाम येथे अतिरेकी हल्ला घडवून आणणारे तीनही अतिरेकी सोमवारी सुरक्षा दलांच्या कारवाईत मारले गेल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी लोकसभेत दिली.

ऑपरेशन सिंदूरवर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत शाह म्हणाले की, पहलगाम येथे २६ निर्दोष नागरिकांची हत्या करणारे सुलेमान उर्फ फैसल, अफगाण आणि जिब्रान हे तीन कुख्यात अतिरेकी सुरक्षा दलांनी सोमवारी राबवलेल्या ऑपरेशन महादेवमध्ये मारले गेले. या तीन अतिरेक्यांबाबतची खात्री त्यांना आश्रय देणाऱ्यांकडून पटवून घेण्यात आली होती. या अतिरेक्यांना आश्रय आणि भोजन देणाऱ्यांना एनआयएने आधीच अटक केली होती. त्यांनी ठार झालेल्या या तीन अतिरेक्यांचा पहलगाम हल्ल्यात सहभाग असल्याची कबुली दिली होती. या अतिरेक्यांजवळ पाकिस्तानातील चॉकलेटही सापडले, अशी माहिती अमित शाह यांनी दिली. काँग्रेसचे पाकिस्तानप्रेम कधी लपून राहिले नाही, असा आरोप करीत शाह म्हणाले की, पहलगाम येथील हल्ल्यात सहभागी अतिरेकी पाकिस्तानचे नव्हते, असा दावा करत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री पी. चिदम्बरम् एकप्रकारे पाकिस्तानला क्लीन चिट देत आहे. ३७० कलम निष्प्रभ झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील हिंसाचारात तसेच दगडफेकीच्या घटनात घट झाल्याची आकडेवारी शाह यांनी यावेळी सादर केली. १९७१ च्या युद्धात भारताने ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांना यद्धबंदी बनवले होत,तसेच पाकिस्तानची १५ हजार वर्ग किमी जमीन आपल्या ताब्यात घेतली होती. त्यावेळी या युद्धकैद्यांना सोडतंना व्याप्त काश्मीर पाकिस्तानला मागितला असता, तर आज पाकिस्तानने भारतात अतिरेकी कारवाया करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नसता, याकडे शाह यांनी लक्ष वेधले. काँग्रेसच्या सरकारने भूतकाळात केलेल्या काही चुकांमुळे पाकिस्तान दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देत आहे.

# महिला बचत गटांसाठी १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल'

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**मुंबई, २९ जुलै**

ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या 'उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

योजनेसाठी एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील महिलांतील उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी सुरू झालेल्या स्वयं सहाय्यता समूहांच्या विविध उत्पादनांना स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठ मिळावी या उद्देशाने हे केंद्र उभारले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांमध्ये हे मॉल कार्यान्वित करण्यात येणार असून, नंतर टप्प्याटप्प्याने ही योजना इतर जिल्ह्यात विस्तारली जाणार आहे.

**गोंदिया-वाशीममध्ये विशेष न्यायालये**

महिला अत्याचाराची प्रकरणे गतीने निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशीम येथे विशेष न्यायालये स्थापन करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**वर्धेतील 'बोर', 'धाम' प्रकल्पांच्या नूतनीकरणासाठी ४२८ कोटी**

वर्धा जिल्ह्यातील दोन महत्त्वपूर्ण सिंचन प्रकल्प-बोर मोठा प्रकल्प (ता. सेलू) आणि धाम मध्यम प्रकल्प (ता. आर्वी) यांच्या नूतनीकरणासाठी सुमारे ४२८ कोटी ९६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बोर मोठा प्रकल्पासाठी २३१.६९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. हा प्रकल्प वर्धा नदीवर १९६७ मध्ये बांधण्यात आला आहे. यामुळे सुमारे १६ हजार १९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. त्याचा सेलू व समुद्रपूर तालुक्यातील ७७ गावांना सिंचन लाभ होतो. धाम मध्यम प्रकल्पासाठी १९७.२७ कोटी मंजूर करण्यात आले. धाम प्रकल्पाचे बांधकाम १९८६ मध्ये पूर्ण झाले असून जुने कालवे, वितरिका, लघुकालवे आता जीर्ण अवस्थेत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# 'प्रलय' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

### राजनाथसिंह यांनी केले कौतुक



**बालासोर, २९ जुलै**

पारंपरिक युद्धसामग्री वाहून नेण्यास सक्षम असलेल्या स्वदेशी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित सामरिक क्षेपणास्त्र प्रलयची यशस्वी चाचणी सोमवारी ओडिशातील एपीजे अब्दुल कलाम बेटावरून घेण्यात आली, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

प्रलय हे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे कमी पल्ल्याचे क्षेपणास्त्र आहे. ते ५०० ते १००० किलोंची स्फोटके वाहून नेऊ शकते. पारंपरिक युद्धसामग्री वाहून नेण्यास सक्षम असलेले हे क्षेपणास्त्र संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात् डीआरडीओने विकसित केले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले हे क्षेपणास्त्र शत्रूच्या धोक्यांविरुद्ध सशस्त्र दलांना अधिक तांत्रिकदृष्ट्या बळकटी देईल, असे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी यशस्वी उड्डाण चाचण्यांसाठी डीआरडीओ, सशस्त्र दल आणि प्रकल्पात सहभागी संबंधित उद्योग भागीदारांचे कौतुक करताना सांगितले.

क्षेपणास्त्र प्रणालींची कमाल आणि किमान पल्ल्याच्या क्षमतेचे प्रमाणीकरण करण्यासाठी मूल्यांकन चाचण्यांचा एक भाग म्हणून या उड्डाण चाचण्या घेण्यात आल्या. या क्षेपणास्त्रांनी अचूकपणे अपेक्षित मार्गक्रमण केले आणि सर्व चाचणी उद्दिष्टे पूर्ण करीत अचूकपणे लक्ष्यभेद केला, असे संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले.

सर्व उपप्रणालींनी अपेक्षेनुसार कामगिरी केली. त्याची पडताळणी एकात्मिक चाचणी श्रेणीद्वारे तैनात केलेल्या विविध मागोवा घेणाऱ्या संवेदकांनी मिळवलेल्या माहितीच्या आधारावर करण्यात आली. यात क्षेपणास्त्र धडकणार होते, त्या ठिकाणाजवळ जहाजावर तैनात केलेल्या एका उपकरणाचाही समावेश होता.

**स्वदेशी बनावटीचे क्वासी क्षेपणास्त्र**

प्रलय हे स्वदेशी बनावटीचे घन प्रणोदन क्वासी-बॅलेस्टिक क्षेपणास्त्र आहे, जे अचूकता सुनिश्चित करण्यासाठी अत्याधुनिक मार्गदर्शन आणि नेव्हिगेशनचा वापर करते, असे मंत्रालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# मोठ्या प्रमाणात मतदारांना वगळल्यास हस्तक्षेप

### सर्वोच्च न्यायालयाची पुनरीक्षण प्रकरणी भूमिका



**नवी दिल्ली, २९ जुलै**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी म्हटले की, निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे आणि ती कायद्यानुसार काम करते असे मानले जाते. परंतु, बिहारमध्ये मतदार यादीच्या पुनरीक्षणात (एसआयआर) मोठ्या प्रमाणात मतदार वगळले गेले, तर न्यायालय हस्तक्षेप करेल.

न्या. सूर्यकांत आणि न्या. जयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने बिहारमध्ये निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीला आव्हान देणाऱ्या याचिकांवर विचार करण्यासाठी एक कालमर्यादा निश्चित केली आणि सांगितले की, या मुद्यावर १२ आणि १३ ऑगस्ट रोजी सुनावणी होईल. याचिकाकर्त्यांकडून उपस्थित असलेले ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल आणि प्रशांत भूषण यांनी पुन्हा एकदा आरोप केला की आयोगाद्वारे १ ऑगस्ट रोजी प्रकाशित होणाऱ्या मसुदा यादीतून लोकांना वगळले जात आहे आणि ते त्यांचा मतदानाचा महत्त्वाचा अधिकार गमावतील. भूषण म्हणाले, निवडणूक आयोगाने एक निवेदन जारी केले आहे की एसआयआर प्रक्रियेदरम्यान ६५ लाख लोकांनी गणना अर्ज सादर केलेले नाहीत. कारण, ते एक तर मृत आहेत किंवा कायमचे इतरत्र स्थलांतरित झाले आहेत. त्यांनी असे सादर केले की या लोकांना यादीत समाविष्ट करण्यासाठी पुन्हा अर्ज करावा लागेल.

न्या. सूर्यकांत म्हणाले, निवडणूक आयोग, एक संवैधानिक असल्याने, कायद्यानुसार कार्य करतो असे मानले जाते. काही चुकीचे कृत्य झाले तर तुम्ही निदर्शनास आणा. आम्ही तुमचे ऐकू.

न्या. बागची यांनी भूषण यांना सांगितले, तुमची भीती अशी आहे की ६५ लाख मतदार मसुदा यादीत समाविष्ट होणार नाहीत. (वृत्तसंस्था)

# खर्गे-नड्डा यांच्यात बाचाबाची

**नवी दिल्ली, २९ जुलै**

खर्गे यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांच्यावर आरोप करताच भाजपा सदस्य त्याचा विरोध करीत होते. खर्गे आणि सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा यांच्यात बाचाबाचीही झाली.

खर्गे आपल्या पदाला आणि प्रतिष्ठेला साजेसे बोलत नाही, त्यामुळे त्यांचे शब्द कामकाजातून काढून टाकण्याची मागणी नड्डा यांनी केली. ते वरिष्ठ नेते आहेत, पण त्यांनी ज्या पद्धतीने मोदी यांच्यावर टीका केली, त्यांचे दु:ख मी समजू शकतो, असा टोला मारत नड्डा म्हणाले की, त्यांनी (मोदी) त्यांना ( काँग्रेस) गेल्या ११ वर्षांपासून विरोधात बसवले आहे. याचा आम्हाला अभिमान वाटला पाहिजे. पण, तुम्ही तुमच्या पक्षकामात एवढे व्यस्त झाला आहात की, राष्ट्राचा मुद्दा तुमच्या दृष्टीने गौण ठरतो. आपला मेंटल बॅलन्स गमावल्यानंतर तुम्ही पंतप्रधान मोदी यांच्याविरुद्ध असांसदीय शब्दांचा वापर करता. सभागृहातील गोंधळ पाहून नड्डा म्हणाले की, मी माझे शब्द मागे घेतो. मानसिक असंतुलन नाही, भावनावेग, असे कामकाजात घ्या. मी आधी बोललो ते कामकाजातून काढून टाका.

### अजित पवारांकडून कोकाटेंना समज

**मुंबई** : सभागृहात रमी खेळतानांची चित्रफीत प्रसारित झाल्याने वादात अडकलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. ३० मिनिटे दोन्ही नेत्यांत चर्चा झाली. यापुढे कुठलीही चूक माफ केली जाणार नाही, अशी तंबी पवार यांनी दिली

# राजकीय इच्छाशक्तीचा केंद्र सरकारजवळ अभाव : राहुल गांधी



**नवी दिल्ली, २९ जुलै**

लष्कराला कारवाईसाठी पूर्णपणे मोकळीक देणे आवश्यक असते, त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे, पण मोदी सरकारजवळ राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी केला. ऑपरेशन सिंदूरवर लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होत गांधी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर सुरू होताच तुम्ही युद्धबंदी मान्य केली.

इंदिरा गांधींच्या ५० टक्केही राजकीय साहस तुमच्यात असेल, तर युद्धबंदीबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जे बोलत आहे, ते खोटे असल्याचे तुम्ही सभागृहात सांगा. देश, तुमचे राजकारण, प्रतिमा आणि जनसंपर्क यापेक्षा मोठा आहे. आम्ही जेव्हा लष्कराच्या लोकांना भेटतो, तेव्हा समजते की ते खरे वाघ आहे, आणि वाघांना पूर्ण मोकळीक द्यायची असते. १९७१ च्या युद्धात इंदिरा गांधींनी अमेरिकेचा दबाव झुगारला होता. पाकिस्तानच्या एक लाख सैनिकांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले होते. फिल्डमार्शल सॅम माणेकशा यांचा उल्लेख सोमवारी करण्यात आला, माणेकशा यांनी तेव्हा पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींना म्हटले की, आम्ही आता लढाई सुरू करू शकत नाही, तयारीसाठी आम्हाला एक वर्षाचा वेळ पाहिजे आणि इंदिरा गांधींनी त्यांचे म्हणणे मान्य करत त्यांना वेळ दिला, असे गांधी यांनी स्पष्ट केले. लढणाऱ्या सैनिकांचे, वैमानिकांचे हातपाय तुम्ही बांधून टाकले, असा आरोप करत गांधी म्हणाले की, ३० मिनिटांत तुम्ही पाकिस्तानसमोर शरणागती पत्करली. पाकिस्तानविरुद्ध लढण्याची इच्छाशक्तीच तुमच्याजवळ नव्हती. ऑपरेशन सिंदूर सुरू होण्याच्या आधी सगळ्या विरोधी पक्षांनी आम्ही सरकारसोबत, देशाच्या लष्करासोबत असल्याचे सांगितले होते, आम्ही सरकारच्या पाठिशी होतो, पण भाजपाचे काही नेतेच उलटसुलट बोलत होते. मात्र, आम्ही काही बोललो नाही. विरोधी पक्ष म्हणून देशाबाबत आमचे जे कर्तव्य होते, ते आम्ही पार पाडले,असे ते म्हणाले.



## महत्त्वाचे...



### डॉ. कलाम प्रेरणा पुरस्काराने इंद्रजीत पाटील सन्मानित

**बार्शी, दि.२९ जुलै-**

भारतरत्न, माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून साहित्यिक इंद्रजीत पाटील यांना सन्मानित करण्यात आले. डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार त्यांना त्यांच्या एकूण साहित्यिक कामगिरीविषयी देण्यात आला. ड्रीम फाऊंडेशन, सोलापूर या संस्थेने या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर, पोलीस आयुक्त एम.राजकुमार, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, सहा.आयुक्त, अध्यक्ष, सेवा फाऊंडेशनचे प्रकाश राठोड, म्हाडाचे वित्त नियंत्रक अजयसिंह पवार, प्रा.व्यंकटेश गंभीर, प्रकाश राठोड, एम.के.फाऊंडेशनचे संस्थापक एम.के.कोगनुरे, प्रा.व्ही.एस.अंकलकोटे-पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, मानाचा फेटा, पुस्तके व रोप असे पुरस्काराचे स्वरुप होते. ड्रीम फाऊंडेशनचे सर्वेसर्वा काशिनाथ भतगुणकी, समन्वयक संगिता पाटील, भतगुणकी व त्यांचे कार्यकर्ते यांनी या सोहळ्याचे उत्तम नियोजन केले होते. हा पुरस्कार विशेषतः जीवनाचा उपासक-कर्मवीर लोहोकरे गुरुजी या चरित्रग्रंथासाठीच देण्यात आला. हा पुरस्कार व्दारकाधीश मंदिर,जलाराम मार्ग, विजापूर रोड या ठिकाणी इंद्रजीत पाटील यांना प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील या हरहुन्नरी साहित्यिकाची साहित्य क्षेत्रातील कामगिरी पाहून पंडितराव लोहोकरे, माधवराव कुतवळ, प्रकाश सकुंडे गुरुजी, चंद्रकांत पाटील, संजय भड, अमोल देशमुख, जीवराज गरड यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप

**बार्शी, दि.२९ जुलै-**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शहर बार्शी यांच्यावतीने कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी येथे रुग्णांना फळे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमावेळी माजी मंत्री तथा आमदार दिलीपराव सोपल, शहर प्रमुख दिनेश नाळे, विधानसभा प्रमुख सचिन चव्हाण, शहर संघटक आनंद चांदणे, शहर उपप्रमुख कुणाल नरके, युवा नेते करण राजपूत, भैया बाफना, विभाग प्रमुख प्रवीण गाढवे, अरविंद जाधव, विशाल तोडकरी, रुपेश गलांडे, नितीन भोसले तसेच शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एक असताना दुसरी घरात आणली; जाब विचारल्याने पत्नीवर चाकूने हल्ला

**सोलापूर, दि.२९ जुलै-**

घरात पत्नी असताना दुसरी स्त्री घरात आणल्याचा जाब विचारणा-यावर पत्नीवर पतीने चाकूने हल्ला केला. हा प्रकार अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगरात सोमवारी रात्री १२.३० वाजता घडला. कावेरी टिपू भोसले (वय २७, रा. मल्लिकार्जुन नगर,



सोलापूर) असे हल्ला झालेल्या विवाहितेचे नाव आहे. सोमवारी रात्री कावेरी या त्यांच्या पतीसोबतच्या राहत्या घरात असताना , पती टिपू याने घरात दुस-या स्त्रीला आणले. ही बाब लक्षात येताच, कावेरीने टिपूला त्याबाबतचा जाब विचारला. यावेळी चिडलेल्या टिपूने तु कोण विचारणार असे म्हणून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून चाकूने हल्ला केला. त्यानंतर लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने कावेरी या मंगळवारी सकाळी ८.३० च्या सुमारास रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### वाहतूक पोलिसांची दररोज पाच चौकात नाकाबंदी आठवड्यात तीन दिवस पायी गस्त

**सोलापूर, दि.२९ जुलै-**

मद्यपान करून शहरात विनाकारण रात्रीच्यावेळी वाहनांवरून हुल्लडबाजी करणाऱ्या बेशिस्तांवर कारवाई करण्याच्या हेतूने आठड्यातील तीन दिवस शहरातील प्रमुख पाच चौकांमध्ये पोलिसांची नाकाबंदी असणार आहे. याशिवाय शहरातील सात पोलिस ठाण्याच्या हद्दीत दर आठवड्यात तीन दिवस अधिकाऱ्यांसह अंमलदारांची पायी गस्त असणार आहे. सोलापूर शहरातील मधला मारुती, विजापूर रोड, ७० फूट रोड, सात रस्ता, कन्ना चौक, नई जिंदगी, छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी आठवड्यातील कोणत्याही तीन दिवशी अचानक नाकाबंदी केली जाणार आहे. त्यावेळी वाहतूक पोलिस अधिकारी, अंमलदार आणि स्थानिक पोलिस व मुख्यालयाचे अंमलदार, असे एकूण दोन अधिकारी व २० अंमलदार एका नाकाबंदीच्या ठिकाणी असतात. मद्यपान करून वाहन चालविणे, हुल्लडबाजी करत घराबाहेर फिरणे अशा वाहनधारकांवर कारवाई केली जाते. रेकॉर्डवरील गुन्हेगार, चोरीच्या दुचाकींचाही शोध घेतला जात आहे. नाकाबंदीवेळी अचानकपणे पोलिस आयुक्त एम. राजकुमार किंवा अन्य पोलिस उपायुक्त भेट देऊन पाहणी करतील, असे नियोजन करण्यात आले आहे. १ जुलैपासून त्यानुसार काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.







# शंकरनगर येथे हजारो महिलांनी लूटला पारंपारिक खेळाचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२९ जुलै-**

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने ट्रस्टचे अध्यक्ष व ग्रामीण संस्कृतीचे जोपासक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२८ व २९ जूलै २०२५ रोजी शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिर परिसरात आयोजित केलेल्या नागपंचमी सण सोहळ्यात दोन दिवसांत ५० हजारांपेक्षा अधिक मुली व महीलांनी पारंपारीक खेळाचा आनंद लुटला.

या सोहळ्यात सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, सुमित्रादेवी खानविलकर, आयोजिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, शिवांशिका मोहिते-पाटील, ईशिता मोहिते पाटील, कु. कृष्णप्रिया मोहिते पाटील यांनीही सहभाग घेऊन उपस्थित महिलांना प्रोत्साहन दिले. या वेळी बोलताना स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, महिलांना पारंपारिक खेळाचा आनंद मिळावा, आपली संस्कृती जोपासावी यासाठी सदरच्या सोहळ्याचे आयोजन केले आहे. महिला, मुलींनी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन पारंपारिक खेळाचा मनमुराद आनंद लुटला व भव्य स्वरूपात हा सोहळा साजरा झाला. नागपंचमी सण सोहळ्यात महिलांनी झोका, फेर, फुगडी, झिम्मा, पिंगा, काठवठकणा यासह विवीध पारंपारिक खेळ खेळले. मंदिर परिसरात २५ हजार स्क्वेअर फुटाचा वॉटरप्रूफ मंडप उभारला होता. परिसरात वारुळ, झोके, यासह महिलांना फोटो काढण्यासाठी सेल्फी पॉईंट तयार केले होते. यामध्ये बुरुज व घोडे, बैलगाडी, ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणारी घरे आदींना महिलांनी दाद दिली. अल्प दरातील खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि नाच ग घुमा, पोरी पिंगा, गवर मंदी गवर बाई, शिव शंभूचा हार गळ्यातील, वारुळाला पुजु या अशा ग्रामीण व पारंपारीक गीतांनी परिसर आल्हाददायक व आनंददायी झाला होता. येथे उभारण्यात आलेली दहीहंडी देखील महिलांनी थर लावून जल्लोषात फोडली. परिसरात पारंपारिक सणाचे वातावरण तयार झाले होते. यावेळी महिलांनी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती.



> आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात नवीन पिढीतील मुलींना भारतीय संस्कृती, सण व पारंपारीक खेळांची ओळख व्हावी. या साठी सोहळ्याचे आयोजन केले आहे. येथून पुढे दरवर्षी नागपंचमी सणानिमित्त हा सोहळा शिवपार्वती मंदिर शंकरनगर येथे साजरा होणार आहे.
>
> **- जयसिंह मोहिते पाटील**
> (अध्यक्ष, महाशिवरात्र यात्रा समिती, शंकरनगर)

# सोलापूर पोस्ट विभागात २ ऑगस्ट रोजी कामकाज बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

डिजिटल उत्कृष्टतेच्या आणि राष्ट्रनिर्माणाच्या प्रवासातील एक मोठी झेप म्हणून सोलापूर पोस्ट विभाग अंतर्गत आयटी २.0 ची नवीन कार्यप्रणाली आता कार्यान्वित केली जात आहे. दरम्यान, या परिवर्तनात्मक उपक्रमाचा भाग म्हणून, सुधारित प्रणाली सोलापूर विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये ४ ऑगस्ट २०२५ पासून लागू केली जाणार आहे.

या प्रगत डिजिटल प्लॅटफॉर्मकडे सुरळीत व सुरक्षित संक्रमण सुनिश्चित करण्यासाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी नियोजित वेळापत्रकानुसार कामकाज थांबविण्यात येईल. २ ऑगस्ट २०२५ रोजी कोणतेही सार्वजनिक व्यवहार टपाल कार्यालयांमध्ये केली जाणार नाहीत. ही तात्पुरती सेवा स्थगिती डेटा स्थलांतर प्रणाली पडताळणी आणि कॉन्फिगरेशन प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे. जेणकरून नवीन प्रणाली यशस्वीरित्या आणि सुरळितपणे कार्यान्वित होईल. Advance Portal Technology रोलआउट वापरकर्त्यासाठी सुलभ अनुभव, जलद सेवा आणि अधिक ग्राहकाभिमुख इंटरफेस देण्यासाठी डिझाइन करण्याता आला आहे. ज्यामुळे आमच्या कार्यक्षम, स्मार्ट आणि भविष्यकालीन टपाल सेवांसाठीच्या कटिबध्दतेचे प्रतिबिंब दिसून येते. ही सेवा डिजिटलदृष्ट्या सक्षम सेवसाठीच उचचली जात आहे, असे सोलापूर विभागाचे डाकघर प्रवर अधिक्षक यांनी कळविले आहे.

# जिल्ह्यातील साडेतेरा हजार दिव्यांगांना मिळणार २१ प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेच्या सहकार्याने राबविण्यात आलेले 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' हे केवळ एक वैद्यकीय प्रमाणपत्र मोहिम नव्हे, तर दिव्यांग व्यक्तींच्या आत्मसन्मानाचा, सक्षमीकरणाचा आणि त्यांच्या सामाजिक समावेशाचा क्रांतिकारी प्रयत्न आहे. या मोहिमेने सोलापूर जिल्ह्यातील हजारो लाभार्थ्यांना २१ प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा करून दिला. दिव्यांगात्व हे अपंगत्व नव्हे तर समाजाचा आधारस्तंभ ठरेल याची खात्री आहे.



मोहिमेचे उद्दिष्ट व पार्श्वभूमीवर दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राची अडचण लक्षात घेऊन 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान'ची रूपरेषा तयार करण्यात आली.- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार २१ प्रकारच्या दिव्यांगासाठी प्रमाणपत्र अनिवार्य असून केंद्र शासनाची स्वावलंबन प्रणाली (UDID कार्ड) यासाठी वापरण्यात येते. सोलापूर जिल्ह्यातील हजारो दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात ही मोहीम राबवण्यात आली.

### प्राथमिक तपासणी व शिबिरांची रचना

तपासणी कालावधी: १९ ऑगस्ट ते २६ सप्टेंबर २०२४,- एकूण शिबिरे: २५, प्राथमिक तपासणी लाभार्थी: १८,४२१ दिव्यांग व्यक्ती, प्रमाणपत्र वितरण: पात्र १३,५२१ लाभार्थ्यांना ९0 दिवसांत घरपोच प्रमाणपत्र, मानसिक तपासणी व बौधिक अक्षम बालकांचे निरीक्षण, दुसरा टप्पा: समग्र शिक्षेच्या अंतर्गत ११ तालुक्यातील १,0१0 बौधिक अक्षम बालकांसाठी तपासणी ठिकाणे: ब्लॉक व क्लस्टर स्तरावर ४३ ठिकाणी मानसशास्त्रज्ञांमार्फत तपासणी

### प्रशिक्षण व समन्वय कार्यशाळा.

जिल्ह्यात हे अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. अभियानाच्या प्रारंभी १६ कार्यशाळांमधून ३,७४२ व्यक्तींना प्रशिक्षण दिले गेले.- सहभागी घटक: आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी, पालक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, सामाजिक संस्था इत्यादी घरपोच लाभ आणि माहितीपत्रके, प्रमाणपत्रासोबत दिलेले साहित्य, णऊखऊ कार्ड, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, विविध शासकीय योजनांची माहिती, दिव्यांग हक्क अधिनियमाची माहिती, शुभेच्छा पत्र, अभिप्रायासाठी पोस्टकार्ड (स्पीड पोस्टद्वारे).

# अल्पवयीनवर अत्याचार; आरोपीस दहा वर्षांचा कारावास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ जुलै-**

बार्शी-लातूर रोडवरील बार्शी शहर हद्दीत दि. २८ मे २०२२ रोजी झालेल्या अल्पवयीन पीडितेवरील अत्याचारप्रकरणात आरोपी संदिप मोहन लंकेश्वर (वय-३२ रा.बार्शी) यास जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमआदित्य मांडे यांनी दहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

बार्शी शहर पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्ह्याची हकीकत अशी, बार्शी-लातूर रोडवरील बार्शी शहर हद्दीत दि. २८ मे २२ रोजी रात्री १-१0 वा. चे सुमारास आरोपी संदिप मोहन लंकेश्वर (वय ३२ वर्षे), रा. बार्शी याने यातील पिडीतेवार अत्चार केला. पिडीता तिच्या मित्रासह ओढयाच्या कडेला बोलत बसली असताना आरोपी संदिप मोहन लंकेश्वर याने पीडीत मुलीच्या मित्रास ढकलुन दिले. पिडीता हिचे तोंड दाबुन अल्पवयीन असल्याचे माहीत असताना जबरदस्तीने शारीरीक संबंध केले व दमदाटी केली. घटनेनंतर आरोपी संदिप मोहन लंकेश्वर रा. बार्शी. याचे विरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण शिरसाट यांनी आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर आरोपीविरुद्ध सदर खटल्याच्या सुनावणी मध्ये पीडित मुलगी, फिर्यादी पीडित मुलीच्या मित्राची व डॉक्टर यांची साक्ष सरकार पक्षातर्फे सर्वात महत्वाची ठरली. सरकार पक्षाच्या वतीने एकूण १५ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच तपासादरम्यान गोळा केलेले पुरावे हे सरकारी वकील यांनी न्यायालयासमोर मांडले. सरकारी पक्षाचा पुरावा



याचा विचार करता जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमआदित्य मांडे यांनी आरोपी संदिप मोहन लंकेश्वर रा. बार्शी जिल्हा सोलापूर यास दोषी ठरवून पुढील प्रमाणे शिक्षा ठेवण्यात आली. भा.द.वि.क ३२३ अन्वये दोषी ठरवून एक वर्षाची कैद आणि रुपये १,000/- (रुपये एक हजार फक्त) दंड ठोठावण्यात आला व दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीस एक महिन्याची साधी कैद अशी शिक्षा. भा.द.वि.क ३७६ अंतर्गत शिक्षा पात्र गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात येते आणि त्यास १0 (दहा) वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

तसेच रुपये ५,000/- (रुपये पाच हजार फक्त) दंड ठोठावण्यात येतो; दंड न भरल्यास त्यास तीन महिन्यांची साधी कैद अशी शिक्षा देण्यात आली. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. दिनेश देशमुख व ॲड. प्रदीप बोचरे यांनी काम पाहिले. सदर केसमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस नाईक गणेश ताकभाते यांनी काम पाहिले.

# नाना काळेंसह पाचजणांना अटकपूर्व जामीन

### ओंकार हजारे आत्महत्या प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

ओंकार हजारे याचा मृत्यू अति मद्यपानामुळेच झाला असून त्यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी माजी उपमहापौर नाना काळे यांच्यासह पाचजणांविरुध्दचा खटला गैरसमजुतीतून दाखल झाल्याचा अहवाल पोलिसांनी न्यायालयात दाखल केला आहे. त्यामुळे प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी नाना काळेसह पाचजणांना कोणतीही अट न घालता अटकपूर्व जामीन मंजूर केला.

मयत ओंकार याचे स्वाती हिचे सोबत प्रेम संबंध होते. त्या दोघांनी आळंदी येथे जाऊन प्रेमविवाह केला होता. त्यामुळे स्वाती हिच्या घरच्यांना ओंकार याच्याबद्दल राग होता, त्यामुळे ते दोघे लग्नानंतर पुणे येथे राहत होते. पुणे येथे राहत असताना ओंकार हा कार भाड्याने चालवत होता. दोघात भांडणे झाली होती. त्यामुळे स्वाती ही तिच्या आई-वडिलांकडे आली होती. स्वाती हिने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोट मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. अर्ज दाखल केल्यानंतर नाना काळे व इतरांनी मयत ओंकार यास स्वाती हिस घटस्फोट देण्यासाठी धमकावत होते. मे २०२५ मध्ये मयत ओंकार याने त्याच्या मोबाईल मध्ये स्टेटस ठेवून माझा घातपात झाल्यास नाना काळे त्याची पत्नी, तिचे आई वडील व भाऊ यांना जबाबदार धरावे असे स्टेटस ठेवले होते. मयत ओंकार हा त्याचा मेव्हणा मंगेश याच्या लग्नासाठी गेला असता, त्याचे सासऱ्यांनी अपमान करून शिवीगाळ करून लग्नातून हाकलून दिले होते. सततच्या त्रासाला कंटाळून ८ जून २०२५ रोजी रोजी ओंकार याने आत्महत्या केली म्हणून मयत ओंकार याचा भाऊ विशाल महादेव हजारे याने दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या गुन्ह्यात अटक होऊ नये म्हणून नाना काळे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. यावरील सुनावणी दरम्यान पोलिसांनी अर्जदार आरोपींना क्लीन चिट देत अती मद्यपाना मुळेच मयताचा मृत्यू झाला असून खटला गैरसमजुतीतून दाखल झाल्याचा अहवाल पोलिसांनी न्यायालयात दिला असल्याचे सांगितले.त्यामुळे अटकपूर्व जामीन कायम करण्यात यावा असा मुद्दा आरोपींच्या वकिलांनी मांडला.

त्यावरून न्यायालयाने कोणतीही अट न घालता अटकपूर्व जामीन कायम केला. यात सरकार तर्फे ॲड. ए. व्हि. नरखेडकर तर आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. राम कदम यांनी काम पाहिले.

# १ लाख ८० हजार शेतकऱ्यांनीच भरला पिकविमा

- आता अवघ्या २ दिवसांची मुदत; उर्वरित शेतकऱ्यांनी पिकविमा भरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सन २०२५-२६ च्या खरीप हंगामापासून महाराष्ट्रात सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, पूर्वीप्रमाणे विहीत केल्यानुसार, खरिपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेवून, उर्वरीत पीक हप्ता हा केंद्र व राज्य शासन मार्फत देण्यात येऊन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित, सुधारित पीक विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून १ लाख ३७ हजार ४७५ हेक्टरसाठी १ लाख ७९ हजार ५१५ शेतकऱ्यांनी पिकविमा भरला असून, आता पिकविमा भरण्यासाठी अवघे २ दिवस शिल्लक असल्याने उर्वरित शेतकऱ्यांनीही पिकविमा भरून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ यामुळे लागलेली नैसर्गिक आग, पूर, क्षेत्र जलमय होणे, भूस्खलन, अतिवृष्टी, दुष्काळ, पावसातील खंड, किड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पादनात येणारी घट. या बाबींचा विचार करुन सुधारित पीक विमा योजना खरीप व रब्बी हंगामाकरिता, केवळ खालील जोखमीच्या बाबींचा समावेश करुन राबविण्यात येईल.

महाराष्ट्र सरकारनं सुधारित पीक विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यानुसार शेतकऱ्यांना आता पीक विम्यासाठी खरिप हंगामात २ टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के योगदान आणि नगदी पिकांच्या विमा योजनेसाठी ५ टक्के योगदान दिलं आहे. महाराष्ट्रात प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात २०२३ पासून १ रुपयात पीक विमा योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेची अंमलबजावणी होत असताना गैरप्रकार समोर झाल्याचं समोर आल्यानंतर राज्य सरकारकडून पीक विमा योजनेत बदल करण्यात आला आहे. या योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यातील जिल्ह्यातून १ लाख ३७ हजार ४७५ हेक्टरसाठी १ लाख ७९ हजार ५१५ शेतकऱ्यांनी पिकविमा भरला असून, यामध्ये कर्जदार शेतकरी ३३ तर बिगर कर्जदार शेतकरी १ लाख ७९ हजार ५१५ जणांचा समावेश आहे. यामध्ये अक्कलकोट तालुक्यातून ४0 हजार ३२१ शेतकऱ्यांनी पिकविमा भरला आहे. तर बार्शी ५८१११, करमाळा १५७२८, माढा १३४९0, माळशिरस १४५0, मोहोळ ५२११, मंगळवेढा १४३६७, पंढरपूर ३३६, सांगोला ११२९६, उत्तर सोलापूर ९३५५, दक्षिण सोलापूर ९८४१ असा तालुकानिहाय शेतकऱ्यांनी पिकविमा भरला आहे.



# शेतकऱ्यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ जुलै-**

जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना देखील भेटून निवेदन दिले व चर्चा केली. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हमीभाव, आयात रद्द करणे, जीएसटी माफ करणे, विमा संरक्षण मिळणे अशा विविध मागण्यांबाबत मुख्यमंत्री फडणवीस व पालकमंत्री गोरे यांनी सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन दिले. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, कृषीनिष्ठ परिवाराचे नितीन बापू कापसे, लालासाहेब गव्हाणे, बाबासाहेब गायकवाड, रमेश भोईटे, योगेश जाधव, मदन गव्हाणे, खंडागळे, केदार पवार व द्राक्ष बागायतदार उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# युद्धबंदी करार नाकारल्यास संपूर्ण गाझावर ताबा

### बेंजामिन नेतान्याहू यांचा हमासला इशारा



◆ **जेरुस्लेम, २९ जुलै**

इस्रायलने गाझापट्टीतील दाट लोकवस्तीच्या तीन शहरांत कारवाई थांबविण्याचा निर्णय घेतला. उपासमारीच्या संकटामुळे हल्ले थांबविण्यात आल्याची माहिती सोमवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी दिली. त्याचवेळी त्यांनी हमासने युद्धबंदी करार नाकारल्यास संपूर्ण गाझा ताब्यात घेणार असल्याचा इशारा दिला.

नेतान्याहू यांनी जनतेला केलेल्या संबोधनात म्हटले की, आमच्या लष्कराने गाझातील तीन शहरांत हल्ले थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्या, यासाठी या भागांत कारवाई केली जाणार नाही. हमासने पुन्हा युद्धबंदी आणि ओलिसांच्या सुटकेच्या कराराचा प्रयत्न नाकारला, तर इस्रायल गाझापट्टीचा ताबा मिळवेल. कारवाई थांबविलेल्या भागांत मदत केंद्रे वाढविण्यात येईल आणि आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पाठविण्यात येणारी मदत त्या ठिकाणी पोहोचविण्याची परवानगी दिली आहे.

दरम्यान, नेतान्याहू यांनी काही मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मांडला, याला मंजुरी मिळाल्यानंतर त्यांनी संबोधनात गाझातील परिस्थितीवर भाष्य केले.

**मुलांसाठी अन्न केंद्रे निर्माण करणार**

ट्रम्प यांनी गाझातील बिघडत्या मानवतावादी परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आणि सांगितले की मुलांना त्वरित अन्न आणि सुरक्षा मिळायला हवी. आंतरराष्ट्रीय सहकार्याने गाझामध्ये मुलांसाठी अन्न केंद्रे स्थापन केली जातील. इतर देशांनी मदत करण्यासाठी पुढे यावे. या भागात उपासमारीचे मोठे संकट असून यामुळे मुलांचे मोठे हाल होत आहे आणि यासाठी हमास जबाबदार असल्याचे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

**अमेरिकेकडून ६० दशलक्ष डॉलर्सची मदत : ट्रम्प**

पंतप्रधान नेत्यान्याहू यांनी घेतलेल्या निर्णयाचे कौतुक करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिले की, गाझाच्या तीन शहरात हल्ले थांबविल्याने तेथे शांतता प्रस्थापित करणे शक्य होणार आहे. अमेरिका गाझात अन्न आणि पाण्यासाठी ६० दशलक्ष डॉलर्सची मदत देणार आहे. यापूर्वीदेखील आम्ही गाझात मदत पाठवली. हमासने त्यांच्या ताब्यात असलेल्या २० ओलिसांची तातडीने सुटका करावी. त्यांनी युद्धबंदी करार मोडल्यास त्यांचे अस्तित्व राहणार नाही. ■

# जाफर एक्स्प्रेसमध्ये बॉम्बस्फोट; ५ ठार, १० जखमी

### पेशावर येथून क्वेट्टाला जाताना घडली घटना, तीन डबे घसरले

◆ **क्वेट्टा, २९ जुलै**

पेशावर येथून बलुचिस्तानच्या क्वेट्टाला जाणारी जाफर एक्स्प्रेस शिकारपूर रेल्वे स्थानकावर असताना एका डब्यात अचानक बॉम्बस्फोट झाला. यात पाच प्रवाशांचा मृत्यू झाला असून, दहा जण जखमी आहे. स्फोटानंतर रेल्वेचे तीन डबे रुळावरून घसरले. अद्याप या स्फोटाची जबाबदारी कोणत्याही संघटनेने घेतलेली नाही. सिंध प्रशासन आणि पाकिस्तानच्या सुरक्षा दलाने घटनेची चौकशी सुरू केली आहे.

सुक्कुर रेल्वे विभागीय अधीक्षक जमशेद आलम यांनी सांगितले की, सोमवारी दुपारी पेशावर-क्वेट्टा जाफर एक्स्प्रेस सायंकाळी ५.३० वाजता शिकारपूर रेल्वे स्थानकावर पोहोचली. निघण्याच्या तयारी असताना अचानक रेल्वेच्या एका डब्यात बॉम्ब स्फोट झाला. यावेळी तीन डबे रुळावरून घसरले. बचाव पथकाने जखमींना सुक्कूर येथील रुग्णालयात पोहोचविले. मात्र, डॉक्टरांनी पाच जणांना मृत घोषित केले. दहा जखमींवर उपचार सुरू आहेत. प्राथमिक चौकशीत रेल्वे डब्यातील एका बॅगमध्ये बॉम्ब ठेवल्याचे समोर आले आहे. रेल्वे स्थानकार बहुतांश प्रवासी उतरले असल्याने जीवहानी कमी झाली. स्फोटाच्या घटनेनंतर या मार्गावरील रेल्वे वाहतूक आठ तास ठप्प होती. या घटनेचा तपास सुरू केला आहे, आतापर्यंत स्फोटाची जबाबदारी कोणत्याही अतिरेकी संघटनेने घेतलेली नाही.



**मार्च महिन्यात ट्रेनवर हल्ला**

११ मार्च रोजी, जाफर एक्स्प्रेस ट्रेनवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता आणि ४०० हून अधिक प्रवाशांना ओलीस ठेवले. त्यावेळी तीन दिवस चाललेल्या मोहिमेत सुरक्षा दलाने प्रवाशांची सुटका केली होती. बीएलएने हल्ल्याची जबाबदारी घेतली होती. या हल्ल्यात पाकिस्तान सैन्याचे शंभरपेक्षा अधिक सैनिक ठार झाल्याचा दावा बीएलएने केला होता. (वृत्तसंस्था)

# पाण्यावाचून पाकिस्तानची तडफड

**भारतासोबतचे वैर महागात**

◆ **नवी दिल्ली, २९ जुलै**

पाकिस्तानसाठी पाणी एक मोठे संकट बनून 'आ' वासून उभे आहे. सध्या तर हा देश पुराच्या हाहाकारात आहे. मात्र, भविष्यातील चित्र अतिशय भीषण आहे. ज्या पद्धतीने जलसंकट गडद होत आहे, ते पाहता आगामी काळात पाकिस्तान पाण्याच्या थेंबासाठीही तडफडणार, असे सांगितले जात आहे.

पाकिस्तानकडे पावसाचे पाणी साठवण्याची कोणतीही यंत्रणा नाही. दुसरीकडे, भारताने सिंधू नदीचे पाणी अडवल्याने त्याच्यासाठी स्थिती आणखीनच बिकट झाली आहे. पाकिस्तानी वृत्तपत्र 'डॉन'नुसार, काही वृत्त असे आले आहेत, ज्यात भविष्यात पाकिस्तानात पाण्याची स्थिती भयंकर होणार, असे म्हटले आहे.

पर्यावरण तज्ज्ञांनी सातत्याने इशारा दिला आहे की, दक्षिण आशियात पूर आणि दुष्काळाचे चक्र सुरूच राहणार आहे. अशा स्थितीत पुरेसा पाणीसाठा नसल्याने पाकिस्तानचा त्रास वाढणार हे निश्चितच मानले जात आहे.

वॉटर पॉवर्टी इंडेक्सनुसार, पाकिस्तान जगातील असा १५ वा देश आहे, जिथे पाण्याची टंचाई आहे. दुसरीकडे, इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रेशननुसार, २०३५ पर्यंत पाकिस्तान पाण्यासाठी तडफडणार आहे. वर्ल्ड वाइल्डलाईफ फंड-पाकिस्तानच्या अहवालानुसार, येथे पाण्याचा पातळी सातत्याने कमी होत आहे. १९४७ मध्ये पाकिस्तानकडे ५६०० क्युबिक मीटर पाण्याचा अंदाज होता. मात्र, २०२३ मध्ये तो घटून ९३० क्युबिक राहिला. संयुक्त राष्ट्राच्या फूड अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरल ऑर्गनायझेशननेही यासंदर्भात पाकिस्तानला इशारा दिला आहे. त्यांच्यानुसार, पाकिस्तानमधील पाणीटंचाई जगात सर्वाधिक अशी आहे. ही स्थिती अशी आहे की, आगामी काळात त्यांना जगणेही कठीण होऊन बसणार आहे.

भारताने सिंधू पाणी करार रद्द करून पाकिस्तानचे पाणी रोखले आहे. या करारामुळे पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाबच्या पाण्याचा अधिकार मिळत होता. त्यातून पाकिस्तानच्या ८० टक्के गरजा भागत होत्या. आता मात्र त्यातही वांधे झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# मॅनहॅटन शहरात गोळीबार, पोलिस अधिकाऱ्यासह पाच ठार

### घटनेनंतर हल्लेखोराची आत्महत्या, दोन नागरिक जखमी

◆ **न्यू यॉर्क, २९ जुलै**

येथील मिडटाऊन मॅनहॅटन येथे सोमवारी सायंकाळी एका बंदुकधाऱ्याने केलेल्या अंधाधुंद गोळीबारात एका पोलिस अधिकाऱ्यासह पाच जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी आहते. हल्लेखोराने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. शेन तामुरा असे हल्लेखोराचे नाव असून, तो लास वेगासचा रहिवासी आहे.

न्यू यॉर्कचे पोलिस आयुक्त जेसिका टिश यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, हल्लेखोर एका कारमधून उतरला आणि त्याने मॅनहॅटन परिसरातील पार्क अ‍ॅव्हेन्यू येथील इमारतीजवळ सोबत आणलेल्या बंदुकीने गोळीबार केला. यावेळी ड्युटीवर असलेले पोलिस अधिकारी दिदारुल इस्लाम यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. त्याने त्यांच्यावरही गोळी झाडली. यानंतर हल्लेखोर इमारतीच्या ३३ व्या मजल्यावर असलेल्या एका स्थावर मालमत्ता कंपनीच्या कार्यालयात गेला आणि सुरक्षा रक्षक आणि एका कर्मचाऱ्यावर गोळी झाडली.

यानंतर त्याने तेथेच स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. पोलिसांनी तातडीने जखमींनी रुग्णालयात दाखल केल. डॉक्टरांनी पोलिस अधिकाऱ्यांसह पाच जणांना मृत घोषित केले. दोघांवर उपचार सुरू आहे. प्राथमिक तपासात आरोपी मानसिक रुग्ण असल्याची माहिती मिळाली आहे. हल्लेखोराकडून एक रायफल, एक रिव्हॉल्वर, मॅगझिन आणि काडतुसे जप्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)



घटनास्थळावर तपास करताना पोलिस अधिकारी

### सीमापार शस्त्रास्त्र तस्करी करणारे मॉड्युल उद्ध्वस्त

◆ **चंदीगड, २९ जुलै**

पंजाब पोलिसांनी मंगळवारी सीमापार शस्त्र तस्करी करणारे मॉड्युल उद्ध्वस्त केले असल्याचा दावा केला आणि पाकिस्तानस्थित तस्कराच्या निर्देशाखाली काम करणाऱ्या एका गुन्हेगाराला अटक केली.

आरोपीने भारत-पाकिस्तान सीमेजवळून शस्त्रांचा एक माल जप्त केला होता आणि तो पोहोचवण्यासाठी जात असताना एका पोलिस पथकाने त्याला अडवले. गुप्तचर यंत्रणेच्या नेतृत्वाखालील एका मोठ्या कारवाईत, काउंटर इंटेलिजेंस, अमृतसरने सीमापार शस्त्र तस्करी करणारे मॉड्युल उघड केले आणि पाकिस्तानस्थित तस्कराच्या निर्देशाखाली काम करणाऱ्या एकाला अटक केली. त्याच्याकडून पाच पिस्तूल जप्त केल्या, असे पंजाबचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी 'एक्स'वर म्हटले. (वृत्तसंस्था)

# देशातील सर्वांत गरीब व्यक्ती सापडला?

### उत्पन्नाचा दाखला समोर येताच उडाली खळबळ

◆ **भोपाळ, २९ जुलै**

मध्यप्रदेशच्या एका शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा दाखला सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यात शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्न ३ रुपये नमूद करण्यात आले होते. उत्पन्नाचा दाखला व्हायरल झाला आणि सगळे जण शेतकऱ्याला देशातील सर्वांत गरीब माणूस म्हणू लागले. यानंतर जिल्हाधिकारी सक्रिय झाले. त्यांनी तातडीने स्पष्टीकरण दिले. लिपिकाकडून झालेल्या चुकीमुळे हा प्रकार घडल्याचे त्यांनी सांगितले. या सगळ्या प्रकारामुळे प्रशासनाची मात्र धांदल उडाली. विरोधकांनी सरकारला धारेवर धरले.

सतना जिल्ह्यातील कोठी तहसीलमधील नयागावात राहणारे रामस्वरूप यांना जारी करण्यात आलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याचा एक फोटो आठवडाभरापासून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यावर तहसीलदारांची स्वाक्षरीदेखील आहे. २२ जुलैला तहसीलदार सौरभ द्विवेदी यांनी स्वाक्षरी केलेला दाखला प्रचंड व्हायरल झाला. यानंतर अनेक इंटरनेट युझर्सनी रामस्वरूप यांना देशातील सर्वांत गरीब व्यक्ती म्हटले. रामस्वरूप यांची मासिक कमाई २५ पैसे असल्याचा उल्लेख दाखल्यामध्ये होता.

रामस्वरूप यांच्या उत्पन्नाचा दाखला सोशल मीडियावर बघता बघता व्हायरल झाला. जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी २५ जुलैला एक नवीन प्रमाणपत्र जारी केले. त्यात शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्न ३० हजार रुपये म्हणजेच मासिक उत्पन्न २५०० रुपये नमूद करण्यात आले. यानंतर तहसीलदार सौरभ द्विवेदी यांनी स्पष्टीकरण दिले. लिपिकाकडून चूक झाली होती. ती सुधारण्यात आली आहे. नवीन उत्पन्न दाखला जारी करण्यात आलेला आहे, अशी सारवासारव द्विवेदी यांच्याकडून करण्यात आली. (वृत्तसंस्था)



नागपंचमीनिमित्त बंगळुरू येथील महिलांनी मंगळवारी मंदिरात वासुकीची पूजा केली

## चित्रपट वार्ता


### खऱ्या जीवनात अबोल आहे तृप्ती

**मुंबई** : अभिनेत्री तृप्ती डिमरीने पहिल्या चित्रपटापासूनच प्रेक्षकांचे मन जिंकले. तिला चांगल्या चित्रपटांच्याही ऑफर आल्या. आता तिचा 'धडक-२' प्रदर्शित होणार आहे. त्यात तिने 'विधी' नामक युवतीची भूमिका साकारली आहे. विधी स्पष्टवक्ता आहे, खरे बोलण्यास घाबरत नाही. प्रत्यक्षात तृप्तीने म्हटले आहे की, मला माझ्या आयुष्यात विधीसारखे व्हायचे आहे. मी मनातल्या गोष्टी, विचार मनातच ठेवते. माझ्या वैयक्तिक जीवनात मी खूप सहन केले आणि गप्प राहिली. खरे तर मला असे आवडत नाही. पण, बोलणे जमत नाही. त्या मानाने माझी नायिका विधी धाडसी आहे. तिच्याकडून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. कारण, ती तुम्हाला सक्षम करते. तृप्तीचा 'धडक-२' येत्या १ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. ■



### आमिरचा 'सितारें जमीं पर' युट्यूबवर प्रदर्शित होणार

**मुंबई** : आमिर खान 'सितारे जमी पर' चित्रपटामुळे चर्चेत आला होता. नुकताच त्याने मोठा निर्णय घेतला आहे. आमिर खानने त्याच्या या नव्या चित्रपटाला थेट थियेटर रिलीजनंतर लगेच युट्यूब 'मुव्हीज ऑफ डिमांड'वर प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे हा सिनेमा जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील लोकांपर्यंत सहज आणि स्वस्त दरात पोहोचू शकेल. हा निर्णय सिनेमा प्रदर्शनाच्या पारंपरिक पद्धतीला नवा दिशा देणारा असल्याचे बोलले जात आहे. 'सितारे जमीं पर' हा सिनेमा फक्त युट्यूबवर आमिर खान टॉकिज जनता का थियेटरवर पाहायला मिळणार असून, कोणत्याही इतर डिजिटल प्लॅटफॉर्मवर तो प्रदर्शित केला जाणार नाही.



### 'तारक मेहता...'ची १७ वर्षे पूर्ण




**मुंबई** : अलिकडेच 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या कार्यक्रमाने आपल्या प्रवासाची १७ वर्षे पूर्ण केली आहेत. या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी निर्मात्यांनी एका पार्टीचे आयोजन केले होते, ज्यात कार्यक्रमातील सर्व कलाकारांनी भाग घेतला. गोरेगाव फिल्म सिटीमध्ये हा उत्सव आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे निर्माते असित मोदी, अभिनेते दिलीप जोशी, मुनमुन दत्ता, अमित भट्ट, तनुज महाशब्दे, सचिन श्रॉफ आणि इतर चेहरे देखील या उत्सवात दिसले. यावेळी कलाकारांच्या कुटुंबातील सदस्यही सेटवर उपस्थित होते. दिलीप जोशी आणि इतर कलाकारांचे पालक आणि कुटुंबातील सदस्यांनी एकत्र केक कापला. हा शो २००८ मध्ये सुरू झाला होता. हा टीव्हीवरील सर्वांत जास्त काळ चालणारा शो बनला आहे. हा शो लेखक तारक मेहता यांच्या 'दुनिया ने ऊंधा चष्मा'वर आधारित आहे. तारक हा शो गुजराती मासिक चित्रलेखासाठी लिहित असे. ■

# काराकोरममधील हिमनद्यांमध्ये वाढतोय् बर्फ

### सियाचीनमध्ये हिमनदीच्या स्वरूपात वेगाने बदल ● वाढत्या तापमानाचा परिणाम

◆ **वॉशिंग्टन, २९ जुलै**

जागतिक तापमानवाढीमुळे जगातील बर्फाचे प्रमाण कमी होत असताना, जगातील एका दुर्गम प्रदेशातील तीन हिमनद्यांवर बर्फ वाढत आहे. एका अंतराळवीराने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून त्यांचे फोटो टिपले आहेत. ते काराकोरम पर्वतरांगातील एका मोठ्या बर्फाच्या ढिगाऱ्यात विलीन झाल्याचे दिसून आले.

आशियातील काराकोरम पर्वतरांगेतील लोलोफोंड, तेरम शेहर आणि सियाचीन या तीन हिमनद्या एकत्र येत असून, त्यांचा आकार वाढतो आहे. परिणामी, एकत्रितपणे काराकोरममध्ये विसंगती निर्माण करीत आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाने २०२३ मध्ये काढलेल्या एका छायाचित्राच्या आधारावर, जगभरातील संशोधकांनी निष्कर्ष काढला आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे अंटार्क्टिका आणि आर्क्टिकमधील हिमनद्यांना धोका निर्माण होत आहे. या हिमनद्या मोठ्या होत आहेत. या घटनेने शास्त्रज्ञ गोंधळून गेले आहेत. पूर्व काराकोरममधील सियाचीन हिमनदी ही काराकोरममधील सर्वांत लांब हिमनदी आहे. ती समुद्रसपाटीपासून १८,८७५ फूट उंचीवर आहे आणि त्याची लांबी ७६ किलोमीटर आणि रुंदी ३.५ किलोमीटर आहे. त्यात अत्यंत वेगाने काही बदल झाले आहेत, जे शास्त्रज्ञ स्पष्ट करू शकले नाहीत.

काराकोरम पर्वतरांगा भारत, पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तानच्या सीमेवर आहेत. शास्त्रज्ञांनी विविध सिद्धांतांसह या हिमनद्यांमधील असामान्य वाढीचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्यापैकी कोणत्याही सिद्धांताची पुष्टी झालेली नाही.

**'मोरेन' म्हणजे काय?**

मोरेन हे भूस्वरूप आहे. ते हिमनदीच्या हालचालीमुळे तयार होते. हिमनदी जेव्हा बर्फ वितळल्यावर मागे सरकते, तेव्हा तिच्यासोबत आलेले खडक, माती, वाळू आणि इतर कचरा एका ठिकाणी साठतो आणि त्यातून मोरेन तयार होते. (वृत्तसंस्था)



**...म्हणून म्हणतात धोकादायक ग्लेशियर**

भारत, पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तानच्या सीमेजवळ असलेला हा प्रदेश भारत-पाकिस्तान संघर्षामुळे 'जगातील सर्वांत धोकादायक ग्लेशियर' म्हणून ओळखला जातो. जगभरातील बहुतेक हिमनद्या कमी होत असताना, येथील हिमनद्या मात्र वाढत आहेत. या अनाकलनीय घटनेला शास्त्रज्ञ 'काराकोरम विसंगती' म्हणतात. विशेष म्हणजे, अंटार्क्टिकामध्येही गेल्या काही वर्षांपासून बर्फ वितळण्याचा वेग कमी झाला आणि आता तो वेगाने तयार होत असल्याचे समोर आले. ■

# व्यावसायिक लाभासाठी शस्त्रक्रियेचे थेट प्रक्षेपण नाहीच!

### आयुर्विज्ञान आयोगाचे कठोर दिशानिर्देश

◆ **नवी दिल्ली, २९ जुलै**

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) शस्त्रक्रियेचे थेट प्रक्षेपण करणाऱ्या शल्यचिकित्सक आणि रुग्णालयांना फटकारले असून, व्यावसायिक वापरासाठी किंवा कोणत्याही उत्पादनाच्या जाहिरातीसाठी आता असे प्रसारण करता येणार नाही, अशा शब्दात ठणकावले आहे.

एनएमसीने नुकतेच यासंदर्भातील दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार, शल्यचिकित्सकांना शस्त्रक्रियेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या उपकरणांमधून वित्तीय किंवा व्यावसायिक हित साधणे बंद केले पाहिजे. शस्त्रक्रियेच्या थेट प्रसारणाचा उद्देश केवळ शैक्षणिक असावा. त्याचा उपयोग व्यावसायिक लाभासाठी होता कामा नये. शल्यचिकित्सकांनी महिमामंडनापासून दूर राहिले पाहिजे. त्यांनी आपले लक्ष शल्यचिकित्सेतील तंत्रज्ञान आणि रुग्ण यावरच केंद्रित केले पाहिजे.

नव्या दिशानिर्देशांमध्ये म्हटलेआहे की, थेट प्रसारणाशी संबंधित अनेक कठीण मुद्दे आहेत. त्यातील जोखीमही तितकीच महत्त्वाची आहे. अशा स्थितीत शस्त्रक्रियेशी संबंधित विमा हा मुद्दाही अतिशय महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिकतेसाठी शस्त्रक्रियेच्या थेट प्रसारणाचा वापर केला जाऊ नये. शैक्षणिक हेतूने केलेले प्रसारण मान्य करता येईल. मात्र, अशा पद्धतीने प्रसारण करून शैक्षणिकदृष्ट्याही फारसा फायदा होतो की नाही, याविषयी आपण साशंक असल्याचे आयोगाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अग्रलेख...

# ‘दिव्य’ यशाचे कौतुक करताना

ती खेळतेय बुद्धिबळाच्या पटावर... सभोवताली झगमगती रोषणाई, कॅमेऱ्यांचे फ्लॅश, जगभरातून जमलेले बुद्धिबळ स्पर्धक-विश्लेषक, श्वास रोखून बघत असलेले लोक आणि समोर एक अनुभवी प्रतिस्पर्धी. पण, तिच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नाही. ताण नाही. शांत आणि धारदार नजर. थेट पटावर. मन-बुद्धी पूर्णपणे खेळावर केंद्रित; बाहेरचे जग जणू तिच्या लेखी अस्तित्वातच नाही. तिच्या डोळ्यांत फक्त एक गोष्ट दिसत असते आणि ती म्हणजे विजयाची खात्री...आणि ती ठरते जगज्जेती! दिव्या देशमुख. नाव साधे आणि व्यक्तिमत्त्वही तसेच. बुद्धिबळाच्या पटावरील चाली मात्र असामान्य. नागपूरसारख्या शहरात वाढलेल्या दिव्याने जॉर्जियातील बटुमीत झालेल्या स्पर्धेत महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकला आणि तो जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली. तिने कोनेरू हम्पीला पराभूत केले आणि ग्रॅण्डमास्टर होणारी चौथी भारतीय महिला ठरली. अमरावती विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांची ही नात. जन्म-शिक्षण नागपूरचे. तिचे आई-वडील डॉक्टर आहेत. दोघांनीही दिव्याच्या माध्यमातून हे जगज्जेतेपदाचे स्वप्न पाहिले आणि कन्येने ते पूर्णत्वास नेले. त्यासाठी आई-वडिलांनी काय त्याग केला याची मोजदाद नाही आणि दिव्याने आरामाविना घालविलेल्या दिवसांची गणती नाही. दिव्या अवघी एकोणवीस वर्षांची आहे. एवढ्या कमी वयात बुद्धिबळासारख्या अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक खेळात जागतिक जेतेपद मिळविणे हे बहुतेकांसाठी दिवास्वप्नच. पण दिव्याने ते प्रत्यक्षात आणले. फिडे महिला वर्ल्ड कप जिंकणे हा एक स्पर्धा जिंकण्यापुरता विषय नव्हता. एका सामान्य घरातल्या मुलीचा संघर्ष, तिच्या कुटुंबाचा त्याग व जिद्द आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारतीय बुद्धिमत्तेची चुणूक पुन्हा एकवार जगाला दाखविण्याच्या ध्यासाची ती परिणती होती. दिव्याच्या पृष्ठभूमीला झगमगाट नाही. प्रायोजकांची रांग नाही आणि स्टारडमची झळाळीही नाही. तिच्याजवळ होता व आहे एक आत्मविश्वास- येस्स, मीच जिंकणार!...त्याच आत्मविश्वासाने तिला जगज्जेती केले. शाळा-महाविद्यालयात आणि कोचिंग क्लासेसना जाऊन अभ्यास नावाच्या औपचारिकतेची पूर्तता केली की विशीतल्या मुला-मुलींचे एक वेगळे विश्व असते. मित्र-मैत्रिणींसोबत भटकंती, खवय्येगिरी, सिनेमा-टीव्ही-गेमिंग, स्टेटस, रिल्स, सोशल मीडियावरील भंकस इत्यादी. त्यात दिव्या गुंतली नाही. ज्या नवथर अवस्थेत नैसर्गिक असे सगळे वागणे कुणीही गृहीत धरेल, अशा वयात तिने बुद्धिबळाच्या पटात स्वतःला गुंतविले. दिवस असो वा रात्र, मध्यरात्र असो वा पहाट, चेस हाच तिचा ध्यास होता.

दिव्याच्या यशात तिचे मार्गदर्शक, प्रशिक्षक या साऱ्यांचा वाटा आहेच. त्याहून मोठे योगदान तिच्या कुटुंबाचे आहे. तिच्या आई-वडिलांनी स्वत:च्या स्वप्नांना आवर घालून दिव्याच्या स्वप्नांची वाट प्रशस्त केली. अवघ्या पाच वर्षांची असताना तिला नागपुरातील एका बुद्धिबळ अकादमीत प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा निर्णय पालकांनी घेतला. ही घटना २०१० ची. बुद्धिबळावरचे तिचे प्रेम वाढू लागले आणि २०१२ मध्ये ती पुद्दुचेरी येथे झालेल्या सात वर्षांखालील वयोगटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेती ठरली. २०१३ मध्ये दिव्या देशमुखने इराणमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत विजेतेपद पटकावले. जेमतेम साडेआठ वर्षांची दिव्या २०१४ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये जागतिक स्पर्धेत विजेती ठरली. त्यानंतर तिने अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि २३ सुवर्ण पदकांसह इतर पदकेही जिंकली. २०२० मध्ये ऑनलाईन चेस ऑलिम्पियाडमध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघात तिचा समावेश होता. २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय मास्टर, त्याच वर्षी दोनदा राष्ट्रीय महिला विजेतेपद, २०२४ मध्ये वीस वर्षे वयोगटाच्या जागतिक स्पर्धेत विजेतेपद आणि आता फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक अशी तिची देदीप्यमान कामगिरी. देशमुखांच्या घरात असलेले पोषक वातावरण अर्थातच तिच्या उपयोगी आले. तरीही असे मात्र म्हणता येते की, वातावरण कसेही मिळाले तरी व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर बरेच काही अवलंबून असते. ती इच्छाशक्ती दिव्याच्या ठायी आहे. दिव्या तीन-चार वर्षांची असतानापासून चेस बोर्डवर रमायला लागली. तिची आवड पालकांनी हेरली आणि त्यानंतर तिने यशाचे अनेक सोपान पार करून आता ती जगज्जेती ठरली आहे. युरोपमधील अनेक देशांत, तसेच चीन-रशियासारख्या महाकाय राष्ट्रांत बुद्धिबळावर हजारो कोटींची गुंतवणूक होते. तिकडे या खेळाला मान-प्रतिष्ठा आहे. भारतात अद्याप घरातल्या मुलांसाठी बुद्धिबळ पट विकत घेणे हा प्राधान्याचा विषय नाही. सरकारकडून देखील या खेळाला फारसे पाठबळ नाही. शाळा-महाविद्यालयांमध्ये केवळ क्रिकेटवर भर असतो. प्रसारमाध्यमांचे लक्ष बुद्धिबळाकडे तेव्हाच वळते जेव्हा वर्ल्ड कपसारखे काहीतरी जिंकले जाते. म्हणजे त्या अर्थाने या खेळाला किमान भारतात तसे ग्लॅमर नाही. या पृष्ठभूमीवर दिव्याचे यश क्रांतिकारक ठरते. तिचे शहर नागपूर. नागपूरच्या मुलांची स्वप्ने आणि मुंबई-दिल्ली-बंगळुरूत राहणाऱ्या मुलांची स्वप्ने, त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा व प्रोत्साहन यांत फरक असतो. ग्लॅमरचा फरक तर आहेच. शिवाय, महिलांच्या बुद्धिबळातील सहभागाबद्दल आपल्या समाजाची दृष्टी अद्याप पुरती सरावलेली नाही. अशात दिव्या देशमुखने जगातील अव्वल बुद्धिबळपटू म्हणून नाव कमावले हे कमालीचे सुखावणारे. दिव्याचे नाव आता फक्त महिला बुद्धिबळापुरते मर्यादित राहिलेले नाही. ते थेट भारतीय बुद्धिबळ क्रांती अर्थात् चेस रिव्होल्यूशनचा चेहरा बनले आहे. ही क्रांती दिव्याच्या रुपाने आरंभिली गेली आहे. आजही गावपातळीवर अनेक मुले बुद्धिबळ खेळताहेत. ती अजूनही सरकारी टॅलेंट स्कीमच्या बाहेर आहेत. ती अजूनही ‘क्रिकेट नको, चेस हवंय’ असं म्हणतात. पण त्यांचे ऐकून घेणारे कुणी नाही. दिव्याचे यश हे त्यांच्यासाठी आशा आहे आणि सरकार, समाज यांच्यासाठी दिशा देणारे देखील आहे. दिव्याच्या विजयाचे मोल असे की, तिने प्रकाशझोत स्वत:कडे वळविण्यासाठी कोणतीही खटपट केली नाही. ती स्वयंप्रकाशित झाली आणि देदीप्यमान कौशल्याने देशाचे नाव मोठे केले.

बुद्धिबळाच्या खेळाची काही वैशिष्ट्ये आहेत. कोणत्या वेळी आणि कोणत्या स्थितीत पुढे जायचे, कधी थांबायचे आणि कधी मागे यायचे याचे भान देणारा हा खेळ आहे. बुद्धिबळाच्या खेळाचा आरंभच भारतात झाला. हा खेळ भारतीय बुद्धिमत्तेच्या क्षमतेचे प्रतीक म्हणून शेकडो वर्षे जगाला ठावूक आहे. दिव्यासारख्यांचे पराक्रम जगाला या बौद्धिक क्षमतेची आठवण नव्याने करून देतात एवढेच. बुद्धिबळ या खेळाची ओळख बहुतेकजण काळ्या-पांढऱ्या चौकटींवर चालणारा डोक्याचा खेळ अशी करून देतात. पण या काळ्या-पांढऱ्या पटांवर घडणाऱ्या लढती किती बहुरंगी-बहुढंगी असतात, हे ज्यांनी हा खेळ मनापासून पाहिलाय, अनुभवलाय, समजून घेतलाय, त्यांनाच कळू शकते. दिव्या देशमुख नागपूरची असल्यामुळे नागपूर आणि विदर्भासाठी तिचे यश अभिमानास्पद आहेच. शिवाय, ती परदेशात खेळली व जागतिक विजेती ठरल्यामुळे महाराष्ट्रासह समस्त भारतीयांसाठी तिचे यश हा अभिमानाचा व आनंदाचा विषय आहे. त्यामुळेच पंतप्रधानांसह अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. आजच्या सोशल मीडियाच्या युगात व्हायरल व्हायचे म्हणून अनेकजण शॉर्टकटचा अवलंब करतात. अशा काळात दिव्याने ध्यास, सराव, संयम, सातत्य आणि चिकाटीचे महत्त्व दाखवून दिले. ही शिकवण आजच्या पिढीसाठी फार महत्त्वाची आहे. त्यामुळेच दिव्याचे हे यश साजरे करताना आपण केवळ तिचे कौतुक करून थांबू नये. तिच्यासारखी अनेक मुले चेसमध्ये नाव कमावण्याची स्वप्ने पाहत आहेत. दिव्याच्या घरच्यांनी तिला पाठबळ दिले. अनेक मुलांना घरून पाठबळ नाही. त्यांना जाणत्या व्यक्ती-संस्थांनी पाठबळ द्यावे. दिव्यासारख्या खेळाडूंना संधी, सुविधा आणि प्रेरणा देण्यासाठी यंत्रणा उभी करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दिव्याच्या ‘दिव्य’ यशाचे कौतुक करताना असे प्रसंग भारतीयांच्या वाट्याला सतत यावेत, अशी कामना करूया आणि त्यासाठी प्रतिभावंतांना पाठबळ देऊया!

## विशेष

# व्यापार आणि बंदर विकासावर व्यूहात्मक भर

प्रा. सुखदेव बखळे

भारतात १३ प्रमुख बंदरे आणि दोनशेहून अधिक अधिसूचित लघु आणि मध्यवर्ती बंदरे आहेत. भारत हे जगातील सोळावे सर्वांत मोठे सागरी राष्ट्र आहे. पूर्व आशिया आणि अमेरिका, युरोप आणि आफ्रिकासारख्या ठिकाणांदरम्यान प्रवास करणारी बहुतेक मालवाहू जहाजे भारतीय सागरातून जातात. भारतातील प्रमुख आणि लघु बंदरे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारापैकी सुमारे ९५ टक्के व्यापार हाताळतात. बंदरांच्या बांधकाम आणि देखभालीशी संबंधित प्रकल्पांसाठी सरकारने स्वयंचलित मार्गाखाली शंभर टक्क्यांपर्यंत परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. भारताची प्रमुख बंदरे दरवर्षी ८२० एमएमटी माल हाताळत आहेत. त्यात २०१४ पासून ४७ टक्के वाढ झाली आहे. त्याच कालावधीमध्ये एकूण बंदर क्षमता दुप्पट होऊन १,६३० एमएमटी झाली आहे. २०४७ पर्यंत भारताची बंदर क्षमता सहा पटींनी वाढवण्याची योजना आहे. जवाहरलाल नेहरू बंदराने दहा दशलक्ष टीईयूड (२०-फूट समतुल्य युनिट) कंटेनर हाताळणी क्षमता प्राप्त केली आहे. जागतिक बँकेच्या ‘लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स’ (एलपीआय) अहवाल २०२३ नुसार, भारत ‘आंतरराष्ट्रीय शिपमेंट’ श्रेणीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहे. २०१८ मध्ये तो ४४ व्या स्थानावर होता. कंटेनर उभे राहण्याचा वेळ आता तीन दिवसांपर्यंत कमी झाला आहे. जहाजांच्या टर्नअराऊंड वेळेत ०.९ दिवसांपर्यंत सुधारणा झाली आहे. जागतिक बँकेच्या ‘कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स’मध्ये नऊ भारतीय बंदरे आहेत. विशाखापट्टणम् जागतिक स्तरावर टॉप २० मध्ये आहे. प्रमुख बंदरांमधील कार्यरत पीपीपी प्रकल्पांचे मूल्य २०१५ मध्ये सुमारे १६ हजार कोटी रुपये होते. २०२२-२३ मध्ये ते ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे.

मोठ्या बंदरांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित समस्या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत. तिथे पुरेसे बर्थ किंवा जहाजांसाठी पुरेशा लांबीचे प्लॅटफॉर्म्स उपलब्ध नाहीत. पूर्व किनाऱ्यावरील आणि मन्नारच्या आखाताजवळ जास्त गाळ साचण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांची क्षमता कमी होते. जागतिक दर्जाची मेगा बंदरे, ट्रान्सशिपमेंट हब आणि बंदर पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करून भारताच्या सागरी क्षेत्राच्या वाढीला गती देण्यावर सरकारने भर दिला आहे. भारताच्या ७,५०० किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीचा वापर करून १४,५०० किलोमीटर संभाव्य जलमार्ग तयार करणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारमार्गांवर धोरणात्मक स्थान वापरून देशात बंदर नेतृत्व विकासाला चालना देणे ही सरकारची उद्दिष्टे आहेत. आज मोठ्या प्रमाणात माल हाताळण्याची क्षमता वाढवून, बर्थिंग सुविधा, साठवणूक आणि हाताळणी क्षमता सुधारून बंदरांचा विस्तार आणि आधुनिकीकरण करण्याची गरज आहे. ऑपरेशन्स वाढवण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी स्वयंचलित क्रेन, रोबोटिक सिस्टिम आणि स्मार्ट पोर्ट मॅनेजमेंट सिस्टिमसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर विचारात घेतला पाहिजे.



गतिमान आणि चांगले रस्ते आणि रेल्वे नेटवर्कद्वारे बंदरे आणि अंतर्गत प्रदेशांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ‘ब्लॉकचेन’, ‘इंटरनेट ऑफ थिंग्ज’ (आयओटी) आणि डेटा ॲनालिटिक्ससारख्या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीमुळे बंदर कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढू शकते. इलेक्ट्रॉनिक दस्तावेजीकरण, कंटेनर ट्रॅकिंग आणि कार्गो क्लिअरन्स यासारख्या प्रक्रियांचे ऑटोमेशन कागदपत्रे, विलंब आणि मानवी चुका कमी करण्यास मदत करू शकते. बंदर पायाभूत सुविधा विकासाशी संबंधित नियामक प्रक्रिया, परवानग्या आणि मान्यता सुलभ आणि सुलभ केल्याने गुंतवणूक आकर्षित होऊ शकते आणि प्रकल्प अंमलबजावणीला गती मिळू शकते. एक कार्यक्षम नियामक चौकट गुंतवणूकदारांना निश्चितता प्रदान करू शकते आणि बंदर क्षेत्रात व्यवसाय सुलभतेला प्रोत्साहन देऊ शकते. पायाभूत सुविधा आणि व्यवसाय सुलभतेला एकाच वेळी प्रोत्साहन दिल्यास बंदर अर्थव्यवस्था पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचते. गेल्या दहा वर्षांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी)द्वारे, सरकारने धोरणात्मक सुधारणा आणि नवीन तंत्रज्ञानाचा समावेश करून भारताच्या बंदरांना जागतिक मानकांनुसार श्रेणीसुधारित करण्याचे प्रयत्न केले आहेत.

सध्या महाराष्ट्रात दोन प्रमुख बंदरे आहेत. यातील एक म्हणजे मुंबई बंदर आणि दुसरे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट बंदर; मात्र मुंबई शहराचा विकास आणि काही भौगोलिक कारणांमुळे ‘जेएनपीटीए’ बंदरातून अधिकची वाहतूक करणे शक्य नाही. तसेच ‘जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट’ची कंटेनर हाताळण्याची क्षमताही संपत चालली आहे. देशातील निर्यात व आयातक्षेत्रात होणारी वाढ पाहता भविष्यात दुसऱ्या बंदराची गरज लागू शकते. त्यामुळेच पालघर जिल्ह्यातील वाढवण परिसरात एक नवीन बंदर उभारण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सागरी मंडळ आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या दोन संस्था एकत्र काम करत आहेत. वाढवण बंदर जगातील दहा मोठ्या बंदरांपैकी एक असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील आर्थिक विकासाला चालना मिळणार असून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा तब्बल बारा लाख रोजगारांची यानिमित्ताने निर्मिती होईल. वाढवण बंदराचे काम जेएनपीटी आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागीदारीतून केले जाणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६,२२० कोटी रुपये आहे. यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ आणि २६ टक्के असा असणार आहे. यात ‘पीपीपी’नुसार मुख्य पायाभूत सुविधा, टर्मिनल आणि इतर व्यावसायिक पायाभूत सुविधांचा समावेश असेल.

बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी एक हजार मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल, चार बहुउद्देशीय बर्थ, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये ऑफशोअर क्षेत्रात १,४४८ हेक्टर क्षेत्र पुनर्संचयित करणे आणि १०.१४ किलोमीटर ब्रेकवॉटर, कंटेनर/कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे. या प्रकल्पामुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. तसेच स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या आणि या व्यवसायाशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचे पुनर्वसन करून योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. वाढवण विकास केंद्राचे क्षेत्र, त्यातील गावांची संख्या वाढवून वाढवण विकास केंद्राच्या माध्यमातून वाढवण पोर्ट सिटी अर्थात चौथी मुंबई वसवण्याच्या दृष्टीने ‘एमएसआरडीसी’ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याची मागणी केली गेली होती. क्षेत्र, गावे वाढल्याने आता वाढवण विकास केंद्रांतर्गत वाढवण बंदरालगत आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवीन शहर अर्थात ‘पोर्ट सिटी’ वसवण्यात येणार आहे. आता वाढवण विकास केंद्राची विकास योजना तयार करण्याच्या, चौथ्या मुंबईचा आराखडा तयार करण्याच्या कामाला ‘एमएसआरडीसी’कडून सुरुवात होणार आहे तर अधिसूचित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि इतर प्रकारच्या अभ्यासालाही सुरुवात केली जाईल. वाढवण बंदर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर म्हणून प्रस्तावित असल्याने त्याला आनुषंगिक रस्त्याचे नियोजन, वाहतूक, उद्योग, कंटेनर डेपो, लॉजिस्टिक पार्क उद्योगाचे नियोजन इत्यादींचाही विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार ‘एमएसआरडीसी’कडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व सोयी-सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, विमानतळ आदी सुविधांनी युक्त चौथी मुंबई या बंदरालगत आकाराला येणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# देवेंद्र फडणवीसांचा स्पष्ट संदेश

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीला आणखी काही महिने अवधी असला तरी पडघम मात्र जोरात वाजायला लागले आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपाची विदर्भ विभागाची नियोजन बैठक नुकतीच वर्धेत झाली. निवडणूक कोणतीही असो भाजपा ती संपूर्ण तयारीने लढते आणि कार्यकर्त्यांना त्यासाठी व्यवस्थित तयार करते. सूक्ष्म नियोजन व त्यानुसार पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रमाणिक काम केले तर यश हमखास मिळते यावर भाजपाचा पूर्ण विश्वास आहे. याच पद्धतीने त्यांनी निवडणुका लढल्या व जिंकल्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात चांगले यश मिळविण्यासाठी भाजपाने आवश्यक ती सर्व तयारी केली होती. भाजपाला भरीव यश मिळेल असे अंदाजही वर्तविले जात होते. पण, ती निवडणूक अचानक विरोधकांनी तयार केलेल्या चुकीच्या विमर्श भोवती फिरली. महाराष्ट्रातील निवडणूक संपेपर्यंत वेगवेगळे खोटे विमर्श चर्चेत राहिले. त्याचा थेट परिणाम निकालावर दिसला. भाजपाला त्यातून मोठा धडा शिकायला मिळाला. खोट्या विमर्शची विधानसभेत पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भाजपाने अशी काही तयारी केली की, २०१९ निवडणुकीचा आपलाच विक्रम मोडत १३२ जागा जिंकण्याचा नवा विक्रम केला. गेल्या ४० वर्षांत महाराष्ट्रात कोणत्याही एका पक्षाला इतक्या जागा मिळालेल्या नाहीत. महायुती म्हणून जागांची संख्या २३२ झाली. जनतेने व्यक्त केलेला हा विश्वास येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कायम ठेवण्याचे आव्हान आता भाजपासमोर आहे.

विधानसभेतल्या भरघोस यशासाठी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धेच्या नियोजन बैठकीत स्पष्ट सूचना व संदेश दिले आहेत. कोणत्याही स्थितीत अतिआत्मविश्वासात न जाता तयारी करा. केंद्र व राज्य सरकारच्या कामामुळे भाजपासाठी समाजात खूपच अनुकूलता आहे. लोक आपल्याला निवडून द्यायला तयार आहेत. पण, हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा अनेक जिल्ह्यांमधले स्थानिक पातळीवरच्या नेत्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये असलेले छोटे-छोटे वाद संपुष्टात येतील. एकमेकांचे पाय ओढण्याची वृत्ती नष्ट करावी लागेल. भाजपा परिवार आहे. दोन भावांमध्ये थोड्या कुरबुरी असतातच. परंतु, निवडणुकीच्या तोंडावर एकत्रित राहून वादांवर पडदा टाकाला पाहिजे. तो टाकला नाही म्हणून अनेक पक्षांचे पतन झाले आहे. असा प्रकार आपल्या पक्षात होता कामा नये. जो करेल त्याला पक्ष त्याची जागा दाखवेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. हे सांगतानाच त्यांनी महायुती म्हणूनच निवडणुका लढण्याचा प्रयत्न राहील. जिथे अडचणी असेल तेथे चर्चा करून निर्णय घेतले जातील. अशा ठिकाणी वेगळे लढण्याचा निर्णय जरी झाला तरी महायुतीतल्या घटक पक्षांवर टीका करायची नाही, अशी ताकीद त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिली. समन्वयाने निवडणूक लढून भाजपाला विदर्भात गत निवडणुकीपेक्षा जास्त म्हणजेच २ हजाराच्यावर जागा जिंकायच्या आहेत. भाजपाच मोठा पक्षा राहील याची काळजी सर्वांना घ्यायची असल्याने प्रत्येकाने झोकून काम करण्याचे आवाहन त्यांनी पोटतिडकीने केले.

देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केलेला प्रत्येक मुद्दा वास्तव स्थितीला धरून आहे. केंद्र व राज्यात भाजपा सत्तेत असल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते हरखून जाण्याची शक्यता आहे. त्यांना भानावर आणण्याचे अतिशय महत्त्वाचे काम निवडणूक तयारीच्या सुरुवातीलाच त्यांनी केले आहे. अलिकडच्या काळात अनेक जिल्हास्थानांवर भाजपात हेवेदावे सुरू झाले आहे. याची संपूर्ण माहिती पक्षाकडे गोळा झाल्यामुळेच फडणवीसांनी अतिशय स्पष्टपणे अंतर्गत वादांवर भाष्य केले असावे. पक्षातले वातावरण कोण खराब करत आहे, त्यांची नावे जिल्हानिहाय त्यांच्याकडे असू शकतात. कदाचित त्या नावांसमोर ‘मार्कर पेन’ने रेष देखील ओढली असेल. भाजपाच्या यशात ही मंडळी जर अडसर ठरत असल्याचे लक्षात आले तर त्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात येऊ शकते. या मंडळींनी वेळीच सतर्क होण्याची गरज आहे. कारण, भाजपाला कोणताही धोका पत्करण्याची इच्छा नाही. संघटनशक्तीला नख लावणारे भाजपा खपवून घेत नाही, हा इतिहास आहे. दुसरीकडे कामात प्रामाणिक व पक्षवाढीसाठी कठोर मेहनत करणाऱ्यांच्या भाजपा नेहमीच पाठीशी असते. त्यांना योग्य पद आणि प्रतिष्ठा देते, हे वेळोवेळी सर्वांनीच पाहिले आहे. पक्षाचा हा स्वभाव लक्षात घेऊन सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करून पक्षाला व स्वत:ला मोठे करावे, अशी अपेक्षा आहे. पक्षाच्या या अपेक्षेवर किती जण खरे उतरतात हे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक रणधुमाळीत व निकालानंतर स्पष्ट होईलच.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - सांख्ययोग

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेचा दुसरा अध्याय सांख्ययोग म्हणून परिचित आहे. पहिल्या अध्यायात मोहग्रस्त झालेला अर्जुन दुसऱ्या अध्यायात सहाव्या श्लोकापर्यंत विषादयोगात आहे. त्यानंतर भगवान श्रीकृष्ण सव्यसाची धनंजयाला जे तत्त्व विशद करतात त्याला सांख्ययोग म्हणतात.

सांख्य तत्त्वाचे प्रणेते श्री. कपिल महामुनी आहेत. श्रीगीतेच्या दहाव्या अध्यायात स्वयं भगवान म्हणतात ‘‘सिद्धानां कपिलो मुनि:’’ सिद्धांमध्ये मी कपिल महामुनी आहे. हा अधिकार कपिल महामुनींचा आहे. त्यांनी आपले वडील कर्दम ऋषी वनात निघून गेल्यावर, आपली आई देवहुती यांना सांगितलेला उपदेश जो पुढे कपिलगीता नावाने प्रसिद्ध आहे. तोच सांख्ययोग आहे.

सांख्य शब्दावरून तो संख्येशी संबंधित असावा हे अनुमान आपल्याला काढता येईल. एक, दोन, तीन अशा असंख्यापर्यंत पोचणाऱ्या गणक अंकांना आपण संख्या म्हणतो. सांख्य म्हणजे गणना करणे, मोजणे, संख्यात्मक गणनेद्वारा तर्क करणे. सांख्ययोगात शास्त्रोक्त, नियमानुसार आणि यथार्थ गणना अपेक्षित आहे. कपिल महामुनींनी आपली आई देवहुतीला सांगितलेल्या सांख्यमतानुसार त्यांनी एकूण पंचवीस तत्त्वे सांगितली. या तत्त्वांची पद्धतशीर गणना करणे यालाच संख्याक्रम म्हणतात. त्या तत्त्वांना सांख्य म्हणतात. सांख्यमतानुसार जगाची निर्मिती दोन तत्त्वांवर झाली. त्यातील एक आहे प्रकृती आणि दुसरा आहे पुरुष. दोन्ही तत्त्वे आपल्यातच आहेत. प्रकृती म्हणजे भौतिक तत्त्व ज्याला सोप्या भाषेत संसार. पुरुष म्हणजे आत्मा म्हणजे परम् तत्त्व.

गणना म्हणजे सांख्यतत्त्वात प्रकृतीचे एकूण २४ घटक आहेत. मन, बुद्धी, अहंकार, पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंच तन्मात्रा (रूप, रस, गंध इत्यादी), पंच महाभूते असे एकूण २३ आणि प्रत्यक्ष प्रकृती असे एकूण २४ घटक आणि दुसऱ्या बाजूला आत्मा असे पंचवीस घटक. या २५ घटकांची सांख्यिकी किंवा क्रमनुसार गणना म्हणून हा सांख्ययोग.

सांख्ययोग द्वैत सांगतो म्हणजे प्रकृती वेगळी आणि पुरुष म्हणजे आत्मा वेगळा. आपण स्वत:ला प्रकृतीपासून वेगळे होण्याचा सतत प्रयास करणे म्हणजे संसारात राहून त्याच्या बंधनात न राहणे कारण संसार नश्वर आहे. दुसऱ्या बाजूला आत्मा अमर आहे. आपण त्या आत्मतत्त्वाची अनुभूती घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे. या अर्थाने सांख्य द्वैत सांगतो. असे असले तरी तो पराकोटीचा अद्वैत सांगतो असे माझे मत आहे. म्हणूनच सांख्ययोग सर्वांत श्रेष्ठ योग आहे. मी तर म्हणतो सांख्ययोगातच सर्व योग सामावले आहेत. म्हणून सांख्ययोगाला ज्ञानयोग असेही म्हटले आहे.

**ज्ञानं च लोके यदिहास्ति किंचित् सांख्यागतं तच्च महन्महात्मन् !**

या जगात जे ज्ञान आहे ते सांख्यमतातूनच आले हे व्यास महर्षी सांगतात.

सांख्ययोग फक्त श्रीगीतेतच आहे असे मानण्याचे कारण नाही. भागवत महापुराणात खुद्द कपिल महामुनींनी आपली आई माता देवहुतीला, भगवान गोपालकृष्णाने उद्धवाला, अष्टावक्र महामुनींनी राजा जनकाला हाच योग सांगितला.

श्रीगीतेत दुसऱ्या अध्यायाला सांख्ययोग म्हटले असले तरी तिसऱ्या अध्यायात तिसरा श्लोक, पाचव्या अध्यायात चौथा आणि पाचवा, तेराव्या अध्यायात श्लोक एकोणवीस ते तेवीस सांख्ययोगाचा उल्लेख ज्ञान संक्रमणासाठी आहे. अनेकांना असे वाटते की सांख्ययोग निरीश्वरवाद सांगतो का? पण हे चूक आहे. सोप्या भाषेत समजून घेऊ. कर्मयोग, भक्तियोग असे सर्व योग त्या परम तत्त्वापर्यंत पोचण्यासाठीचा मार्ग सांगतात .त्यावर मार्गक्रमण करण्याचा सल्ला देतात. सांख्यमत या सर्वमार्गांचा अर्क आहे. कारण सांख्यमतानुसार मी च परमात्मा आहे. इतर योग ज्याच्यापर्यंत पोचायचे त्यासाठी चालायला सांगतात. सांख्य मतानुसार जिथे जायचे तेच माझ्यात आहे तर मार्गक्रमण कसले?

जर ते परमात्म तत्त्वच माझ्यात आहे तर तुम्ही फक्त त्याची अनुभूती घ्या. तुमच्यातले भाव जागरण करा. ही स्व ची ओळख सांख्यमत सांगते. म्हणून हे मत निरीश्वरवादी नाही.

सांख्यज्ञानालाच भगवंतांनी आत्मज्ञान अर्थात ज्ञानयोग म्हटले आहे. भौतिक जगतात गुंतून केलेली कर्मे ही खऱ्या अर्थाने कर्म नसून कर्म हे चित्तशुद्धीचे साधन असावे. हा कर्मयोग भगवंताला अपेक्षित आहे. आपण ज्याची सतत चिंता करतो ते संसार तत्त्व वास्तव नाही तर आत्मा हा शाश्वत आहे. ‘‘ब्रह्म सत्य जगन्मिथ्या’’ या तत्त्वाने प्रकृती आणि पुरुष मांडताना भगवान उदाहरण देऊन स्पष्ट सांगतात की-

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**

हे सांख्यमत श्रीगीता मांडते.

विस्तारभयाने केवळ दुसऱ्या अध्यायात सांख्यमत मांडताना भगवंतांनी जे सांगितले ते लक्षात घेतले की सांख्यमताचा परिचय होईल.

१) नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
२) अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
३) हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
४) सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
५) कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
६) तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥

असे परिचित श्लोक अध्याय दोन मध्ये आहेत. त्यानिमित्ताने सर्वांनी श्रीमद्भगवद्गीता वाचून या श्लोकांचा अभ्यास केल्यास हितावह ठरेल.

ग्रंथश्रेष्ठ ज्ञानेश्वरी मध्येदेखील खूप सुंदर विवेचन माउलींनी केले आहे.

१) उपजे ते नाशे, नाशिले ते पुनरपि दिसे ।
२) जैसे जिर्ण वस्त्र सांडिजे, मग नूतन वेढीजे ।

थोडक्यात, सांख्ययोगाच्या निमित्ताने भगवंत अर्जुनाला सांगतात की, प्रकृतीमध्ये म्हणजे संसारसागरात गुंतून न राहता त्या परमात्म तत्त्वासाठी या मोहमायेतही स्थित:प्रज्ञ रहा.

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।**

म्हणजे ज्यावेळी पुरुष मनातील सर्व कामनांचा त्याग करून आत्मानुभूतीने आत्मस्वरूपात संतुष्ट होतो. या अवस्थेला स्थित:प्रज्ञ अवस्था म्हणतात. थोडक्यात उच्च अर्थाने उसात जाऊन पाचोळा अंगाला लागू न देणे अर्थात संसारात असलो तरी संसार अंगाला लागू न देणे आणि त्या आत्मतत्त्वाची अनुभूती घेणे. सांख्यमत याहून वेगळे नसावे!

९८२२२६२७३५

## हुंड्याचे नवे अवतार आणि आपण

देशात हुंडाबंदी कायदा लागू होऊन ६४ वर्षे पूर्ण झालीत. पण हुंड्यासाठी होणारा महिलांचा छळ, मानसिक यातना, तिच्या माहेरची आर्थिक पिळवणूक यातून दरवर्षी होणाऱ्या हजारो आत्महत्या हे वास्तव आपण बदलू शकलो नाही ही शोकांतिकाच आहे. महाराष्ट्र तशी साधू संतांनी व महापुरुषांनी वैचारिक मशागत केलेली भूमी. पण आपल्या राज्याची स्थितीही याबाबत भूषणावह नाही. त्यासाठी आता बोलक्या सुधारकांपेक्षा कर्त्या सुधारकांची नितांत गरज आहे.

अर्धशिक्षित, गरीब व मध्यम वर्गात हा छळवाद आहेच. पण उच्चभ्रू व मध्यम वर्गातही या ना त्या प्रकारे वधूपक्षाचे शोषण होतच असते. आधी फक्त रोख, दागिने अथवा वस्तुरूपात हुंडा घेतला जायचा. आता त्या जोडीला हुंड्याचे काही नवे अवतार अवतरले आहेत. लग्नासाठी आलिशान सभागृह, रिसॉर्ट, प्री वेडिंग शूटिंग, फिल्मी आतषबाजी, संगीत मैफिल, सुरुचीचा थाटमाट या साऱ्यांची अपेक्षा मुलीच्या बापाकडूनच केली जाते. जमलेच तर हनीमून टूरचा खर्चही मुलीच्या वडिलानेच करायचा. काही नवरोबा चलाखी करतात. भारतीय विवाह हा एक संस्कार आहे. पण कुप्रथाच जिथे फॅशन बनून नव्या नव्या अवतारात थैमान घालत असेल तिथून संस्काराने पलायन केलेले असते. राजकीय थाटमाट ही एक नवीच विकृती विवाह सोहळ्यात धुडगूस घालत आहे. कहर म्हणजे आपल्या कुटुंबातील मुलाने हुंडा घ्यावा म्हणून आग्रही असणाऱ्या महिला. ज्या कुटुंबात हुंडा घेतला जातो तिथे हुंडा घेणाऱ्या मुलाला विरोध करणारी आई किंवा बहीण अपवादानेच मिळणार. उलट ज्या कुटुंबात हुंडा न घेण्याची परंपरा आहे ती पुरुषांनीच प्रस्थापित केलेली आपल्याला बघायला मिळते हे वास्तव आहे. हुंडाबळी व सासरी होणाऱ्या स्त्री शोषणासाठी भोगवादी पुरुषी मानसिकता कारणीभूत आहेच पण सासरच्या छळगुन्ह्यांत स्त्री आरोपींचा सहभागही वरचढ असेल तर स्त्रियांनीही अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. वाजंत्रीचा खर्च मुलीच्या बापाकडून वसूल केलेला असेल तर अशा वरातीत बॅण्डच्या तालावर थिरकणाऱ्या महिलाही तेवढ्याच दोषी आहेत. आपल्याच छळाच्या अशा उत्सवात महिलांनी का म्हणून मिरवावे? माझा छळ झाला तसा मी माझ्या सुनेचा होऊ देणार नाही, ही माझी सून तशी ती कुणाची मुलगीही आहे; हा स्त्रीस्नेहवादच हजार सुधारणावादापेक्षा रामबाण आहे. घरच्या पुरुषांकडून सुनेला माहेरून पैसे आण अशी मागणी करून त्रास दिला जात असेल तर कुटुंबातील महिलांनी त्यास का विरोध करू नये? तसे होत नसेल तर त्यात महिलाही अप्रत्यक्षपणे सहभागीच असतात. केवळ पुरुषांनाच दोष देण्यापेक्षा महिलांनीही आपल्या मुलाने, भावाने, दिराने हुंडा घेऊ नये, नव्या थाटमाटांचा आग्रह धरू नये यासाठी कुटुंबात निर्भीडपणे आपली मते मांडण्याची गरज आहे.

**किशोर उरकुंडवार**/९९२१२६३०६२

## वाचक पत्रे

## साध्या जीवनात परमानंद

साधेपणातच खरी शांती, समाधान आणि आनंद असतो. जेव्हा आपण जीवनातल्या फालतू गोंधळातून, अपेक्षांमधून आणि भौतिक हव्यासातून मोकळे होतो, तेव्हा आपण खऱ्या अर्थाने जगायला लागतो. जेव्हा आपण आपल्या गरजा, अपेक्षा आणि इच्छांना मर्यादित ठेवतो, तेव्हा आयुष्य हलकं वाटतं. साधं जीवन म्हणजे जे आहे त्यात आनंद मानणे भौतिक स्पर्धेपेक्षा अंतर्गत शांततेला महत्त्व देणे. अनावश्यक गोष्टींच्या ओझ्यापासून मुक्तता खरे समाधान, जेव्हा आपण बाह्य गोष्टींपेक्षा अंतर्गत मूल्यांना प्राधान्य देतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण आयुष्य जगायला लागतो. साधं जीवन म्हणजे फक्त भौतिक वस्तूंच्या मागे न लागता, आपल्या गरजांनुसार जगणे आणि त्यातही समाधान मानणं म्हणजेच खरे सुख. कारण आपल्याकडे काय नाही याकडे बघत राहिलो, तर दुःखच वाटतं; पण जे आहे त्यात आनंद शोधला, तर मन शांत राहतं आणि आयुष्य सुखी होतं.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## ऑपरेशन महादेवअंतर्गत भारतीय सेनेचे तांडव

धर्म विचारून आमच्या बहिणींचे कुंकू पुसणाऱ्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तानी दहशतवाद्यांना भारतीय सेनेने श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी ठार केले. ऑपरेशन महादेव अंतर्गत जम्मू-काश्मिरातील पहाडी भागात भारतीय सेनेने अक्षरशः तांडव करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार केले. आज खऱ्या अर्थाने भारतीय सेनेने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. या दहशतवाद्यांना पाताळातूनही शोधून काढू हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना दिलेले वचन पूर्ण केले. भारत-पाकिस्तान युद्धसंघर्ष स्थगित झाल्यानंतर अमेरिकेच्या दबावाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युद्ध थांबवल्याचे विरोधक बोलत होते. पण भारतीय सेनेने पहलगाम हल्ल्यानंतर ९६ दिवसांत या दहशतवाद्यांना यमसदनी धाडले आणि पुन्हा एकदा जगास ठणकावून सांगितले की भारत से पंगा लिया तो यही हाल होगा. यामध्ये यापेक्षाही अधिक यश येण्याची शक्यता भारतीय सेनेने वर्तवली आहे. भारतीय सेनेच्या महादेव पराक्रमाने प्रत्येक भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा अशीच ही घटना आहे. अभिमान आहे आम्हास भारतीय सेनेच्या शौर्याचा.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'हरिभाई'च्या सुवर्ण महोत्सवाचा आज सांगता समारंभ

### सुवर्णस्मृती स्मरणिकेचे प्रकाशन होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**

येथील हरिभाई देवकरण महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाचा सांगता समारंभ व सुवर्णस्मृती स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा बुधवार दि. ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयातील मुळे सभागृहात होणार आहे. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोहनलाल जैन आहेत. तर शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके हे कार्यक्रमाचे अध्यक्ष आहेत.

यावेळी नियामक मंडळाचे सदस्य ॲड. मिहिर प्रभू देसाई, ॲड. दामोदर भंडारी, पराग ठाकूर, राजेश पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सुवर्ण महोत्सव समितीचे प्रमुख प्राचार्या दिपा फाटक, नियंत्रक तथा पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, पर्यवेक्षक बी.डी. बनसोडे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे, ए.सी.राऊत, ए.एस. कुंभार यांनी केले आहे.



## महत्वाचे...

### वहिनीच्या विनयभंगप्रकरणी दिराविरूध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ जुलै -**

घरामध्ये झोपलेल्या वहिनीचा विनयभंग करणाऱ्या दिराविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत वहिनीच्या फिर्यादीवरून दीराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही २७ जुलै रोजी रात्री घरातील रूममध्ये झोपली होती. त्यावेळी तिचा आरोपी दीर हा रूममध्ये आला व त्याने वहिनीचा हात धरून ओढून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

### भिम चौकातील जुगार अड्डयावर पोलिसांची कारवाई

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

शहरातील एमआयडीसी परिसरातील भिम चौकातील जुगार अड्डयावर पोलिसांनी कारवाई करीत जुगार खेळणाऱ्या १० जणांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी रोख ११ हजार १४० रुपये जप्त केले. महंमुद अयाज शेख, अ. वाहिद अ. गफूर सय्यद, सलमान नय्युम खैरद, म. सलीम नबीलाल शेख, आसिफ दस्तगीर शेख, मुसअब जाफर शेख, चांदबाशा बडेसाब सय्यद, अमन चांदहुसेन शेख, जावेद समिर शेख, इब्राहीम सैफन शेख (रा. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिस शिपाई व्हनगुंटी यांनी फिर्याद दाखल केली आहे.भिम चौकात काही लोक अंदर बाहर जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी भिम चौकात पत्ते खेळणाऱ्या वरील लोकांवर कारवाई करीत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### फेसबुकवर ठार मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ जुलै -**

फेसबुकवर ठार मारण्याची धमकी देणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नागेश सुरेश खरात (वय ४२, रा. मुरारजी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून ओंकार तुकाराम खुळे (रा. एन.जी. मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ जुलै रोजी रात्री नागेश खरात यांनी त्यांचे फेसबुक उघडले असता त्यावर ओंकार खुळे याने एक व्हिडीओ व्हायरल केला आहे. त्या व्हिडीओमध्ये ओंकार खुळे याने नागेश खरात यांस उद्देश्यून, अरे नाग्या मला काम लागले आहे, तुझ्यात दम असेल तर मला तारीख झाल्यावर परवा भेट, मी तुला असाच त्रास देणार आहे, अशा आशयाचा मजकूर व अश्लिल शिवीगाळ करून ठार मारण्याची दमदाटी केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात ओंकार तुकाराम खुळे (रा. एन जी मिल चाळ, मुरारजी पेठ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक राधा जेऊघाले पुढील तपास करीत आहेत.



# भीमा नदीवरील सर्व बंधारे पाण्याखाली

## निरा-नरसिंहपूरहून १ लाख ८ हजार २७७ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जुलै-**

भीमा आणि निरा खोऱ्यात अजूनही दमदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे उजनी आणि वीर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग केला जात आहे. उजनी धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे पंढरपूरातील चंद्रभागा (भीमा) नदीला सध्या पूरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीवरील सर्व बंधारे सध्या पाण्याखाली गेलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. चार दिवसापूर्वीच श्रावण महिन्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे भाविकांची येथे गर्दी आहे. पोलिस प्रशासनाकडून भाविकांना चंद्रभागा स्नानासाठी मज्जाव केला जात आहे.

स्पीकर फिरवुन भाविकांनी चंद्रभागेच्या पात्रात स्नानासाठी जावू नये, असे देखील पोलिसांकडून आवाहन केले जात आहे. भीमा नदीच्या खोऱ्यात दमदार पाऊस असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठा जमा होत आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील धरणांमधून भीमा नदी मध्ये पाण्याचा विसर्ग सुरु आहे. परिणामी वरील धरणातून भीमेत सोडल्या जाणाऱ्या पाण्याच्या विसर्गात सामावून घेण्यासाठी उजनी धरणातून पाण्याच्या विसर्गात मोठी वाढ केली जात आहे. दौंडची उजनी मध्ये येणारी जी आवक आहे ती ५४ हजार ७८२ क्युसेक्स इतकी झाली आहे. या बरोबरच पुणे बंडगार्डनचा विसर्ग हा २९ हजार २८४ क्युसेक्स इतका झाला आहे. उजनी धरणातून सकाळी ७० हजार क्युसेक्सने पाणी भीमा नदीत सोडण्यात येत असून विज निर्मितीसह ७१ हजार ६०० क्युसेक्सचा विसर्ग सुरु आहे. दरम्यान वीर धरणातून जे ३० हजार क्युसेक्सने पाणी सोडण्यात येत होते त्या मध्ये सकाळी साडेआठच्या सुमारास घट होवून तो २२ हजार क्युसेक्स इतका करण्यात आलेला होता. उजनी धरण हे सध्या ९७.५७ टक्के इतके भरले असून वीर धरणात ८९ टक्के इतका पाणी साठा आहे. उजनी धरणात एकुण ११५.९३ टीएमसी इतका पाणी साठा झाला असून त्या मध्ये उपयुक्त पाणीसाठा हा ५२.२७ टीएमसी इतका आहे.



दरम्यान उजनी धरणातून सीनामाढा योजने करीता १८० क्युसेक्स, दहिगाव करीता ८०, भीमासीना जोडकालव्याकरीता ४०० आणि मुख्य कालव्याव्दारे ११०० क्युसेक्सने पाणी सोडण्यात येत आहे.

निरानरसिंहपूर अर्थात संगम येथुन भीमा नदीपात्रात सकाळी दहाच्या सुमारास १ लाख ४ हजार ८८२ इतका पाण्याचा विसर्ग सुरु होता. मात्र त्या मध्ये वाढ होवून दुपारी तीनच्या सुमारास तो १ लाख ७ हजार ३०३ इतका सुरु होता. त्या नंतर सायंकाळी पाचच्या सुमारास तो १ लाख ८ हजार २७७ क्युसेक्स इतका सुरु होता. दरम्यान पंढरपूरात चंद्रभागा नदी दुपारी बाराच्या सुमारास ७० हजार २६१ क्युसेक्स वेगाने प्रवाहित होती. झाली होती. त्या नंतर दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्यामध्ये वाढ होवून ती ७३ हजार १५६ क्युसेक्स वेगाने प्रवाहित झाली.

दरम्यान येथील चंद्रभागा नदीकडे जाणाऱ्या सर्व घाटांवर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. चंद्रभागा नदी पात्राकडे जाणाऱ्या जवळपास सर्व घाटांच्या पायऱ्यांना पाणी लागलेले आहे. कोळी बांधवांनी दक्षता म्हणून आपल्या होड्या किंवा नावा नदीपात्राच्या घाटांकडील बाजूला आणून उभ्या केलेल्या दिसत आहेत. भाविकांना तसेच नागरिकांना चंद्रभागा नदीच्या घाटावर जाण्यापासून पोलिसांकडून रोखले जात आहे. या संदर्भात कृपया नागरिकांनी तसेच वारकरी भाविकांनी चंद्रभागा नदी पात्राकडे स्नानासाठी जावू नये अशा सुचना लाऊड स्पीकर वरुन पोलिसांकडून वारंवार देण्यात येत आहेत.





**सोलापूर : नागपंचमी सणानिमित्त मंगळवारी सकाळी विजापूर रोड परिसरातील जागृती नागनाथ मंदिरात देवस्थान येथे महिलांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.** (छायाचित्र : केवल तिवारी)

● जैववैद्यकीय कचरा संकलन संदर्भातील

## महापालिकेविरुद्ध मक्तेदाराची याचिका न्यायालयाने फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

महापालिकेच्या विविध प्रकरणांमध्ये वकिलांवर लाखो रुपयांचा खर्च करताना पालिकेच्या विरोधात निकाल लागत असल्याची चर्चा सुरू असतानाच महापालिकेच्या जैव वैद्यकीय कचरा संकलन मक्त्यासंदर्भात विरोधातील याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. यामुळे प्रशासनाला दिलासा मिळाला आहे. मक्ता हा एस. एस. सर्व्हिसेस यांच्याकडेच राहणार असून पालिकेचा मार्ग ही मोकळा झाला आहे.



संपूर्ण शहरातील दवाखाने व संबंधित सर्वच ठिकाणाहून संकलन होणारा जैव वैद्यकीय कचऱ्यावर महापालिकेच्या पुणे- भोगाव रस्त्यावर प्रक्रिया केली जाते. शहरातील या जैव वैद्यकीय कचरा संकलनाचा मक्ता यापूर्वी महापालिकेने बायोक्लीन सिस्टीम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना २० वर्षाच्या कालावधीसाठी दिला होता. दि. १९ डिसेंबर २०२३ रोजी त्याचा हा मक्ता संपुष्टात आला होता. यानंतर सोलापूर महापालिका प्रशासनाने शहर व जिल्हा हद्दीतील जैव वैद्यकीय कचरा उचलण्यासाठी दि. १९ ऑक्टोबर २०२३ रोजी जाहीर प्रसिद्धीकरण करून त्याची निविदा काढली होती. या टेंडर प्रक्रियेमध्ये एच-१ आलेल्या एस. एस. सर्व्हिसेस यांना हा मक्ता देण्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे या टेंडर प्रक्रियेत एच- २ स्थानावर असलेले पूर्वीचे मक्तेदार बायोक्लीन सिस्टीम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी महापालिका प्रशासनाकडे एस. एस. सर्व्हिसेस यांनी टेंडर मधील अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता केली नसल्यामुळे ते पात्र होऊ शकत नाही. याबाबत १६ त्रुटींची पूर्तता केली नसल्याबाबतही दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी महापालिकेला पत्र देऊन एस. एस. सर्व्हिसेस यांना अपात्र ठरविण्या बाबत कळविले होते. यानंतरही पालिका प्रशासनाकडून एस एस सर्विसेस यांनाच मक्ता देण्याचे निश्चित झाल्यामुळे बायोक्लिन सिस्टिम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन पालिका व एस. एस. सर्व्हिसेस यांच्याविरुद्ध रिट पिटीशन (क्र. ८४ / २०२४) दाखल केली होती. या याचिके विरुद्धच्या सुनावणीत न्यायमूर्तींनी त्यांचीही याचिका आणि म्हणणे फेटाळून लावले आहे. यामुळे आता महापालिकेचा जैव वैद्यकीय कचरा संकलनाचा देण्यात आलेला मक्ता हा एस. एस. सर्व्हिसेस यांच्याकडेच राहणार असून पालिकेचा मार्गही मोकळा झाला आहे.

याचिकेत महापालिकेकडून पॅनल ॲड. रामदास हक्के, एस एस सर्व्हिसेसकडून ॲड. सूर्यजीत चव्हाण तर बायोक्लीनकडून ॲड. अमोल गाटणे यांनी काम पाहिले.



## मेहता शाळेत नागपंचमी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत नागपंचमी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी कार्यक्रम चे प्रास्ताविक केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते नागदेवतेचे पूजन करण्यात आले.

मयुरी दुरुगकर यांनी नागपंचमी आपण का साजरी करतो.' याबाबत माहिती सांगितली. श्रुती कुलकर्णी यांनी नागपंचमीची गाणी गायिली. त्यावर सखी सावित्री मधील सदस्या, शिक्षिकांनी व विद्यार्थिनींनी फेर धरला. झिम्मा-फुगड्या खेळत सर्व विद्यार्थिनींनी नागपंचमीचा आनंद घेतला. मेहता प्राथमिक शाळेत नागपंचमी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. प्रमुख अतिथी सखी सावित्री समिती समुपदेशक स्मिता गायकवाड यांनी आपल्या मनोगतातून नाग शेतकऱ्यांचा मित्र असून आपण सर्वांनी प्राणिमात्रांवर दया केली पाहिजे, असा संदेश दिला. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले.व आभार सुजाता यादव यांनी मानले.

## विडी घरकुलमधून दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

शहरातील विडी घरकुल मधून चोरट्याने १० हजार रुपयांची दुचाकी चोरून नेली. याबाबत अनिल लक्ष्मण पोला (वय ४१, रा. सोना-चांदी अपार्टमेंट, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२३ जुलै रोजी रात्री अनिल पोला यांना त्यांची एमएच १३ एएम ०४८८ क्रमांकाची दुचाकी ही विडी घरकुल येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. त्यावेळी ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करण्यात आली आहे. हवालदार उबाळ तपास करीत आहेत.



## माचणूर येथे भाविकांची गर्दी

**मंगळवेढा दि.२९ जुलै-**

तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर मंदिरात श्रावणमासाच्या प्रथम सोमवार निमित्त दर्शनासाठी भाविकांची पहाटेपासून मोठी रिघ लागल्याचे चित्र होते. दरम्यान मंदिरात भजन, कीर्तनाचा कार्यक्रम ठेवल्यामुळे परिसर भक्तीमय बनून गेला होता. सोलापूर पासून चाळीस कि.मी.तर मंगळवेढ्यापासून बारा कि.मी. अंतरावर, भिमानदीच्या काठावर, कड्याकपारीत हेमाडपंथी असे भव्य श्री सिध्देश्वराचे मंदिर असून येथे श्रावण मास निमित्त सोलापूर, मंगळवेढा, सांगोला, कर्नाटक, मोहळ, पंढरपूर आदी व अन्य भागातून मोठ्या संख्येने भाविक दिवसभर दर्शनासाठी स्वत:ची वाहने करुन येत असल्याचे चित्र होते.

**श्रावण मासाच्या प्रथम सोमवारनिमित्त परिसर भक्तीमय**

श्रावण मास संपेपर्यंत प्रत्येक सोमवारी व अन्य दिवशीही भाविक मोठ्या भक्तीने येथे दर्शनासाठी प्रतिवर्षी येत असतात. अमावस्या व महाशिवरात्रीला दर्शनासाठी प्रचंड गर्दी असते. हे मंदिर भिमानदी काठावर असल्याने नैसर्गिक चित्र पाहण्यासाठी भाविक येत असतात. त्याच बरोबर लग्नसोहळ्याचे पार्श्वभूमीवर नवीन वधू वर येथे प्रीवेडींग साठी येत असतात.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भागवत ग्रंथ हा अध्यात्मदीप होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि जुलै**

सर्व वेदांचा सार म्हणजे भागवत आहे. संसारामध्ये अडकलेला जो जीव आहे; त्याला प्रकाश देण्याचे काम जो दिवा करतो, तो दिवा म्हणजेच 'अध्यात्म दिवा' आहे. म्हणून,'भागवत म्हणजेच अध्यात्माचा दिवा आहे.' हा अध्यात्म नावाचा दिवा संपूर्ण जीवन प्रकाशित करीत असतो. भागवत जे अध्यात्मदीप आहे म्हणजेच भगवंत हे सुद्धा एक अध्यात्म दीपच आहे, असे निरुपणकार श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. ते आज श्रावणमास प्रवचनमालेतील चौथ्या दिवशी 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर बोलत होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ४

सुतमुनीने शौनकादी ऋषींना भागवताची संपन्नता सांगताना ते स्वानुभव अर्थात अनुभव संपन्न असलेले तथा ते सर्व वेदांचा सार आणि अध्यात्माचा दिवा आहे, असे सांगितले आहे.

भागवताच्या दशम स्कंदामध्ये देवकी भगवान श्रीकृष्णानाच्या अवतारासंबंधात वर्णन करताना भगवंतांला बोलणे, हे श्रीकृष्ण परमात्मा तू अव्यक्त आहेस, तुझे वर्णन शब्दांत मांडताना येत नाही, अरे तुझ्याविषयी नेमकं बोलताही येत नाही. तेव्हा, तू अद्यम् आहेस, तू ज्योतीस्वरुप आहेस, निर्विकार, निर्गुण, निर्विषयम् आहेस. तू निरहम् आहेस अर्थात क्रियारहित आहेस. तू सत्तामात्रम् आहेस आणि शेवटी हे भगवंता, तू अध्यात्मदीप आहेस असे सांगते. पुढे डॉ जयवंत महाराज यासंबंधीत चिंतन करताना, श्रोत्यांना वेदांतिक भूमिकांची उकल करतात. ते बोलतात की, ईश्वराकडे असलेली माया ही ईश्वराच्या अधीन म्हणजेच ताब्यात आहे. ईश्वराच्या मायेवर अंकुश आहे. परंतु, सामान्य जीव हा मायेच्या ताब्यात असतो. श्रीमद्भागवत ही केवळ कथा नाही तर कथामृत आहे. जे आपण गेली ३ दिवस मोठ्या तन्मयतेने ऐकत आहोत. वेदांताच्या दृष्टीने ही देवामृतामध्ये व कथामृतामध्ये असलेला फरक स्पष्ट करुन सांगितला. तसेच या कथामृताचे मौलिकत्व हे शुकाचार्य व राजा परिक्षिती यांच्या संवादातून स्पष्ट करतात. एकदा इंद्रदेव शुकाचार्यांकडे आला आणि म्हणाला, गुरुजी माझी एक विनंती आहे. आपणाकडे मी अमृताचा कलश घेऊन आलो आहे. तुम्ही हा कलश घ्या आणि तुमच्याकडे असलेली भागवत कथा मला द्या. शुकाचार्य म्हणाले, इंद्रा, तू अमृताच्या बदल्यात भागवत कथा मागत आहेस. ठीक आहे. प्रथम तू माझी एक गोष्ट ऐक! एका मनुष्याला रस्त्यावर चालताना काच दिसली. तो काच खिशात घालून तो जोहरीकडे गेला आणि म्हणाला तुम्ही हा काच घ्या आणि मला तुमच्याकडे असलेले रत्न द्या. याबद्दल तुला काय वाटते. इंद्र म्हणाला, गुरुजी वेडेपणा आहे हा! असं कुठे असतं का? दोघांचे मोल भिन्न आहे. कोण आहे असा मागणी करणारा मनुष्य! शुकाचार्य म्हणाले, इंद्रा तूच आहेस तो. म्हणून तुझ्या अमृतापेक्षा माझी भागवत कथा श्रेष्ठ आहे.

# देवेंद्र कोठे हे विकासाचा व्यापक विचार करणारे आमदार

- पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे गौरवोद्गार
- १४ कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

आमदार देवेंद्र कोठे यांचा विकासकामांसाठीचा पाठपुरावा आणि कामाचा झपाटा अफाट आहे. आमदार झाल्यानंतर अवघ्या सात महिन्यात शहर विकासाचा व्यापक विचार आणि कृती करणारे आमदार देवेंद्र कोठे हे राज्यातील कदाचित एकमेव आमदार आहेत, असे गौरवोद्गार राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी काढले.

शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील १४ कोटी रुपयांच्या निधी अंतर्गत रस्त्यांसह विविध विकासकामांचा शुभारंभ सोमवारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते कर्णिक नगर परिसरातील चिल्ड्रन पार्क मैदानावर करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी, महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, माजी आ. राजेंद्र राऊत, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजपाचे राज्य परिषद सदस्य विक्रम देशमुख, अविनाश महागावकर, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव,

आ. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, आ. देवेंद्र कोठे हे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लाडके आमदार आहेत. आ. देवेंद्र कोठे यांनी शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्याचा जोरदार प्रयत्न सुरू केला आहे. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी शहराचे आजवर नेतृत्व केले, त्यांचा विक्रम आमदार देवेंद्र कोठे निश्चितपणे मोडतील असा विश्वास आहे, असेही आ. सचिन कल्याणशेट्टी यांप्रसंगी म्हणाले. आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रास्ताविक केले. ऐश्वर्या हिबारे यांनी सूत्रसंचालन तर माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे यांनी आभार प्रदर्शन केले. १४ कोटी रुपयांच्या अंतर्गत रस्ते विकासकामांचा शुभारंभ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित शालेय विद्यार्थ्यांना ५५ हजार ५५५ वह्या वाटपाचा शुभारंभ, सोलापूर महानगरपालिकेच्या ६ आयुष्यमान आरोग्य मंदिराचे उद्घाटन, अक्कलकोट रोड शासकीय तंत्रनिकेतन लगत अर्बन मल्टी स्ट्रीट पार्कचे उद्घाटन यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.



### मुख्यमंत्री, मी आणि संपूर्ण पक्ष तुमच्या पाठीशी

भाजपा हा काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभा राहणारा पक्ष आहे. जिथे आहोत तिथे प्रामाणिकपणे राहणे आणि सेवा करणे हा देवेंद्र कोठे यांचा विशेष गुण आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मी आणि भारतीय जनता पार्टी देवेंद्र कोठे यांच्या पाठीशी कायम उभी आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांप्रसंगी म्हणाले.

### मुख्यमंत्री फडणवीस यांना अभिप्रेत कार्यक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या वाढदिवसासाठी कार्यकर्त्यांनी अनावश्यक खर्च करू नये असे आवाहन केले होते. त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेला शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता सहाय्यभूत करणारा ५५ हजार ५५५ वह्या वाटपाचा कार्यक्रम आणि विकासकामांचे उद्घाटन केले.

**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

### यांचा झाला भाजप प्रवेश

या कार्यक्रमात माजी नगरसेवक भारतसिंग बडूरवाले, माजी नगरसेविका सारिका सुरवसे, सतीश सुरवसे, शिवराम प्रतिष्ठानचे श्रीकांत वाडेकर, रुपेश जक्कल, रतिकांत कमलापुरे, कांताताई बनसोडे यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. त्यांना पक्षाचे उपरणे परिधान करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पक्षात प्रवेश दिला.



## भारती विद्यापीठ बालविकास मंदिरात नागपंचमी सण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

भारती विद्यापीठ बाल विकास मंदिरात नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी नटून थटून फेराच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

बालविकास विभागाच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे यांच्या हस्ते नागोबाचे पूजन करण्यात आले. नाग देवतेच्या पूजनानंतर फेर धरून पंचमीची गाणी या ग या सयानो तुम्ही चल ग सखे वारुळाला ही फेराची गाणी शेंडे, तोटद, म्हेत्रे, इनामदार यांनी म्हटली. त्यानंतर झिम्मा, फुगडी, दंड फुगडी हे पारंपरिक खेळ सादर करण्यात आले.

मुख्याध्यापिका वैशाली मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षिका वैशाली शिंदे, संतोषी शेंडे, दीपा तोटद, भाग्यश्री म्हेत्रे, भाग्यश्री शिरसीकर, वृषाली इनामदार तसेच गौराबाई हलसंगी, प्राजक्ता मोकाशी यांच्या सहकार्याने नागपंचमी हा सण पार पडला.

## पाठलाग करून तरुणीचा विनयभंग

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

मागील दहा महिन्यांपासून सतत पाठलाग करून तरुणीचा विनयभंग करणाऱ्या विरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून अल्ताफ शेख या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी अल्ताफ हा पीडितेचा गतवर्षीच्या ऑक्टोबर महिन्यापासून पाठलाग करत आहे. तसेच पीडितेने त्याच्याबरोबर लग्न करावे म्हणून सतत फोन करतो. यातूनच आरोपी पीडीतेचा मागील दहा महिन्यांपासून सतत पाठलाग करून तिच्या मनातला जे वाटेल असे कृत्य करत होता. याप्रकरणी २७ जुलै रोजी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

## अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाच्या मिरवणुकांना रात्री बारा वाजेपर्यंत परवाना द्या

### मातंग समाजाचे निवेदन, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रशासनाला सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाच्या मिरवणुकांना रात्री बारा वाजेपर्यंतचा परवाना द्या, असे निवेदन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मातंग समाजाने दिले आहे. यावेळी सुरेश पाटोळे, गोविंद कांबळे, शांतीलाल साबळे, मिथुन लोखंडे, अभिषेक हटकर, आदित्य शिंदे, बंडू गवळी, सतीश बगाडे आदी पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. त्यांनतर हा परवाना देण्याच्या सूचना पालकमंत्री गोरे यांनी पोलिस प्रशासनाला दिले आहेत.

शहरात दरवर्षी १ ऑगस्टपासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी केली जाते. सन १९९४ पासून सुरू झालेला हा सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक प्रबोधनाचा उपक्रम मागील ३० वर्षांपासून समाजात भरीव योगदान देत आहे. या उत्सवाची सांगता दरवर्षी रविवारी भव्य मिरवणुकीच्या संचलनाने केली जाते. यावर्षी रविवार ३ ऑगस्ट रोजी भव्य मिरवणुकीने जयंती उत्सवाची सांगता होणार आहे. यामध्ये ६० जयंती उत्सव मंडळे आकर्षक देखाव्यांसह सहभागी होणार आहेत . पोलीस प्रशासनाकडून दरवर्षी मिरवणुकीसाठी रात्री १०:०० वाजेपर्यंतच परवानगी दिली जात होता. त्यामुळे वेळेअभावी अनेक मंडळांना मिरवणूक अपूर्ण ठेवावी लागत होती. त्यामुळे त्यांनी उभा केलेले समाज प्रबोधनात्मक देखावे लोकांना पाहणे शक्य होत नव्हते.



## नागपंचमीनिमित्त महिलांना सौंदर्य साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

हिंदू संस्कृतीतील श्रावण महिना हा भक्तिभाव, व्रते-वैकल्ये व सण-उत्सवांनी नटलेला असतो. यामध्ये नागपंचमी हा महिलांचा विशेष आवडीचा सण असतो. या सणात मेंदी, नेलपेंट आणि पारंपरिक शृंगार यांना विशेष महत्त्व असते. परंतु समाजात अजूनही एक असा वर्ग आहे, जो या आनंदापासून वंचित आहे त्या अनाथ, मानसिकदृष्ट्या अस्वस्थ किंवा दुर्लक्षित महिलांना नागपंचमीनिमित्त सौंदर्य साहित्याचे वाटप करण्यात आले.



या पार्श्वभूमीवर आस्था फाऊंडेशनच्या वतीने यंदा नागपंचमी एक सामाजिक बांधिलकीचा सण ठरला. एम्प्लॉयमेंट चौकातील मंगलदृष्टी या संस्थेत राहणाऱ्या वृद्ध, मानसिकदृष्ट्या अस्वस्थ महिलांना नेलपेंट, मेंदी, टिकल्या, कंगवे, केसांचे क्लिप्स, सुगंधी साबण, हात रुमाल, मोत्याचे माळ, कानातले रिंगा व पाँड्स पावडर यांचा सुंदर गिफ्ट बॉक्स देण्यात आला.

उमा (बिहार), सरस्वती आजी (आंध्रप्रदेश) आणि वंदना (सोलापूर) या महिलांनी या सौंदर्य साहित्याचा आनंद लुटताना डोळ्यांतून आनंदाश्रू ढाळले. उपस्थित महिलांबरोबर फेर धरून गाणी गायली, गोडधोड खाऊ वाटला गेला. काही महिलांना स्वयंसेविकांनी प्रेमाने मेंदी लावली, नखांवर नेलपेंट लावले आणि त्यांच्या चेहऱ्यावर उमललेले हास्य उपस्थित प्रत्येकाच्या मनात घर करून गेले. सोलापूर मधील संस्कार आश्रम, वासल्य निराधार आश्रम, आधार निराधार आश्रम, मंगलदृष्टी निराधार आश्रम, कुष्ठरोग वसाहत, बेघर निवारा केंद्र, तसेच झोपडपट्ट्यांमधील निराधार महिलांसह हा उत्सव साजरा करण्यात करण्यात आला. या प्रसंगी नीलिमा हिरेमठ, कांचन हिरेमठ, छाया गंगणे, संपदा जोशी, सविता जोशी, अनिता तालीकोटी, सुरेखा पाटील, विजयालक्ष्मी सिरसी, सविता उपाध्ये, शारदा जोशी, शैला दिडवणीय, स्वामी चराटे मॅडम आणि गवळी ताई, राधा वहिनी, प्रकाश डांगरे, पुष्कर पुकाळे, अविनाश मार्चल ,विजय छंचुरे उपस्थित होते.

## मराठी बालनाट्य दिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

संपूर्ण भारतामध्ये मराठी बालरंगभूमीची समृध्द परंपरा असून, मराठी बालनाट्यालाही ६६ वर्षांची समृध्द परंपरा लाभली आहे. मराठी बालनाट्यांचे सर्वात जास्त प्रयोग महाराष्ट्रात होत असतात. २ ऑगस्ट १९५९ रोजी पहिल्या व्यावसायिक बालनाट्याचा प्रयोग झाला म्हणून बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट हा 'मराठी बालनाट्य दिवस' म्हणून साजरा करणार असल्याची माहिती बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांनी दिली आहे.

बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न संस्था असून, या संस्थेतर्फे महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये मराठी बालनाट्य दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. मराठी बालनाट्य दिवसानिमित्त बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेतर्फे सोलापुरातील बालकलावंतांचे एकपात्री प्रयोग,नाट्यछटा व दिव्यांग विद्यार्थ्यांची एकांकिका सादरीकरण या उपक्रमांचे आयोजन केले असून, या उपक्रमाला शहरातील बालकलावंत, पालक, शिक्षक व बालप्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेचे पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष- |
| दि. ३० जुलै २०२५ | कल्की जयंती, बुध पूजन |
| विक्रम संवत् २०८२ | श्रीयाळ षष्ठी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. षष्ठी (२६.४०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (२१.५१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिद्ध (२७.३८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (१३.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

## रस्त्यात अडवून अंगावरील ओढणी ओढून विनयभंग

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

मेडिकल दुकानातून घराकडे पायी चालत जात असलेल्या अल्पवयीन मुलीच्या अंगावरील ओढणी ओढून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून अविनाश पुंडलिक कांबळे ( वय २४, या. चिखडे या बार्शी) विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साधारण एप्रिल महिन्यात यातील पीडिता घराकडे पायी जात होती त्यावेळी आरोपीने तिच्या मोबाईलवर फोन करून मला तुला भेटायचे आहे असे बोलला. त्यावर पीडितेने काही संबंध नाही असे म्हणून फोन बंद केला. या घटनेनंतर काही वेळाने पीडिता मेडिकल दुकानातून गोळ्या घेऊन घराकडे पायी जात होते त्यावेळी दुचाकीवरून आरोपी तिथे आला त्याने पीडितच्या अंगावरील ओढणी ओढून त्याच्या जवळील असलेल्या बाटलीतील पाणी तिच्या अंगावर ओतले. यानंतर २६ जुलै रोजी दुपारी यातील पीडीतेचा भाऊ हा शिकवणीकरिता जात होता त्यावेळी यातील आरोपीने त्यास अडविले. त्याला शिवीगाळ करून तुझ्या बहिणीला भेटायला सांग नाहीतर तुला ठार मारेन अशी धमकी दिली. हा गुन्हा पांगरी पोलीस स्टेशन येथे तपासासाठी वर्ग करण्यात आला आहे.

## क्रीडाप्रमाणे नाट्य क्षेत्रातही नोकरी व प्रवेश प्रक्रियेत आरक्षण आवश्यक

### अस्तित्व मेकर फाउंडेशन महोत्सवाचे अध्यक्ष संजय सावंत यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

क्रीडा प्रमाणे नाट्य क्षेत्रात सुद्धा नोकरी व प्रवेश प्रक्रियेत आरक्षण आवश्यक असल्याचे मत अस्तित्व मेकर फाउंडेशनच्या महोत्सवाचे अध्यक्ष संजय सावंत यांनी व्यक्त केले.

अस्तित्व मेकर फाउंडेशनच्या पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते. नाट्य प्रशिक्षक दिग्दर्शक कलाकार छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रदीप घारे यांना रंगसाधक पुरस्काराने मानपत्र सन्मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुणे हास्य जत्राचे सचिन गोस्वामी यांच्या हस्ते गौरवण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, स्मृतीचिन्ह, रोख ११ हजार रुपये व शाल, श्रीफळ असे होते.

डॉ. दिलीप घारे म्हणाले, कलेने माणूस परिपक्व होतो. कली माणसाला विशिष्ट अशा उंचीवर नेते. मी कोण आहे याचा शोध रंगभूमीवर आल्यावर लागतो. कलाकार हा त्याच्या धुंदीमध्ये जगणारा असतो.

कोणत्याही क्षेत्रामध्ये शिक्षण घेत असताना आपण आपली अंगभूत कला जपणे गरजेचे असते. शिक्षक हे पुस्तकी ज्ञान शिकवतात पण अंगभूत कला विकसित करणे हे आपलं कर्तव्य असतं. जो शिक्षक पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रॅक्टिकली ज्ञान देऊन विद्यार्थी घडवतो तोच खरा शिक्षक असतो. कला ही माणसाला आनंद आणि समाधान देते त्यामुळे कलाकार माणूस प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवतो. असे मत लेखक व दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांनी व्यक्त केले.

यावेळी अस्तित्व मेकर फाउंडेशनचे अध्यक्ष किरण लोंढे, लेखक व दिग्दर्शक सचिन गोस्वामी, हास्यजत्रा फेम कलाकार सचिन गावडे, प्रवीण डाळिंबकर, प्रा. अशोक निबर्गी, ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. बाबासाहेब जाधव, जेष्ठ रंगकर्मी विद्या काळे, विजय साळूंखे, अविनाश गोडसे, डॉ. केदारनाथ काळवणे, मिलिंद हिंगमिरे, अमित रोडगे, दत्ता गायकवाड, सुमित फुलमामडी, गोवर्धन कमटम, प्रशांत बडवे व कृष्णकांत चव्हाण, प्रमुख संयोजक ॲड. बसवराज सलगर व आदी मान्यवर उपस्थित होते.



### वैभव दीप नाट्य संस्थेची 'मुलाखत' प्रथम

अस्तित्व मेकर्स फाउंडेशनच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धेत सोलापुरातील वैभव दीप नाट्य संस्थेची मुलाखत या लघुनाटिकेने प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय - नाट्यालय सोलापूर, तृतीय - नाट्य परिषद शाखा लातूर. उत्कृष्ट दिग्दर्शक - दिपक शिंदे, द्वितीय - विजय मस्के, तृतीय - आर्यन गिरवलकर. लेखन प्रथम - अभिजीत केंगार, द्वितीय - प्रतिक्षा पाटवकर, तृतीय - वैभव कवडे. अभिनय (पुरुष) प्रथम - विजय मस्के, द्वितीय - प्रतिक तांदळे, तृतीय - अभिजीत केंगार. अभिनय (स्त्री) प्रथम - अक्षता साळवी, द्वितीय - अपर्णा पवार, तृतीय - श्रावणी पडवी. अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्रे - दर्शना गुडू

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मंद्रुप परिसरात १०१ झाडांचे वृक्षारोपण

**मंद्रूप, दि. २९ जुलै-**

दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेतर्फे पर्यावरण रक्षणासाठी मंद्रूपसह परिसरात १०१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात येत असून या उपक्रमाची सुरुवात मंद्रूप पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, अप्पाराव कोरे, हवालदार सचिन मसलखांब, पत्रकार संघाचे अध्यक्ष पंचाक्षरी स्वामी, संघटनेचे सल्लागार अमोगसिध्द लांडगे व बबलू शेख, उपाध्यक्ष बालाजी वाघे, सचिव नितीन वारे, सहसचिव अप्पू देशमुख, संघटक अशोक सोनकंटले, गजानन काळे, आरिफ शेख, समीर शेख, दिनकर नारायणकर, गिरमल्ल गुरव, महेश पवार, अभिजीत जवळकोटे, प्रभू पुजारी उपस्थित होते.




### इनरव्हील क्लब ऑफ हार्मनीच्या अध्यक्षपदी किशोरी राठी; सचिवपदी आशा सेठिया

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

येथील इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर हार्मनीच्या अध्यक्षपदी किशोरी राठी तर सचिवपदी आशा सेठिया यांचा पदग्रहण समारंभ नुकताच संपन्न झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. स्मिता चाकोते व पद्मजा अय्यंगार उपस्थित होत्या. गुजरात भवन येथे पार पडलेल्या या समारंभात खालील संचालक मंडळांनी पदभार स्वीकारला. उपाध्यक्ष नेहा राठी, खजिनदार भरती कंकारिया, आईअसओ संगीता मेहता, सीपीसीसी अर्चना जाजू, संपादक स्मिता चांडक, संचालक मधू राठी, रितू राठी, पूजा भुताडा, बिना तोशनिवाल. सलअगर पीए अस पीडीसी अनुराधा चांडक, पीपी हेमा काबरा. सूत्रसंचालन ज्योती भंडारी, आभार नेहा राठी यांनी मानले.



### माजी आमदार सुमन पाटील यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

दिवंगत गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या पत्नी माजी आमदार सुमनताई पाटील यांचा अक्कलकोट येथे माजी नगरसेवक रामचंद्र ससाणे यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. त्या नुकत्याच येथे आल्या होत्या. स्वामी भक्त तथा माजी नगरसेवक रामचंद्र समाणे यांच्या कला-नाग निवासस्थानी आगमन झाल्यावर श्रींची प्रतिमा व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राजकुमार कांदे, देवीदास कवटगी, सचिन स्वामी, प्रशांत दणुरे समर्थ महामुनी उपस्थित होते.

### डोणगाव रोडवरील साठे-शिंदे वस्तीवरून ३७ हजारांची वायर चोरी

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

डोणगाव रोडवरील साठे शिंदे वस्तीवरून चोरट्याने ३७ हजार रुपयांची पॉलीकॅब वायरचे बंडल चोरून नेले. याबाबत तुषार तानाजी कोकरे (वय १९, रा. साठे शिंदे वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ जुलै ते २७ जुलै या दरम्याना तुषार कोकरे यांच्या घरातील खोलीमध्ये पॉलीकॅब वायरचे बंडल कडी कोयंडा लावून ठेवले होते. त्यावेळी चोरट्याने घरचा कडी कोयंडा लूज करून घरातून वायरचे बंडल चोरून नेले. म्हणून सलग वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कुंभार पुढील तपास करीत आहेत.

### युनायटेड वेस्टर्न-आयडीबीआयच्या सेवानिवृत्तांचे ३ ऑगस्टला अधिवेशन

**सोलापूर, दि. २९ जुलै-**

युनायटेड वेस्टर्न बँक आणि आयडीबीआय बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे वार्षिक अधिवेशन आणि २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या ३ ऑगस्ट २०२५ रोजी जुळे सोलापुरातील कमला शांती पॅलेस, विजापूर रोड, विशाल नगर या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष अनंत कुलकर्णी यांनी दिली. दरवर्षी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांमध्ये अधिवेशने घेतली जातात.त्याप्रमाणे यावर्षी सोलापूर येथे अधिवेशन होत आहे. पंचांगकर्ते मोहनराव दाते यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. तसेच अधिवेशनामध्ये ज्या सभासदांची वयाची ७५ वर्ष पूर्ण झालेली आहेत त्यांचा विशेष सत्कार केला जाणार. आहे. त्याचप्रमाणे सभासदांचे प्रलंबित प्रश्नांवरही अधिवेशनात चर्चा होईल, असेही कुलकर्णी यांनी सांगितले. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय पुणे येथे असून देशभरात या संघटनेचे सुमारे १७०० सदस्य असून या अधिवेशनाला संघटनेचे सर्व पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष, सरचिटणीस यांच्यासह देशभरातून अनेक सदस्य असे मिळून सुमारे संघटनेचे ५०० सभासद या अधिवेशनाला उपस्थित राहणार आहेत. युनाइटेड वेस्टर्न बँकेची स्थापना, सातारा येथे अण्णासाहेब चिरमुले यांनी केली होती. आक्टोंबर २००६ मध्ये युनाइटेड वेस्टर्न बँक आयडीबीआय बँकेत विलीन झाली होती. युनायटेड वेस्टर्न बँक व आयडीबीआय बँकेतील सभासदांना वैद्यकीय व इतर कारणासाठी मदत करणे या उद्देशाने संघटना कार्यरत असल्याचे विभागीय सचिव दत्तराज कुलकर्णी यांनी सांगितले.

# मोडनिंबमध्ये देव भेटीचा सोहळा उत्साहात

- श्रावणातील परंपरेनुसार पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २९ जुलै-**

श्रावण मासाच्या पहिल्या सोमवारी मोडनिंब(ता.माढा) येथील श्री महालिंगेश्वर मंदिरातून शहरातील पांढरी परिसरातील श्री महादेवाच्या मंदिरात पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. परंपरेनुसार श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी हा पालखी सोहळा आयोजित केला जातो. सकाळी ९ वाजता भजनी मंडळ, बँड पथक आणि भाविकांच्या उपस्थितीत पालखी निघाली.



ग्रामप्रदक्षिणा करत महालिंगेश्वर मंदिरापासून, ग्रामदैवत वेताळबाबा मंदिरासमोरील गोल परिसरातून पांढरी येथील श्री महादेव मंदिरात पोहोचताच अभिषेक व आरती करण्यात आली.या मंदिरात देव भेटीचा सोहळा पार पडला.पारंपारिक माने कुटुंबीयांकडून देवास आहेर अर्पण करण्यात आला.पांढरी ग्रामस्थांनी भाविकांसाठी चहा, केळी व अल्पोपहाराचे वाटप केले. यानंतर पालखी मोडनिंबकडे परत निघाली. पालखी सोहळ्यात महालिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे किरण तोडकरी, जयवंत समुद्र, शीतल महाडिक, विजय पवार, नागेश तोडकरी, महामुनी यांच्यासह माने व चोपडे कुटुंबातील तरुण सहभागी झाले होते.

#### महादेव पिंडीची आख्यायिका

पांढरी परिसरात पूर्वीचे गाव वसलेले होते. आजही काही प्रमाणात मानवी वसाहतीच्या खुणा तेथे आढळतात. प्लेगच्या साथीत स्थलांतराने सध्याचे मोडनिंब वसविण्यात आले. पांढरीवरील जुन्या मंदिरातील महादेवाची पिंडही स्थलांतरित करण्याचा प्रयत्न झाला; परंतु अनेक फूट खोल खोदूनही पिंड काढता आली नाही, अशी आख्यायिका सांगितली जाते.

#### दर्शनासाठी भाविकांची गर्दी

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री.महालिंगेश्वर मंदिरात सोमवारी सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. देव भेटीचा सोहळा पार पडला. श्रावणनिमित्त मंदिर परिसरामध्ये स्वच्छता, फुलांची सजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा होत्या. महिला व पुरुष अशा दोन स्वतंत्र रांगा करून दर्शनासाठी सोडण्यात येत होते. नमो पार्वते शिव हर हर महादेव च्या जल्लोषात भाविक दर्शन घेत होते.

## रिक्षाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

शहरातील समर्थ नगर येथे रिक्षाच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. याबाबत सचिन गिरीधर अलकुटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तानाजी भारत चौरे (रा. गवळी वस्ती, लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ८ जुलै रोजी सचिन अलकुंटे आणि मित्र सनी हे दोघे एमएच ०२ डीएल ५९७० वरून समर्थ नगर येथे जात होते. त्यावेळी रिक्षा क्र. एमएच १३ ईएफ २२२० चा चालक तानाजी भारत चौरे याने रिक्षा रॉंगसाईडने चालवून दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये सचिन अलकुंटे व सनी हे दोघे जखमी झाले. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्रातील पहिली औषधी आणि दुर्मिळ वृक्ष नर्सरी बार्शीत

- पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी
- सेंद्रिय शेती कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ जुलै-**

कसारवाडी रोड येथे महाराष्ट्रातील पहिली औषधी आणि दुर्मिळ वृक्षांची नर्सरी उभारली आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते नर्सरीचे उद्घाटन झाले.

या सोबतच, मिशन विकसित गाव अभियानांतर्गत शेतकऱ्यांना आधुनिक आणि सेंद्रिय शेतीचे मार्गदर्शन देण्यासाठी २६ जुलै रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

बार्शी शहर व तालुका, पांगरी आणि वैराग पोलीस ठाण्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत अंकुश पाटील (सांगली), विद्यासागर कोळी (लातूर), प्रकाश पवार (जळगाव) आणि विनायक पाटील यांनी शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती आणि उत्पन्न वाढीच्या तंत्रांवर मार्गदर्शन केले. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी उद्घाटन केले.



#### मिशन विकसित गाव

अतुल कुलकर्णी यांनी धस पिंपळगाव गाव दत्तक घेतले असून, तेथे ७०० आणि गाताचीवाडी येथे १००० वृक्षांची लागवड केली. त्यांनी पाणी अडविणे, शेततळे बांधणे, वृक्ष लागवड आणि सेंद्रिय शेतीवर भर देत शेतकऱ्यांना व्यापारी शेतात येऊन शेतमाल खरेदी करतील, अशी व्यवस्था निर्माण करण्याचे आवाहन केले.

#### पोलिसांचा पथदर्शी उपक्रम

पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी बार्शी पोलिसांचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे. अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांचे मार्गदर्शन या उपक्रमांना लाभले.

#### औषधी वृक्ष नर्सरी

नव्याने उभारलेल्या नर्सरीत ३० प्रकारच्या दुर्मिळ आणि औषधी वनस्पतींची ५००० रोपे तयार करण्यात आली आहेत. ही रोपे 'हरित वारी' उपक्रमासाठी उपयोगी ठरणार आहेत. नर्सरी उभारणीत पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

#### वृक्ष संवर्धन समितीचा सन्मान

बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीने पर्यावरण संतुलनासाठी केलेल्या कार्याबद्दल अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. रुद्राक्ष थेरप-कार्यशाळेदरम्यान गुरु भांगे यांनी १५० शेतकऱ्यांना मोफत रुद्राक्ष थेरपी दिली.

## अरण परिसरात बिबट्याचे दर्शन

**मोडनिंब, दि. २९ जुलै-**

अरण (ता. माढा) येथील टोणपे वस्तीवर सोमवार (दि.२८) रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निमर्ण झाले आहे. येथील शेतकरी शेळके हे आपल्या शेतातील बागेत फवारणी करीत असताना, अचानक त्यांना डोक्यावरील बॅटरीच्या प्रकाशात सुमारे पंचवीस ते तीस फूट अंतरावर बिबट्या दिसला.ही दृश्ये पाहताच त्यांनी लगेचच जवळच उभ्या असलेल्या मोटरसायकलची जोरात रेस दिली. त्या आवाजाने घाबरून बिबट्याने तात्काळ पळ काढला. या घटनेनंतर त्यांनी गावकऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर शेतात बिबट्याच्या पायांचे ठसेही आढळून आल्याचे स्थानिकांनी सांगितले.सध्या अरण व परिसरात भीतीचे वातावरण असून वनविभगाकडून तत्काळ पावले उचलण्याची ग्रामस्थांची मागणी आहे.

## भावसार व्हिजनच्या वतीने २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

भावसार व्हिजन सोलापूर क्लबच्या वतीने रविवारी हॉटेल साईप्रसाद येथे २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नॅशनल प्रेसिडेंट बाळकृष्ण क्षीरसागर, एरिया गव्हर्नर श्रीकांत रंगदळ, समाज अध्यक्ष राजकुमार हंचाटे, क्लबचे अध्यक्ष विशाल खमितकर, सचिव आशिष जवळकर, नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे आदी उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अनेक समाजसुधारकांनी शिक्षणाला महत्त्व दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे हे बिजांकुर रोवण्याचे काम भावसार व्हिजन क्लबकडून होत असल्याचे सांगून समाजाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांना व समाजाला शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रेसर करणारा ठरणार असल्याचे सांगितले.

विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल हरी श्रीनिवास अंबरकर, नेत्रा विशाल खमितकर, जान्हवी संदेश तांदळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्रीराज निकते, संतोष पुकाळे, मल्लिनाथ बासुतकर, प्रणिता महिंद्रकर, नम्रता पुकाळे, वंदना पुकाळे, तेजस्विनी माळवदकर, हर्षल माळवदकर, दीपक महिंद्रकर, सुहास राशिनकर, सुनील उपरे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गिरीश पुकाळे यांनी केले, तर आशिष जवळकर यांनी आभार मानले.

## टेंभूर्णीत पतंगाचा मांजा अडकून १३ वर्षीय मुलगा जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२९ जुलै-**

टेंभुर्णी (ता.माढा) येथे पतंगाचा मांजा अडकल्याने प्रियांशु बाळासाहेब कदम (वय १३ बेंबळे रोड टेंभुर्णी) हा मुलगा जखमी झाला असून त्याचे चेह-यावर तीन ठिकाणी टाके घेण्यात आले आहेत. ही घटना जयश्री हॉस्पिटल समोर बेंबळे रोडला सोमवारी सायंकाळी ७ चे सुमारास घडली.

चायनिज मांजा हा जीवघेणा असून त्यामूळे अनेकांना जीव गमवावा लागल्याने त्याचे विकण्यावर बंदी आणण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, प्रियांशु बाळासाहेब कदम हा सोमवार दि २८ रोजी किराणा दुकानाला खरेदी करण्यासाठी गेला होता. माघारी परत येताना बेंबळे रोडच्या जयश्री हॉस्पिटलच्या समोरून येत असताना तुटलेल्या पतंगाचा मांजा त्यांचे तोंडावर अडकला यामध्ये त्यांचे नाकाचे वर डोळ्यांचे



बाजूला व कानाचे मागील बाजूस मांजाने कापूस रक्तबंबाळ झाले आहे.यामध्ये तीन ठिकाणी खोलवर कापले असून तीन्ही ठिकाणी टाके पडले आहे.या घटनेमुळे मांजा लावून पतंग उडवणारे आणि मांजा विकणा-या दुकानातून मांजा जप्त करून दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी केली आहे.

> टेंभूर्णी शहरातील स्टेशनरी दुकानांमध्ये पतंगाचा मांजा विकण्यास बंदी असताना जर कोणी विकत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल व कोण पतंग मांजा लावून उडवत असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल
>
> **- नारायण पवार, पोलिस निरीक्षक, टेंभुर्णी पोलिस स्टेशन**

## सलगर येथे स्वामींचे ४१ दिवस मौनव्रत अनुष्ठान



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २९ जुलै-**

तालुक्यातील सलगर येथील श्री शिवबसवेश्वर विरक्त मठाचे उत्तराधिकारी श्री लिंगय्या देवरु स्वामीजी पवित्र श्रावण मासनिमित्त श्री सिध्देश्वर मंदिर गुडकारूणी सलगर येथे लोककल्याणार्थ व सर्वांचे उद्धार करीता सलग ४१ दिवसाचे मौन अनुष्ठानास बसले आहेत.

तरी भोसगे, चिककेहळी, तोरणी, संगोगी (आ), बणजगोळ, सदलापूर, निंगदळी, कामनहळळी, आंबेवाड, सखरगा, भिमपूर, हिरोळी, किणगी व सलगर या सर्व पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन विरक्त मठाच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

## मंजूर झालेल्या ६५ एकर जागेवरच महात्मा बसवेश्वरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक करा

- न झाल्यास आंदोलन छेडण्याचा शिवा संघटनेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचे महाराजाच्या मंगळवेढा येथील नियोजित आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक शासनाकडून मंजूर झालेल्या ६५ एकर जमिनीवरच झाले पाहिजे. यात बदल करून स्मारक लहान करण्याचा प्रयत्न केल्यास शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना राज्यस्तरीय आंदोलन छेडणार आहे, असा इशारा शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिला.

शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वात अनेक वर्षे पाठपुरावा,आंदोलन,निवेदनाद्वारे तसेच मागणी नुसार मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वर महाराजांच्या अंतरराष्ट्रीय स्मारकाची मंजुरी होऊन तात्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी १८ मार्च २०१५ रोजी अर्थसंकल्प मांडताना मंगळवेढा येथील कृषी विभाग ६५ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय स्मारकाची मंजुरी देऊन घोषणाही केली. परंतु त्यात यात बदल करून स्मारक लहान करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जिल्हाध्यक्ष शरणराज केंगनाळकर म्हणाले, शिवा संघटनेच्या राज्यव्यापी आंदोलन, मोर्चा व अनेक वर्षांच्या मागणी नुसार व ८५ लाख वीरशैव लिंगायत समाज व बहुजन समाजाच्या मागणीनुसार राज्य शासनाने जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकासाठी मंगळवेढा येथील कृषी विभागाची ६५ एकर जागेवर तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर यास मंजुरी मिळाली होती.तसेच यास निधीही मंजूर करण्यात आला होता.मात्र काही मंडळींनी यात खो घालून जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाला एक प्रकारे विरोधच सुरू केला आहे. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी स्मारकाची जागा बदलून मंगळवेढा येथील कृष्णा तलावाशेजारील जमिनीवर गाव पातळीवरील स्मारक करण्याचा डाव काहीजण आखत आहेत, असा आरोप शरणराज केंगनाळकर यांनी केला आहे. मंगळवेढा ही जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची कर्मभूमी असल्यामुळे जगाला हेवा वाटेल असे आंतरराष्ट्रीय दर्जाचेच स्मारक ६५ एकरातच व्हावे, अशी शिवा संघटनेची मागणी आहे. नियोजित आंतरराष्ट्रीय स्मारकाची ६५ एकराची जागा कमी करून बसवभक्तांच्या भावनेशी खेळण्याचा प्रयत्न झाला तर शिवा संघटना गप्प बसणार नसून या विरोधात राज्यभर तीव्र संघर्ष उभा करणार आहे, असेही जिल्हाध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस महातेश पाटील, ओमप्रकाश बाबळे, अप्पू यलशेट्टी, मल्लिनाथ पाटील, परमेश्वर अरबाळे, महेश इचगे, परमेश्वर माळगे, संगमेश्वर कांबळे, राजकुमार सारणे, राम वाकसे आदी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये नागपंचमी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ जुलै-**

नागपंचमी हा एक पवित्र आणि महत्वाचा सण आहे. जो श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील पंचमीला साजरा केला जातो.

नागपंचमी म्हणजे निसर्ग, देव, प्राणी आणि मानव यांच्यातील सौहार्दाचे प्रतीक. या दिवशी सर्प (नाग) देवतेची पूजा केली जाते.

असा हा पवित्र नागपंचमी सण सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला येथे उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व उपस्थितांनी नागदेवतेची पूजा करून या सणानिमित्ताने महाविद्यालयाने सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी झोक्याची सुविधा करून दिली.





## महत्त्वाचे



### नवीन पोस्ट ऑफिसेस व बीएसएनएल सेवा सुरू करा

**खा. धैर्यशील मोहिते-पाटलांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली मागणी**

**अकलूज, दि. २९ जुलै-**

माढा लोकसभा मतदारसंघामधील अनेक गावांमध्ये पोस्ट ऑफिसेस नाहीत त्याचबरोबर बीएसएनएलची सेवा देखील उपलब्ध नाही त्यामुळे तात्काळ या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे दिल्ली येथे भेटून निवेदन सादर करून केली आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पोस्ट ऑफिस उपलब्ध नाहीत त्यामुळे शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सामान्य जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.पोस्ट ऑफिसची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण विकासात मोठा अडथळा निर्माण होत आहे यासाठी सातारा व सोलापूर जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये पोस्ट ऑफिस नाहीत तेथे तत्काळ नवीन शाखा पोस्ट ऑफिस उघडण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी त्याचबरोबर बीएसएनएल संदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी डोंगराळ क्षेत्र आहे या गावांमध्ये रेंज चा प्रॉब्लेम आहे त्याच्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नेटवर्कची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील लोकांना डिजिटल च्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे तरी फोर जी सेंचुरेशन योजना अंतर्गत अशा ठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यात यावे याचा लोकांना लाभही मिळेल आणि बीएसएनएलचे ग्राहकही वाढतील, अशी मागणी त्यांनी केली आहे.



### अन्नछत्र मंडळाकडून दैवी कार्य : पनवेलचे आमदार विक्रांत पाटील

**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून दैवी कार्य घडत असल्याचे मनोगत आमदार विक्रांत पाटील (वि.प.स.) पनवेल यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत भाजपा जेष्ठ नेते व आमदार विक्रांत पाटील यांचे पिताश्री बाळासाहेब पाटील पनवेल, अक्कलकोट मध्यचे भाजपा मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, अंकुश अवताडे, अनिल तुप्पद, डॉ.सागर हिप्परगी, नागराज कुंभार, लखन झंपले, गुरु कुंभार, शेखर झंपले आदी उपस्थित होते. यावेळी न्यासाचे प्रवीण घाडगे, विजय माने, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, सचिन स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, राहुल इंडे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.




### साई मेडिकल कॉलेजमध्ये हिपॅटायटिस दिनानिमित्त जागृती

**वैराग, दि. २९ जुलै-**

सासुरे वैराग येथील साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेज व रुग्णालय यांच्यातर्फे जागतिक हिपॅटायटिस दिनानिमित्त यकृत विकाराबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दत्तात्रय पिसाळ होते. यावेळी प्राचार्य व वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक अनपट यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात हिपॅटायटिसचे प्रकार ( A, B, C, D, E), त्यांचे संसर्गाचे मार्ग, जोखीम गट, प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण, तसेच उपलब्ध उपचार पद्धती यांची सविस्तर माहिती दिली. विशेषतः वैद्यकीय विद्यार्थी, नर्सिंग स्टाफ आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांना या आजाराविषयी सजग राहणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला. अध्यक्षीय भाषण डॉ. पिसाळ यांनी केले. यावेळी डॉ. वर्षा कुंभार यांनी हिपॅटायटिसचे आरोग्यावर होणारे परिणाम, सामाजिक दृष्टीने त्याचे महत्त्व, आणि त्याविषयी होमिओपॅथी उपचारांच्या शक्यता यावर विचार मांडले. डॉ स्वाधिका देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. स्वप्नाली बुरांडे यांनी आभार मानले. संयोजन राहुल अवचारे, संपत माने यांनी केले.

## जाधववाडीत बिबट्याचा धुमाकूळ दोन वासरांचा पाडला फडशा

■ नागरिक भयभीत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२९ जुलै-**

माढा तालुक्यातील मोडनिंब नजीक जाधववाडी हद्दीत मंगळवारी पहाटे बिबट्याने धुमाकुळ घातला. लहू लक्ष्मण सुर्वे यांच्या शेतातील घरासमोर बांधलेल्या दोन वासरांचा त्याने फडशा पाडल्याने नागरिकातून भय व्यक्त होत आहे.

मंगळवार (दि.२९) रोजी पहाटे ५ वाजताच्या दरम्यान हा प्रकार घडला. परिसरात जनावरांच्या ओरडण्याने व कुत्र्यांच्या भुंकण्याच्या आवाजाने जवळील बिंनगे कुटुंबीय जागे झाले. त्यांनी बाहेर आल्यानंतर बिबट्या दिसला. त्यांनी मोठमोठ्याने आवाज दिल्याने बिबट्या पळून गेला. यामुळे त्यांच्या सतर्कतेने पुढील अनर्थ टळला.अरण परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे दिसून आले. सोमवार (ता. २८ जुलै) रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास अरणगांवातील शेळके, गाजरे वस्तीवर येथे द्राक्षबागेत फवारताना २५ ते ३० फुटावरती बिबट्या दिसून आला. गाजरे यांनी बिबट्यास बघताच त्यांनी प्रसंगावधान राखत दुचाकी सुरू केली आणि रेस वाढवून मोठा आवाज केला. या आवाजाने बिबट्या तेथून पळून गेला. तर संग्राम गाजरे यांना दळण घेऊन येताना बिबट्या दिसला. दुपारी ४ वाजता सर्जेराव सावंत यांच्या जर्सी गाईचे वासरू ही ठार मारले व तेथून पुढे गाजरे, शेळके वस्तीवर आला. त्यानंतर त्यांनी जवळच्या वस्तीवर आणि ग्रामस्थांना फोनवरून बिबट्याची माहिती देताच ग्रामस्थ तेथे काठ्या व टॉर्च घेऊन जमा झाले. उजनी व व्होळे शिवारात असलेला बिबट्या अरण येथे आल्याची चर्चा ग्रामस्थांमधून होत आहे. यामुळे मोडनिंब, अरण व आसपासच्या वस्तीवर बिबट्या दिसल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. याबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना ताबडतोब पाचारण करण्यात आले. माढा तालुक्यातून गेल्या महिनाभरापासून बिबट्या आपला मुक्काम सोडायला तयार नाही. या भागातील शेतकरी, विद्यार्थी यांनी धास्ती घेतली. तब्बल दोन दिवसापासून अरण, जाधववाडी या भागात बिबट्याचे जनावरांवरती हल्ले सुरू आहेत. या परिसरात फळबागा व ऊस मोठ्या प्रमाणावर आहे, त्यामुळे बिबट्याला दडून बसण्यास ठिकाणे सापडतात. रात्र होताच तो शिकारीसाठी बाहेर पडतोय. या संपूर्ण परिसराला वनपाल बाबासाहेब लटके, वनसेवक विकास डोके, वनसेवक संभाजी जगताप, वनरक्षक अविनाश गायकवाड मोडनिंब, वनरक्षक शुभम दहायतडक, वाहन चालक बापु वाघमोडे आज घटनास्थळी भेट दिली. तसेच नागरिकांनी दाखवलेल्या ठिकाणचे बिबट्याच्या पायाचे ठसे आणि मृत झालेल्या जनावरांचे फोटो घेतले. नागरिकांना दिलासा देऊन सतर्कते बाबत सूचनाही केल्या.

**वनविभागाचा इशारा; नागरिकांनी घ्यावी काळजी**

रात्रीच्या वेळी एकट्याने बाहेर पडणे टाळा. बिबट्या रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो. पाळीव प्राण्यांना बंदिस्त आणि सुरक्षित जागी ठेवा.रात्री एकटे पायी फिरताना जवळ टॉर्च आणि काठी बाळगा. मोठ्याने म्युझिक लावा. रात्रीच्या वेळी लहान मुलांना आणि वृद्धांना एकटे सोडू नका.घरातल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा. न केल्यास भटक्या कुत्र्यांची संख्या वाढते आणि बिबट्या त्यांकडे आकर्षित होतो. अचानक बिबट्या जवळ दिसल्यास शांत राहण्याचा प्रयत्न करा. बिबट्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्या. त्याला डिवचण्याचा प्रयत्न बिलकुल करू नका. आणि तात्काळ वनविभागाला कळवा.



## सुळेवाडी येथील पाझर तलावाची गळती; जॅकवेल दुरुस्तीची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २९ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील पाझर तलाव क्रमांक एकला गळती लागली असून जॅकवेल दुरूस्तीची मागणी करण्यात येत आहे.

सुळेवाडी येथील हा सगळयात मोठा तलाव आहे. हा तलाव भरल्यावर पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा बऱ्यापैकी प्रश्न मिटतो. यंदा मे महीन्यातच पावसाने समाधान कारक हजेरी लावल्यामुळे या तलावात चांगला पाणी साठा झाला होता. पण या तलावाचा जकवेल नादुरुस्त असल्याने यातून पाणयाची मोठी गळती झाली आहे. याबाबत सुळेवाडी येथील ग्रामस्थांनी वारंवार माळशिरस पंचायत समीतीमधील लघुपाटबंधारे खात्याकडे जॅकवेल दुरुस्त करण्याची मागणी केली. परंतू या विभागाने याची कसल्याही प्रकारची दखलच घेतली नाही. त्यामुळे अजूनही याठिकाणी पाण्याची गळती सुरुच आहे. या जॅकवेलची दुरुस्ती न केल्यामुळे यातील पाणी वरचेवर कमी कमी होत चालले आहे. यामुळे अक्षरशः ऐन पावसाळयातच सुळेवाडीकरांवर पाणी टंचाईचे संकट ओढावण्याची शक्यता आहे. या पाझर तलाव क्रमांक एकच्या जॅकवेलची ताबडतोब दुरुस्त करण्याची मागणी सुळेवाडीचे नेते विक्रम सुळे यांनी माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## चारचाकी वाहनाच्या धडकेत रिक्षातील महिला जखमी

**सोलापूर -** चारचाकी वाहनाच्या धडकेत रिक्षातील दोन महिला जखमी होऊन रिक्षाचे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत चंद्रकांत गोरख खुर्द (वय ५३, रा. आयोध्या नगर, सैफुल, विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच १३ ईएस ०२१२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनचालकाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ जुलै रोजी रात्री वानकर वस्ती येथे चंद्रकांत खुर्द हे त्यांच्या एमएच १३ एएफ २३३४ क्रमांकाच्या रिक्षाचा यु टर्न घेत असताना एम एच १३ ईएस ०२१२ क्रमांकाच्या कारचालकाने रिक्षाला धडक दिली. या अपघातात चंद्रकांत खुर्द, सरीता सोमनाथ क्षिरसागर, मनिषा क्षिरसागर हे गंभीर जखमी झाले. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यातील हवालदार उपासे पुढील तपास करीत आहेत.



## बॉम्बे पार्क परिसरांतील नागरिकांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

पूर्ण क्षमतेने विद्युत प्रवाहाच्या मागणीसह अन्य मागण्यांचे निवेदन बॉम्बे पार्क ते गॅस गोडाऊन भागातील शिवकमल नगर, चाकोते नगर, ज्योती रचना ग्रहनिर्माण संस्थेतील नागरिकांनी महावितरण, पोलीस तसेच महापालिकेला दिले.

या भागात २०१४ पासून लोक वसाहत वाढत आहे. येथे सिंगल फेज ने वीज वितरण होत आहे. सदर प्रवाह पुरेसा नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या नागरी वस्तीमध्ये रस्ते, दिवे, अशा अनेक दैनंदिन मूलभूत गरजेची कमी असल्याबद्दलचे निवेदन सहा. आयुक्त लोकरे यांना दिले आहे. तर वसाहतीत पोलीस गस्त वाढवण्यासाठी विजापूर रोड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दादासाहेब गायकवाड यांना निवेदन दिले आहे. प्रशासनातर्फे देखील मदतीचे आश्वासन देण्यात आले आहे. यावेळी या परिसरातील चेतन चौधरी, राजेश कुलकर्णी, हिराबाई भानुमते, मीनाक्षी अंजनाळकर, बिराजदार, बसरगी आदीसह अन्य नागरिक उपस्थित होते.

## आमच्यापेक्षा कामगारांचाच सत्कार होणे गरजेचे : अध्यक्ष पाटील

■ 'दामाजी'च्या संचालक मंडळाला तीन वर्षे पूर्ण

■ कामगार संघटना सत्कारावेळी केले भाष्य

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २९ जुलै-**

दामाजी कारखान्यावरील सत्ता बदलानंतर महत्वाच्या ठिकाणी आपल्या मर्जीतील कर्मचारी ठेवतात मात्र तीन वर्षाच्या कार्यकाळात आम्ही कुणाचीही अदलाबदल केली नाही. जो कारभार केला तो समोर आहे. त्यामुळे आमच्या सत्कारापेक्षा भविष्यात कारखाना चांगला चालवून दाखवा आम्ही तुमचा सत्कार करू असे आवाहन दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी केले.



समविचारी आघाडीच्या माध्यमातून दामाजी कारखान्यावर सत्ता स्थापन केलेल्या अध्यक्ष शिवानंद पाटील, उपाध्यक्ष तानाजी खरात यांच्यासह संचालक मंडळाच्या कारकिर्दीला तीन वर्षे यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल कामगार संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार आयोजित केला होता. मात्र त्यांनी हा सत्कार टाळत भविष्यात कारखान्याचे व्यवस्थापन चांगले करावे यावर मार्गदर्शन केले. अध्यक्ष पाटील म्हणाले की, मागील संचालक मंडळ थकीत एक पगार व भविष्य निर्वाह निधीचे सात कोटी अदा केले आहेत. तर सेवानिवृत्त कर्मचारी रक्कम देखील टप्प्याटप्प्याने देत आहोत. दामाजीकडे कोणताही प्रकल्प नसताना देखील गाळप केलेल्या शेतकऱ्यांच्या उसाची बिले वेळेत देण्याचा प्रयत्न केला. गतवर्षीच्या हंगामात दोन लाख ८१ हजारचे गाळप झाले. शेतकऱ्यांची बिले वेळेत दिल्यामुळे दामाजीवरील विश्वास शेतकऱ्यांचा वाढला. त्यामुळे यंदा अपेक्षेपेक्षा जास्तीचे गाळप करण्याच्या दृष्टीने आमचे संचालक मंडळ मार्गदर्शक प्रशांत परिचारक, भगीरथ भालके, प्रा.शिवाजीराव काळुंगे, रामकृष्ण नागणे, शशिकांत बुगडे, नंदकुमार पवार, दामोदर देशमुख, राहुल शहा, यादाप्पा माळी यांच्या मार्गदर्शनात प्रयत्नशील आहे. यावेळी उपाध्यक्ष तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तु, गोपाळ भगरे, तानाजी कांबळे, राजेंद्र पाटील भारत बेदरे,दया सोनगे, रेवणसिध्द लिगाडे, औदुंबर वाडदेकर, लता कोळेकर, बसवराज पाटील, भिवा दौलतोडे, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, निर्मला काकडे, अशोक केदार आदी संचालक उपस्थित होते.

## रतनचंद शहा बँकेवर राहुल शहा यांच्या पॅनलचे वर्चस्व



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२९ जुलै-**

येथील रतनचंद शहा सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक होवून सोमवार दि.२८ रोजी मतमोजणी पार पडली. यामध्ये विद्यमान सत्ताधारी शहा गटाचे पंधरा उमेदवार निवडून आले आहेत. दरम्यान यामध्ये चार सदस्य बिनविरोध यापुर्वीच निवडून आलेले आहेत.

मंगळवेढा शहरातील रतनचंद शहा सहकारी बँक ही सर्वात मोठी बँक म्हणून आजतागायत ओळखली जात असून या संस्थेची आर्थिक उलाढालही मोठी आहे. आजपर्यंत या बँकेवर शहा गटाने आपले वर्चस्व कायम ठेवले होते. चालू पंचवार्षिक निवडणूकीतही शहा गटानेच आपले निर्विवाद वर्चस्व सिध्द केले आहे.या निवडणूकीत केवळ एका सदस्याने दोन प्रवर्गात अर्ज भरल्याने निवडणूकीला सामोरे जावे लागले आहे. निवडून आलेले उमेदवार व कंसात पडलेली मते पुढीलप्रमाणे - सर्वसाधारण प्रवर्ग -राहुल सुभाष शहा (३८४२),मुझफ्फर वल्लीसाहेब काझी (३८२७),चंदाराणी जयनारायण कोंडुभैरी(३८२५),राजेंद्रकुमार काशिनाथ जाधव (३८५२),अमृतलाल कांतीलाल पुरवत(३८२९),संतोष चनबसप्पा बुरकूल (३८६२),नागनाथ दगडू राऊत (३८४२),विवेकानंद विलास शहा (३८२६),अजीम बादशहा शेख(३७९४),गजानन मनोहर हजारे (३६२९) आदी तर ओ.बी.सी.प्रवर्ग -महादेव सत्याप्पा माळी (४१७९) आदी उमेदवार विजयी झाले आहेत. तसेच यापुर्वीच महिला प्रवर्गातून अश्विनी राहुल शहा,गोदावरी गुंडीबा दत्तू,विमुक्त जाती/भ.ज. मधून उत्तम मारुती खांडेकर,अनूसूचित जाती जमाती-किरण कैलास क्षिरसागर आदी बिनविरोध निवडून आले आहेत.

सर्वसाधारण गटात जमीर बादशहा सुतार यांना ४०३ तर ओ.बी.सी. प्रवर्गातून २७० मते मिळवून दोन्ही प्रवर्गातून ते पराभूत झाले.त्यांनी दोन्ही गटातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दरम्यान निवडणूक निकालानंतर सहकार पॅनलचे प्रमुख राहुल शहा यांचेसह सर्व विजयी संचालक मंडळाचे आ. समाधान आवताडे,दामाजी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील,भैरवनाथ शुगर्सचे व्हा.चेअरमन अनिल सावंत,ज्येष्ठ संचालक रामभाऊ जगताप आदींनी अभिनंदन केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विजय वाघमारे,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी काशिनाथ कांबळे यांनी काम पाहिले.

## वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वरास श्रावणानिमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २९ जुलै-**

श्रावण महिन्यास नुकतीच सुरुवात झाली आहे. पहिल्या सोमवार रोजी वेळापूर परिसराचे आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

श्रावणातील पहिल्या सोमवार निमित्त पहाटे चार वाजता अर्धनारी नटेश्वराच्या मूर्तीस स्नान घालून विधिवत पूजा करण्यात आली व त्यानंतर आरती करुन रविराज गुरव यांनी सेवा बजावली. यानंतर अभिषेक पूजा घालण्यात आल्या. पहाटेच्या विधिवत पूजे नंतर भाविकांना अर्धनारिनटेश्वराच्या दर्शनास सोडण्यास सुरुवात करण्यात आली. श्रावणी पहिल्या सोमवार निमित्त मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करण्यात आली होती. तर मंदिराच्या पटांगणामध्ये रांगोळीतून शंकराचे चित्र रेखाटण्यात आले होते व जटाधारीमध्ये पुष्पांनी विणलेल्या पुष्पकुंज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. त्याचबरोबर परिसरामध्ये रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. फुलांचे सुशीभिकरण करण्यात आले होते. सकाळी श्रावणी पहिला सोमवार असल्याने मंदिरामध्ये भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच अर्धनारी नटेश्वराच्या दर्शनास आलेल्या भाविकांना नागरिकांच्या वतीने खिचडी, चहा व उपासाच्या लाडूचे वाटप करण्यात आले. अर्धनारी नटेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रात्री उशिरापर्यंत रांग लागलेली होती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## महत्वाचे...

### एक ऑगस्टपासून श्रावण शॉपिंग उत्सव व फूड फेस्टिवल

**सोलापूर, दि. २९ जुलै-**
येथील श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाच्या महिला विभागातर्फे दि. १ ते ३ ऑगस्ट श्रावण शॉपिंग उत्सव व फूड फेस्टिवल चे आयोजन करण्यात आल्याची माहिती सचिव अर्पिता बक्षी यांनी दिली आहे. ह्या प्रदर्शनाचे उदघाटन जामश्री ग्रुपच्या प्रिया व श्रेयांशी दमाणी यांच्या हस्ते शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी स. १० वाजता होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष मुकेश महेता भूषविणार आहेत. हे प्रदर्शन सकाळी १० ते रा. ८ पर्यंत गुजरात भवनच्या वातानुकूलित सभागृह येथे होणार आहे. श्रावणात विविध सणावरांची रेलचेल असते त्या अनुषंगाने या प्रदर्शनात विविध वस्तूंची मांडणी असणार आहे. ह्या प्रदर्शनात साड्या, ड्रेस मटेरियल, कॉस्मेटिकस, इमिटेशन, डायमंड ज्वेलरी, फूट वेअर, डेकोरेटिव्ह आयटम्स, ऑरगॅनिक वस्तूसह खाद्य पदार्थांचे मिळून ४० हूनही अधिक स्टॉल्स असणार आहे. दसरा दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अनेक नाविन्यपूर्ण वस्तू पाहण्यास उपलब्ध असून, सोलापूरकरांनी अवश्य भेट द्यावी असे आवाहन अध्यक्षा प्रिती शाह यांनी केले आहे.






### सहस्त्रार्जुन विद्यामंदिरमध्ये नागपंचमी सण साजरा

**सोलापूर, दि. २९ जुलै-**
भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिरमध्ये पारंपरिक पद्धतीने नागपंचमी सण साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांना नागपंचमीच्या पारंपरिक व धार्मिक महत्त्वाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, गीते, श्लोक व गोष्टींच्या माध्यमातून या सणाचे महत्त्व सादर केले. नागदेवतेची चित्रे फळ्यावर रंगवून विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. काही वर्गांमध्ये विद्यार्थ्यांनी मातीच्या सापांचे किंवा चित्रांच्या माध्यमातून आकर्षक सादरीकरण केले. शिक्षकांनीही या सणाच्या मागील सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय संदर्भांवर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांचा मित्र असलेल्या सापाबद्दल समाजातील गैरसमजाबाबत सतर्क करताना विशेष मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील महिला शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी पारंपरिक गाण्यावर फेर धरला. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका मुख्याध्यापिका मंजुषा काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता व संस्कृतीची जपणूक या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

### आण्णा दीक्षित यांची एनसीसी कोर्ससाठी निवड



**सोलापूर, दि. २९ जुलै-**
सम्राट चौकातील रयत शिक्षण संस्थेच्या रावजी सखाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील शिक्षक संभाजी तथा अण्णा दीक्षित यांची एन.सी.सी. विभागाने आयोजित केलेल्या पीआरसीएन कोर्ससाठी निवड झाली आहे. ते ट्रेनिंग घेण्यासाठी नागपूर येथे रवाना झाले. राष्ट्रीय कॅडेट कोअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त, नेतृत्व व सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी कामठी, नागपूर येथे ट्रेनिंग दिले जाते. या ट्रेनिंग नंतर त्यांना लेफ्टनंट म्हणून पदवी मिळणार आहे. दिक्षित यांनी आत्तापर्यंत एम. एस्सी.गणित, बी. एड., एम. एड., एम. ए. इंग्रजी, डी.एस.एम., एम.सी.जे. अशा सहा पदव्या मिळवल्या आहेत व सध्या ते शिक्षण शास्त्र विषयातून पीएचडी करत आहेत. ही त्यांची सातवी पदवी तर लेफ्टनंट ही आठवी पदवी असेल. या निवडीबद्दल संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील संस्था सदस्य प्राचार्य डॉ सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, ज्येष्ठ शिक्षक वसंत नागणे मुख्याध्यापक भारत केत महावीर आळंदकर यांनी अभिनंदन केले आहे.

## निधन वृत्त...

### शिवाजी भोई



**सोलापूर, दि.२९ जुलै-**
शिवाजी जंगली भोई (वय ६२, रा. शहाबाद) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुली, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शारदा बिराजदार



**सोलापूर, दि.२९ जुलै-**
शारदा बसवराज बिराजदार (वय ५५) यांचे दि. २८ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी, सुन व नातवंड असा परिवार आहे.

### गोविंदलाल मुंदडा



**सोलापूर, दि. २९ जुलै-**
सम्राट चौक, सोना हिरा चौक येथील रहिवासी गोविंदलाल मिश्रीलाल मुंदडा (वय ७९) यांचे मंगळवार दि. २९ जुलै २०२५ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, पत्नी, एक विवाहित मुलगा, सून, तीन विवाहित मुली, जावई, नातू असा परिवार आहे. अंत्यसंस्कार मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. व्यापारी सहकारी बँकेचे माजी चेअरमन, साई सुपर मार्केटचे ते संस्थापक सदस्य तसेच लक्ष्मीनारायण मंदिरचे ट्रस्टी होते. बिल्डर नंदकिशोर मुंदडा यांचे ते वडील होत.

# खा. शिंदे यांच्या ‘त्या’ वक्तव्याचा भाजपाकडून निषेध

## आमदार कोठे यांनी सोलापूरकरांच्या वतीने मागितली माफी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**
पहेलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानात घुसून केलेल्या ऑपरेशन सिंदूरला खा. प्रणिती शिंदे यांनी लोकसभेत सोमवारी तमाशा संबोधणे अयोग्य आहे. खासदार प्रणिती शिंदे यांची पात्रता नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करतात; असा आरोप करीत मंगळवारी भाजपाने खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्याच्या त्या वक्तव्याचा निषेध केला. आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली शहर भाजप कार्यालयासमोर हे आंदोलन झाले.

यावेळी प्रणिती शिंदे यांचा धिक्कार असो, भारतमाता की जय, वंदे मातरम्, जय भवानी, जय शिवराय अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू, रंजिता चाकोते, संगीता खंदारे, लक्ष्मी बदलापुरे, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, देवेंद्र भंडारे, मेघनाथ येमूल, अनिल पल्ली, भरतसिंग बडूरवाले, रवी कोळेकर, रुपेश जक्कल, अंबादास बिंगी, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, नागेश खरात, बजरंग कुलकर्णी, मनोज कलशेट्टी, श्रीनिवास जोगी, संदीप जाधव, मधुकर वडनाल, विजय कुलथे, दत्तात्रय पोसा, आनंद बिरू, रामदास मगर, शिवा कामाठी, अभिषेक चिंता, यशवंत पाथरूट, संदीप ढगे, बंटी क्षीरसागर, गणेश साळुंखे, सागर अतनुरे, सतीश तमशेट्टी, सिद्धेश्वर कमटम, अंबादास सकीनाल आदी उपस्थित होते.

यावेळी माध्यमांना बोलताना आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, खासदार प्रणिती शिंदे या स्टंट करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासमोर चमकोगिरी करण्यासाठी अशी त्या वक्तव्ये करतात. पहेलगाम येथील हल्ल्यात अनेक माता-भगिनींच्यासमोर त्यांच्या पतींची हत्या झाली. त्यांचे सिंधूर पुसले गेले. त्यामुळे साहजिकच देशात या विरोधात तीव्र भावना होत्या. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताने पाकिस्तानात घुसून ऑपरेशन सिंधूर राबवले. या ऑपरेशनचे सर्व जगाने कौतुक केले. सर्व पक्षांनीही पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून कारवाईचे समर्थन केले. परंतु सभागृहाचे आणि माध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी असे बेताल वक्तव्य केलेले आहे. ज्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांना लोकसभा निवडणुकीत निवडून दिले, त्यांनाही आता या गोष्टीची लाज वाटत असेल.

खासदार प्रणिती शिंदे यांचे वडील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही हिंदूंना दहशतवादी म्हणत भगवा दहशतवाद शब्द वापरला होता. तसेच अफजलजी, कसाबजी असे चुकीचे शब्दही वापरले होते. परंतु कालांतराने त्यांनी देशाची क्षमाही मागितली. परंतु खासदार प्रणिती शिंदे यांचा स्वभाव पाहता त्यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल त्या क्षमा मागणार नाहीत. सोलापूरच्या लोकप्रतिनिधीने हे वक्तव्य केलेले आहे. त्यामुळे सोलापूरचे रहिवासी असल्यामुळे आम्ही संपूर्ण सोलापूरकरांच्यावतीने आणि भाजपाच्यावतीने देशाच्या सैन्यदलाची माफी मागत आहोत, असेही आमदार देवेंद्र कोठे यांप्रसंगी म्हणाले. संपूर्ण देश शूरवीर सैन्यदलाच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभा असताना खासदारांनी अशी वक्तव्य करणे निषेधार्ह आहे, अशी टीका आमदार कोठे यांनी यावेळी केली. लोकप्रतिनिधींनी संसदेत विकासावर बोलणे अपेक्षित आहे. खासदार प्रणिती शिंदे यापूर्वी तीन वेळा आमदार राहिलेल्या आहेत आणि आता खासदार आहेत. गेल्या वर्षभरात त्यांनी केलेले एकही काम दाखवलेले नाही. वर्षभरात त्यांनी किती निधी आणला? हे त्यांनी जनतेसमोर सांगितलेले नाही. परंतु भारतीय सैन्याने केलेल्या कारवाईला तमाशा संबोधण्याचे त्यांचे वक्तव्य गाढवापेक्षाही पुढच्या अकलीचे आहे. आमचा तमाशा या शब्दावर तीव्र आक्षेप आहे. त्यामुळे गाढवाला त्यांची प्रतिमा लावून आम्ही निषेध नोंदवला आहे, असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी यांप्रसंगी सांगितले.

## इंडियन दलित सेनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**
समाज कल्याण केंद्र हॉल, रंगभवन चौक येथे इंडियन दलित सेनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक सोहळा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडला.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अध्यक्ष सुधीर खरटमल, समाजकल्याणा खात्याच्या राजश्री कांबळे, अंगद जाधव, संघर्ष कामगार सेनेचे अध्यक्ष व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा झाला. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन व दिप प्रज्वलीत करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे कार्यकर्ते स्वदिप वाघमारे, सुलोचना बनसोडे, शहर अध्यक्ष सुहास बिराजदार, शहर उपाध्यक्ष मनोज गजधाने, शहर संघटक आर्चना केंगाळ, प्रमुख सल्लागार देवानंद सोनवणे, शहर उपाध्यक्ष रुक्मिणी नागणे, शहर संघटक मुन्नप्पा मरेड्डी, जिल्हा संपर्क प्रमुख विलास दुपारगुडे, जिल्हा संपर्क प्रमुख लक्ष्मी लोंढे, शहर उपाध्यक्ष आशा वाघमारे, दक्षिण तालुका अध्यक्ष परमेश्वर भडकुंबे, सुधीर डोळ्ळे, शहर संपर्क प्रमुख किसन नागणे, राजू वडवेराव, सुमित्रा बिरुनगी, सुरेखा कांबळे यांनी प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोलापूरचे जिल्हा संपर्क प्रमुख कृष्णा जटार यांनी केले. प्रास्तविक ॲड. सुरेखा जगताप यांनी केले. संघटनेचे शहर अध्यक्ष सुहास बिराजदार यांनी आभार मानले.



## नियमीत स्वामी नामस्मरणाने नवचैतन्य

**अभिनेत्री अलका कुबल; श्री स्वामी समर्थ दर्शनानंतरची भावना**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२९ जुलै-**
येथील वटवृक्ष निवासी स्वामी समर्थांचे आपण निस्सिम भक्त आहोत. वर्तमानकाळात स्वामींची लिला व चमत्काराविषयी शब्दांची संरचना कमीच आहे. त्यांच्या महतीविषयी बोलावे तितके कमीच. त्यांचे चरित्र व कार्य शब्दात व्यक्त न करता येण्यासारखे असून माझ्या सारख्या स्वामी भक्ताला आलेल्या अनुभवातून सांगायचे झाल्यास स्वामींच्या नित्य नामस्मरणाने जीवनातील प्रत्येक कामाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन बनतो. या माध्यमातून नियमीत स्वामी नामस्मरणाने माझ्या उतारवयातील जीवनलाही नवचैतन्य प्राप्ती लाभत आहे असे मनोगत मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेत्री अलका कुबल यांनी व्यक्त केल्या. त्या नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी अभिनेत्री अलका कुबल यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन सन्मान केला. यावेळी अभिनेत्री अलका कुबल बोलत होत्या. याप्रसंगी पो.नि.राजेंद्र टाकणे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, संजय पवार, गिरीश पवार इत्यादीसह भाविक भक्त उपस्थित होते.

## हुतात्मा स्मृती मंदिराबाबत संभाजी आरमारचे निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**
महापालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदिरातील विविध गैरसोयींकडे संभाजी आरमारने महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांना याबाबत निवेदन देण्यात आले.

याबाबत संभाजी आरमारने तपशीलवारपणे या निवेदनात मुद्दे मांडले आहेत. तिकीट उपलब्ध असूनही या नाट्यगृहात आसन उपलब्ध नसतात. अनेक वेळा ऑनलाइन अथवा ऑफलाइन तिकीट घेऊन आलेल्या प्रेक्षकांना त्यांच्या तिकिटांनुसार सीट्स उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना उभे राहून कार्यक्रम पाहावा लागतो. याबाबत मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकांमध्ये नाराजी आहे.

रांगा आणि आसन क्रमांक व्यवस्थित दर्शविणारे फलक अथवा संकेतचिन्हे नसल्याने प्रेक्षकांना त्यांच्या जागा शोधण्यात अडचणी येतात. त्यामुळे गोंधळ निर्माण होतो आणि कार्यक्रमाची वेळ वाया जाते.प्रत्येक तिकिटधारकाला निश्चित आसन मिळेल याची खातरजमा व्हावी.स्पष्ट व वाचनीय रो व सीट नंबरच्या निर्देशक खुणा लावण्यात याव्यात. प्रवेश व निर्गम मार्गाची व्यवस्थित आणि सुरळीत व्यवस्था करण्यात यावी. सुरक्षेच्या दृष्टीने आपत्कालीन मार्ग स्पष्ट दर्शविले जावेत.

निवेदन देताना संभाजी आरमारचे शहराध्यक्ष सागर ढगे, उपायुक्त शशिकांत शिंदे, प्रवक्ते मनीष काळे, विभाग प्रमुख मल्लिकार्जुन पोतदार आदी उपस्थित होते.

## ८० किलोचे लोखंडी सळई चोरीस

**सोलापूर** - नई जिंदगी येथून चोरट्याने बांधकामावरून ८० किलोचे लोखंडी सळई चोरून नेली. याबाबत अनिल हरिचंद्र उपरे (रा. भाग्योदय सोसायटी, नई जिंदगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नई जिंदगी येथे अनिल उपरे यांच्या घराचे बांधकाम चालू आहे. याठिकाणी असलेल्या साहित्यापैकी ८० किलो वजनाचे लोखंडी सळईचे तुकडे चोरट्याने चोरून नेले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भिसे पुढील तपास करीत आहेत.

## लाचखोर लिपीक व रिक्षाचालकास पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**
पोटहिश्यातील विहिर व बोअरवेलची नोंदणी करून देण्यासाठी ९ हजारांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केलेल्या भुमिअभिलेख दक्षिण कार्यालयातील दुरूस्ती लिपीक व रिक्षाचालकास विशेष न्यायाधीश कटारिया यांनी पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

शंकर अरूण बजबळकर (वय ३०, रा. साईनाथ नगर, होटगी रोड, सोलापूर मूळ रा. तिप्पेळ्ही, ता. सांगोला) आणि रिक्षाचालक सुरज रविंद्र सर्वगोड (वय ३५, रा. हौसे वस्ती, आमराई, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार याची वळसंग येथे वडीलोपार्जित शेतजमिन असून तक्रारदार व त्यांच्या भाऊ यांच्यात रितसर मोजणी केल्यानंतर पोटहिस्सा होऊन नकाशे मिळाले होते. त्यानंतर पोटहिश्यातील विहिर व बोअरवेल याची नोंदणी होण्यासाठी आकारफोडबाबत तक्रारदार यांनी उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर येथे अर्ज दाखल केले असता सदरचे काम करून साहेबांची सही घेऊन तहसिल कार्यालयास पाठविण्यासाठी दुरूस्ती लिपीक शंकर बजबळकर यांनी १० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यानुसार सापळा लावून ९ हजार रुपयांची लाच रिक्षाचालक सुरज सर्वगोड याच्यामार्फत स्विकारल्यानंतर दोघांना अटक करून सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी दोघांनाही विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने दोघांनाही पोलिस कोठडी सुनावली. याप्रकरणाचा पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले पुढील तपास करीत आहेत. या प्रकरणात सरकारच्या वतीने ॲड. दत्ता पवार यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड. नीलेश जोशी, ॲड. मधुरिमा देशपांडे आणि ॲड. राणी गाजूल यांनी काम पाहिले.

**मध्य रेल्वे**
मुंबई विभाग
क्रमांक: १२०.टी.ई-लिलाव कार्यक्रम/ऑगस्ट-२५ दिनांक:- १४.०७.२०२५
**ऑगस्ट - २०२५ महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रम**
भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने, मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापक, ऑगस्ट - २०२५ महिन्यात खाली दिलेल्या तपशीलांनुसार भंगार साहित्याच्या विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील.
**टीप:-** भविष्यात, वर्तमानपत्रांमध्ये ई-लिलाव कार्यक्रमांचे प्रकाशन बंद केले जाईल. संभाव्य खरेदीदारांना सर्व अद्यतने आणि तपशीलांसाठी मध्य रेल्वे IREPS वेबसाइट www.ireps.gov.in ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

| लिलाव संचालक अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | | | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| सीनियर डीएमएम/एनजीपी | ०४.०८.२०२५ सोमवार | १२.०८.२०२५ मंगळवार | २०.०८.२०२५ बुधवार | ७२१९६१२७५० |
| एसआर.डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपोसह. | ०५.०८.२०२५ मंगळवार | १३.०८.२०२५ बुधवार | २१.०८.२०२५ गुरुवार | ७२१९६११७५१ |
| सीनियर डीएमएम/पीए | ०६.०८.२०२५ बुधवार | १४.०८.२०२५ गुरुवार | २५.०८.२०२५ सोमवार | ७२१९६१३७५० |
| सीनियर डीएमएम/बीबी | ०७.०८.२०२५ गुरुवार | १८.०८.२०२५ सोमवार | २६.०८.२०२५ मंगळवार | ८८२८११९७५० |
| सीनियर डीएमएम/एसयूआर | ०८.०८.२०२५ शुक्रवार | १९.०८.२०२५ मंगळवार | २८.०८.२०२५ गुरुवार | ७२१९६१४७५० |
| डी.सीएमएम/ईटीएल/एचक्यू एसएमएम(जी) CRD साठी | ०४.०८.२०२५ मंगळवार | १२.०८.२०२५ बुधवार | २०.०८.२०२५ गुरुवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय. सीएमएम (एम) पीआर | ०६.०८.२०२५ बुधवार | १४.०८.२०२५ गुरुवार | २५.०८.२०२५ सोमवार | ८८२८११९७५५ |
| डीवाय. सीएमएम (सीडब्ल्यूइ) एमटीएन | ०५.०८.२०२५ मंगळवार | १३.०८.२०२५ बुधवार | २१.०८.२०२५ गुरुवार | ८८२८११९७७० |
| डीवाय. सीएमएम/इटीएल/एचक्यू एएमएम/एचबीएचआर साठी | ०४.०८.२०२५ सोमवार | १२.०८.२०२५ मंगळवार | २०.०८.२०२५ बुधवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय. सीएमएम (एसीएल) बीएसएल | ०७.०८.२०२५ गुरुवार | १८.०८.२०२५ सोमवार | २६.०८.२०२५ मंगळवार | ७२१९६११७५० |

**टीप:-** आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केला जाईल. रेल्वे प्रशासनाला स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे.
**टीप:-** अ) ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणत्याही लॉटचा लिलाव कोणत्याही योग्य पद्धतीने करण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. म्हणून कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या नंतरच्या लिलावात विकले जाऊ शकतात. ब) सरकारी धोरणानुसार, जिथे भंगार साहित्याच्या पुनर्वापरात पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश असेल, अशा लॉट केवळ केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांनाच विकल्या जातील. क) ई-उभारणी कॅटलॉग www.lreps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. ड) ई-उभारणी, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास, कृपया वरीलप्रमाणे संबंधित उप-संचालक अधिकाऱ्यांशी किंवा उप-मुख्यमंत्री/विक्री/मुख्यालय, मोबाईल क्रमांक ८८२८११०७६१, ईमेल पत्ता dycmm.s.cstmgmail.com किंवा dycmmscr.railnet.gov.in या ईमेल पत्त्यावर संपर्क साधा.
प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापकासाठी
SUN 313 असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**मनोरमा को-ऑप. बँक लि., सोलापूर**
प्लॉट नं. ४,५,६,७,८, कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर
फोन: 0217-2301880, 2626900, 2300680
Email : manorama_bank@rediffmail.com
website: www.manoramabank.org www.manoramabank.com
संस्थापक अध्यक्ष कै. सदाशिव रामचंद्र मोरे (दाजी)
नोंदणी क्र. एस. यु.आर / बी. एन. के. / (ओ) १२० सन १९९६-९७ दि. २४/१२/१९९६ आर. बी. आय. लायसन्स नं. युबीडी / महा १३८१ पी. दिनांक : २५/०२/१९९७

**२९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**
**मनोरमा को-ऑप बँक लि., सोलापूर** या बँकेच्या सर्व सभासदांना उपविधी क्र. ३४ नुसार कळविण्यात येते की, बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार दि. १५/०८/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता मनोरमा भवन मिटिंग हॉल, नवीन आर.टी.ओ. ऑफीस समोर, बेन्नूर नगर, विजापूर रोड, सोलापूर** येथे होणार आहे. सदर सभेपुढील विषय खालीलप्रमाणे आहेत. सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय**
१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१.०३.२०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेला ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे व सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची दोष दुरूस्ती अहवालासह मंजुरीसाठी सादर.
३) सन २०२४-२५ च्या नफावाटणीस मंजुरीसाठी सादर व संचालक मंडळाने शिफारस केलेला लाभांश मंजुरीसाठी सादर.
४) सन २०२४-२५ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२५-२६ या वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर.
५) सन २०२५-२६ या सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व मंजुरीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पाठवणे मंजुरीसाठी सादर.
६) रिझर्व्ह बँक परिपत्रक RBI /2023-24/39 DOR REG.No. 19/07.01.000/2023-24 दि. ०८ जून २०२३ नुसार बँकेची नवीन शाखा उघडणे व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे प्रस्ताव सादर करणे.
७) बँकेच्या संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची नोंद घेणे.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ४९ नुसार कर्ज निर्लेखन करणेबाबत निर्णय घेणे पुरवणी ब प्रमाणे
९) बँकेच्या सन २०२५-२६ सालासाठी कर्ज नियमावली व इतर नियमावली दुरुस्ती परिशिष्ट मंजुरी घेणे.
१०) बँकेच्या पोटनियम दुरुस्तीत मंजुरी देणे. (ॲनेक्झर प्रमाणे)
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

स्थळ : सोलापूर
दिनांक : ३०/०७/२०२५
मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
सौ. शिल्पा महेंद्र कुलकर्णी (मोहिते)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना**
१) ज्या सभासदांनी अद्याप आपला मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर केलेला नाही, त्यांनी आपला मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर करावा.
२) सन २०२४-२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक बँकेच्या कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच बँकेच्या वेबसाईटवर देखील अपलोड करण्यात आलेला आहे. बँकेची वेबसाईट www.manoramabank.org www.manoramabank.com
३) ज्या सभासदांना या संदर्भात काही लेखी सुचना द्यावयाच्या असतील तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय, प्लॉट नं. ४/५/६/७/८, कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर किंवा नवीन आर. टी. ओ. ऑफीस समोर, बेन्नूर नगर, विजापूर रोड, सोलापूर यांच्याकडे लेखी द्याव्यात. मुदतीनंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

# सात्त्विक-चिरागचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

## मलेशियन जोडीचा केला पराभव ● मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन

◆ **मकाऊ, २९ जुलै**

सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने मंगळवारी मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आणि मलेशियाच्या लो हांग यी आणि एनजी एंग चेओंग यांच्यावर सरळ गेममध्ये विजय मिळवला. बीडब्ल्यूएफ जागतिक क्रमवारीत पुन्हा पहिल्या १० मध्ये स्थान मिळविणाऱ्या सात्त्विक आणि चिराग यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि मलेशियन जोडीचा फक्त ३६ मिनिटांत २१-१३, २१-१५ असा पराभव केला.



महिला एकेरीत, अनमोल खरब आणि तस्निम मीर यांनी त्यांचे संबंधित पात्रता सामने जिंकून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला. अनमोलने अझरबैजानच्या केशा फातिमा अझहराचा २१-११, २१-१३ असा पराभव केला, तर तस्निमने थायलंडच्या तिदाप्रोन क्लेइबिसुनचा २१-१४, १३-२१, २१-१७ असा पराभव केला. मुख्य ड्रॉच्या पहिल्या फेरीत तस्निमचा सामना चीनच्या अव्वल मानांकित चेन यू फीशी होईल, तर अनमोलचा सामना थायलंडच्या दुसऱ्या मानांकित बुसानन ओंगबामरुंगफानशी होईल.

**त्रिशा जॉली, गायत्री गोपीचंद बाहेर**

अग्रमानांकित महिला दुहेरी जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद पहिल्याच फेरीत बाहेर पडली, त्यांना चायनीज तैपेईच्या लिन जिओ मिन आणि पेंग यू वेई यांच्याकडून एका तासात २१-१६, २०-२२, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत, डिंगकू सिंग कोंथोउजम आणि अमन मोहम्मद यांनी हाँगकाँगच्या लॉ चेउक हिम आणि येउंग शिंग चोई यांचा २१-१८, २१-१७ असा पराभव करून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला जिथे त्यांचा सामना पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतीक के यांच्याशी होईल. मिश्र दुहेरी जोडी थंडरंगिनी हेमा नागेंद्र बाबू आणि प्रिया कोंजेंगबाम यांनीही मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला आहे. आता त्यांचा सामना थायलंडच्या फुवानत होर्बानलुएकित आणि फुंगफा कोरपाथाम्मकित यांच्याशी होईल. ◂(वृत्तसंस्था)

### सात्त्विक आणि चिराग यांना चार गुण

तत्पूर्वी, सात्त्विक आणि चिराग यांनी चांगली सुरुवात केली आणि ६-१ अशी आघाडी घेतली. मलेशियन जोडीने हे अंतर १०-९ पर्यंत कमी केले, परंतु भारतीय जोडीने पुन्हा खेळावर नियंत्रण मिळवले आणि पहिला गेम २१-१३ असा जिंकला. दुसऱ्या गेममध्ये, मलेशियन जोडीने १३-१४ पर्यंत दबाव कायम ठेवला, परंतु भारतीय जोडीने १७-१३ अशी आघाडी घेतली आणि नंतर सलग चार गुण मिळवून सामना जिंकला. ■



लंडनमधील भारतीय उच्चायोगाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी भारतीय पुरुष क्रिकेट संघाचे सदस्य

# सुनील लुल्ला, सिद्धी खजुरिया, संध्याराणी बंडगर यांना दुहेरी मुकुट

## आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २९ जुलै-**



सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व आयटीफ, एआयटीए, एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत पुण्याच्या सुनील लुल्ला, सोलापूरच्या संध्याराणी बंडगर, सिद्धी खजुरिया यांनी एकेरी व दुहेरी गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. एमएसएलटीए टेनिस सेंटर आणि इलीसीएम क्लब जामश्री कॉम्प्लेक्स सिद्धेश्वर पेठ, सोलापूर या ठिकाणीसुरु असलेल्या या स्पर्धेत ४० वर्षांवरील महिला गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित सिद्धी खजुरियाने काल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या पारुल गुजरातीचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून विजेतेपद पटकावले. याच गटात दुहेरीत अंतिम लढतीत सिद्धी खजुरिया व संध्याराणी बंडगर यांनी प्रिया जैन व प्रणिता पेडणेकर यांचा ६-१, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. ५० वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत अव्वल मानांकित पुण्याच्या सुनील लुल्ला याने कुमुद्दीन खानचा ६-३, ६-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मिश्र दुहेरीत अंतिम फेरीच्या सामन्यात अव्वल मानांकित सुनील लुल्ला याने प्रणिता पेडणेकरच्या साथीत दुसऱ्या मानांकित रिंकू कुमारी व अमित शिंदे यांचा ६-४, ६-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

४० वर्षांवरील पुरुष एकेरीत उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित रमजान शेखने अव्वल मानांकित संदीप पवारवर ६-४, ६-२ असा सनसनाटी विजय मिळवला. दुसऱ्या मानांकित बद्री विशाल याने चौथ्या मानांकित गौतम गाडगीळचा ६-४, ०-४, १०-८ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

**आज झालेले निकाल:**

४० वर्षांवरील दुहेरी: अंतिम फेरी: सिद्धी खजुरिया/संध्या बंडगर वि.वि. प्रिया जैन/प्रणिता पेडणेकर ६-१, ६-१;

४५ वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी: अमित टिळक वि.वि.सम्राट भसीन ७-५, ६-२; नरेंद्रसिंग चौधरी वि.वि.यती गुजराती ४-० सामना सोडून दिला;

५० वर्षांवरील मिश्र दुहेरी: अंतिम फेरी: सुनील लुल्ला/प्रणिता पेडणेकर वि.वि.रिंकू कुमारी/अमित शिंदे ६-४, ६-३;

**६० वर्षांवरील पुरुष एकेरी:** उपांत्यपूर्व फेरी: भूषण चंद वि.वि.परेश पटेल ६-१, ६-०; लक्पा शेरपा वि.वि.राजीव देसाई ६-२, ०-६, १०-६; पवन जैन ३ वि.वि. अनिल कुमार ६-२, ६-२; दीपंकर चक्रवर्ती वि.वि.राजन बेरी ६-३, ६-४;

**६५ वर्षांवरील पुरुष:** उपांत्यपूर्व फेरी: अजित भारद्वाज वि.वि.मेहेर प्रकाश कोडुरी ६-३, ६-२; अजय लखोटिया वि.वि.अजय तलवार ६-२, ६-३; पवन जैन वि.वि.अनिल कुमार ६-२, ६-२; प्रमोद दिक्षित वि.वि. राजेंद्र सिंग ६-०, ६-०;

**७० वर्षांवरील पुरुष** : उपांत्यपूर्व फेरी: थॉमस पुथुपारंबिल वि.वि. रत्नाकरराव अणे ६-३, ६-१; एकनाथ किणीकर वि.वि.एसजेएस रंधवा ७-६(४), ६-४; तुलसी सिद्धाराजू वि.वि. राजेंद्र सिंग राठौर ६-१, ७-६(२); महेंद्र कक्कड वि.वि.ताहिर अली ६-३, ७-५.

## महत्त्वाचे

### गौतम गंभीर खेळपट्टीवर समाधानी नाही



**लंडन** : भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचा मंगळवारी द ओव्हल क्रिकेट स्टेडियमचे मुख्य खेळपट्टी क्युरेटर ली फोर्टिस यांच्याशी वाद झाला. वृत्तसंस्थेने या वादाचा व्हिडीओ प्रसिद्ध केला. एवढेच नाही तर भारतीय प्रशिक्षक खेळपट्टीवर समाधानी नसल्याचा दावा करण्यात आला. गंभीर खेळपट्टीची पाहणी करत असताना ही घटना घडली. काही गोष्टींवरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पाचवा सामना ३१ जुलैपासून येथे खेळला जाणार आहे. भारताला जिंकून मालिका २-२ अशी बरोबरी करण्याची संधी आहे. सध्या इंग्लंड संघ २-१ ने आघाडीवर आहे. गौतम गंभीर खेळपट्टीबद्दल संतप्त दिसत होते आणि मैदानावर पोहोचल्यानंतर त्यांनी थेट क्युरेटरशी संवाद साधला. खेळपट्टीच्या स्थितीबाबत दोघांमध्ये मतभेद दिसून आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर म्हणाला, तू इथे फक्त ग्राउंड्समन आहेस. खेळाडू त्यांच्या रन-अप एरियाचे चिन्हांकन करत असताना नेट्समध्ये हा वाद झाला. नंतर, फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक आले आणि क्युरेटरला सोबत घेऊन गेले. ■

### भारतीय जलतरणपटूंची निराशाजनक कामगिरी

**सिंगापूर** : दोहा येथे सुरू असलेल्या जागतिक जलतरण स्पर्धेत भारतीय जलतरणपटूंची निराशाजनक कामगिरी मंगळवारी सलग तिसऱ्या दिवशीही कायम राहिली. एकही जलतरणपटू पुढे जाऊ शकला नाही. अनुभवी साजन प्रकाश त्याच्या आवडत्या २०० मीटर बटरफ्लाय स्पर्धेत २४ व्या स्थानावर राहिला आणि उपांत्य फेरीत स्थान हुकले. प्रकाशने १:५९.३३ सेकंद वेळ घेतली. अव्वल १६ जलतरणपटूंनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. या निकालासह, ३१ वर्षीय प्रकाशची चालू अजिंक्यपद स्पर्धेत मोहीम संपुष्टात आली. त्याआधी सोमवारी, त्याने २०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये ४३ वे स्थान मिळवले. पुरुषांच्या ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये, आर्यन नेहराने सरासरीपेक्षा कमी वेळेत ८:२१.३० सेकंदांसह २३ वे स्थान मिळवले. फक्त अव्वल आठ जलतरणपटू अंतिम फेरीत पोहोचले. नेहराने गेल्या हंगामात (२०२३) चॅम्पियनशिपमध्ये ०८:००.७६ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवली होती. त्याची मोहीमही संपली. ५० मीटर बटरफ्लायमध्ये तो ९१ जलतरणपटूंपैकी ५७ व्या स्थानावर राहिला.

# आयटीएफ महिला दुहेरीच्या १०० के स्पर्धेत प्रार्थना ठोंबरे व ए.हार्टोनो ठरल्या चॅम्पियन

### अक्ली आणि ओसुइग्वे या मानांकित जोडीचा ६-३, ६-३ अशा फरकाने पराभव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ जुलै-**

अमेरिकेतील आयटीएफ डब्ल्यू १०० के. इव्हान्सविले स्पर्धेत भारताची महिला दुहेरीतील स्टार टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे हिने नेदरलँडची एरियन हार्टोनो हिच्या साथीने दुहेरीचे विजेतेपद जिंकले

सोमवारी झालेल्या या स्पर्धेतील अंतिम फेरीत त्यांनी अक्ली आणि ओसुइग्वे या दुसऱ्या मानांकित जोडीचा ६-३, ६-३ अशा फरकाने दोन सरळ सेटमध्ये पराभव केला. ठोंबरे व हार्टोनो या जोडीने महिला दुहेरीमध्ये चार वेळा टायटल जिंकले असून सन २०२५ मधील हे त्यांचे पहिले टायटल विजेतेपद आहे.



ही स्पर्धा इंडियाना येथील इव्हान्सविले येथे झाली. या जोडीने यापूर्वी उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित कायला क्रॉस आणि अलाना स्मिथ यांचा ६-४, ७-५ असा पराभव केला होता. हा विजय दोन्ही खेळाडूंसाठी एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. प्रार्थना व एरियन या जोडीला यंदा चांगली लय सापडली असून नुकतेच १२५ के चॅम्पियन स्पर्धेत ही जोडी उपविजेती ठरली होती. या विजयाने दोघींच्या मानांकनात सुधारणा होईल.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते क्रीडा संकुलात ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅकचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

जिल्हा क्रीडा संकुल समिती आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅकचे अनावरण व भूमिपूजन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी पालकमंत्री गोरे यांचे स्वागत केले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रकाश काटुळे व श्रीकांत ढेपे, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव राजू पाटील, क्रीडा शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, क्रीडा अधिकारी नदीम शेख, ॲथलेटिक्स प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे, भारती लिंगडे, सुनील चव्हाण, प्रा. सुवर्णा कांबळे, डॉ. उज्वल मलजी, प्रा. प्रमोद चुंगे, मारुती घोडके, ज्ञानेश्वर काळे, शिवानंद सुतार, वीरेश अंगडी, दीपक चिकणे, विठ्ठल कुंभार, आदी उपस्थित होते. यावेळी क्रीडा शिक्षक संघटनेने पालकमंत्र्यांना निवेदन दिले.



**एक वर्षात काम पूर्ण होणार : जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार**

मुंबईची स्पोर्टस फॅसिलिटीज कंपनी हे काम करणार असून आठ लेनच्या ट्रॅकचे हे काम वर्षात पूर्ण होणार असल्याचे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी सांगितले. क्रीडा शिक्षक संघटनेच्या मागणीनुसार ट्रॅकच्या दुसऱ्या डीला एक कोटीची मंजूरी मिळाली असून निधी प्राप्त होतात ते कामही होईल. याव्यतिरिक्त बॅडमिंटन हॉल व अंतर्गत रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. विद्यार्थी वसतीगृहाचे कामही सुरू होईल.

**निवेदनातल्या मागण्या याप्रमाणे**

- ११० मीटरचा धावन मार्ग हा १० लेनचा असावा
- त्या धावन मार्गाची दिशा पश्चिमेकडे असावी
- ट्रॅकच्या पश्चिमेकडील बाजूस पॅव्हेलियन बांधा
- यामुळे ट्रॅक बंदिस्त होऊन ट्रॅकवर वाऱ्याची धुळ येणार नाही
- पर्यायाने सिंथेटिक ट्रॅकचे लाईफ वाढेल
- पॅव्हेलियनसाठी पंधरा ते वीस कोटी रुपये मंजूर करा

# राज्य शालेय क्रीडा स्पर्धेची ठिकाणे जाहीर

## ● नागपूरला शुटींग, जिम्नॅस्टीक व सॉफ्टबॉल; धाराशिवला आट्यापाट्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**

क्रीडा व युवक सेवा खात्याचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षात होणाऱ्या राज्य शालेय क्रीडा स्पर्धेची ९२ खेळापैकी ५२ खेळांची ठिकाणे जाहीर केली आहेत. त्यात नागपूरला शुटींग, जिम्नॅस्टीक व सॉफ्टबॉल तर धाराशिवला आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.



राज्यातील सर्व जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या बैठकीत ही ठिकाणे निश्चित करण्यात आली. सिकई मार्शल आर्ट हा खेळ वगळता उर्वरित ९२ खेळ प्रकाराचे आयोजन करावे, असे ठरले. यातील प्रथम ४८ खेळानांच निधी मिळणार आहे. मिनी गोल्फ आष्टज-डू-आखाडा, जंप रोप व रस्सीखेच या खेळांना निधी मिळणार नाही. या खेळाच्या एकविध संघटनेच्या तांत्रिक व आर्थिक सहकार्याने या स्पर्धा आयोजित करण्याचे यावेळी ठरले.

**सोलापुरात एकाही स्पर्धेचे आयोजन नाही**

सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाचा कारभार सध्या जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, क्रीडाधिकारी नदीम शेख आणि मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्ता वरकड या तिघांवर चालू आहे. तीन तालुका क्रीडाधिकारी, दोन क्रीडाधिकारी, दोन क्रीडा मार्गदर्शक, एक वरिष्ठ व एक कनिष्ठ लिपीक अशी ९ पदे रिक्त आहे. स्टाफअभावी राज्य स्पर्धेचे आयोजन शक्य नाही. त्यामुळे सोलापुरने एकाही स्पर्धेच्या आयोजनाची मागणी केली नसल्याचे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी सांगितले.

### स्पर्धेचे क्रीडा प्रकार, स्थळ व वयोगट याप्रमाणे

धनुर्विद्या : यवतमाळ (१४ व १७ वर्षे), वाशिम (१९ वर्षे). ॲथलेटिक्स : रत्नागिरी (१४ वर्षे), पुणे (१७ व १९ वर्षे). बॅडमिंटन : अहिल्यानगर (१४ वर्षे), छत्रपती संभाजीनगर (१७ व १९ वर्षे). बॉल बॅडमिंटन : नांदेड (१४ वर्षे), सातारा (१७ व १९ वर्षे). बेसबॉल : अकोला (१४ वर्षे), अहिल्यानगर (१७ वर्षे), पालघर (१९ वर्षे). बास्केटबॉल : धुळे (१४ वर्षे), यवतमाळ (१७ व १९ वर्षे). बॉक्सिंग : रायगड (सर्व गट). कॅरम : कोल्हापूर (सर्व गट), बुद्धिबळ : सातारा (सर्व गट). क्रिकेट : नाशिक (१४ व १९ वर्षे), अहिल्यानगर (१७ वर्षे). लॉन टेनिस : लातूर (सर्व गट). डॉजबॉल : नांदेड (१४ वर्षे), रत्नागिरी (१७ वर्षे), बुलढाणा (१९ वर्षे), तलवारबाजी : नांदेड (१४ वर्षे), नाशिक (१७ वर्षे), छ. संभाजीनगर (१९ वर्षे). फुटबॉल : अमरावती (१४ वर्षे), यवतमाळ (१७ व १९ वर्षे). जिम्नॅस्टीक : नागपूर (सर्व गट), हॅंडबॉल : ठाणे (१४ वर्षे), रायगड (१७ व १९ वर्षे). हॉकी : अकोला (१४ वर्षे), पुणे (१७ व १९ वर्षे), ज्युदो : पुणे (सर्व गट). कबड्डी : रत्नागिरी (१४ मुले ), कोल्हापूर (१४ मुली), धुळे (१७ मुले), परभणी (१७ मुली), रायगड (१९ मुले), वाशिम (१९मुली). कराटे : पुणे (सर्व गट). खो-खो : नंदूरबार (१४ मुले), परभणी (१४ मुली), अहिल्यानगर (१७ वर्षे), रायगड (१९ वर्षे). किक बॉक्सिंग : गोंदिया (सर्व गट). सायकलिंग : अहिल्यानगर (सर्व गट). मल्लखांब : नांदेड (१४ वर्षे), लातूर (१७ वर्षे), सांगली (१९ वर्षे). नेटबॉल : अहिल्यानगर (१४ वर्षे), धुळे (१७ वर्षे), गोंदिया (१९ वर्षे). शुटींग : नागपूर (सर्व गट). रोलबॉल : नांदेड (१४ वर्षे), अहिल्यानगर (१७ व १९ वर्षे). रोलर स्केटिंग : मुंबई उपनगर (सर्व गट). रोलर हॉकी : मुंबई उपनगर (१९ वर्षे). शुटींगबॉल : नांदेड (१४ वर्षे), बुलढाणा (१७ वर्षे), अकोला (१९ वर्षे). सॉफ्टबॉल : मुंबई उपनगर (१४ वर्षे), गडचिरोली (१७ वर्षे), नागपूर (१९ वर्षे). स्क्वॅश : पुणे (सर्व गट). जलतरण व डायव्हिंग : लातूर (सर्व गट). वॉटरपोलो : लातूर (१९ वर्षे). टेबल टेनिस : परभणी (१४ वर्षे), रायगड (१७ वर्षे), रत्नागिरी (१९ वर्षे). तायक्वाँदो : छ. संभाजीनगर (सर्व गट). व्हॉलिबॉल : अकोला (१४ वर्षे), गोंदिया (१७ वर्षे), बीड (१९ मुले), सांगली (१९ मुली). वेटलिफ्टींग : नाशिक (सर्व गट). कुस्ती : सिंधुदुर्ग (१४ वर्षे), रायगड (१७ वर्षे), अहिल्यानगर (१९ वर्षे). वुशू व योगासन : छ. संभाजीनगर (सर्व गट). रग्बी : ठाणे (१४ वर्षे), अहिल्यानगर (१७ व १९ वर्षे). थ्रोबॉलः धुळे (सर्व गट). सेपक टकरा : लातूर (सर्व गट), मॉडर्न पेंटॅथलॉन : अहिल्यानगर (सर्व गट). सॉफ्ट टेनिस : पुणे (सर्व गट). टेनिक्वाईट : वाशिम (सर्व गट). आट्यापाट्या : धाराशिव (सर्व गट). सुब्रतो फुटबॉल व नेहरू हॉकी : पुणे (सर्व गट). मिनी गोल्फ आष्टे-डू-आखाडा : गडचिरोली व भंडारा (सर्व गट). जंप रोपः लातूर (सर्व गट). रस्सीखेच : नांदेड (सर्व गट).

# मंद्रूप क्रीडा संकुलाच्या सुविधांसाठी तीन कोटींचा निधी

### क्रीडा संकुल आता आणखीन सुसज्ज होणार : आ. सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै -**

दक्षिण तालुक्यातील मंद्रूप येथील क्रीडा संकुल आणखी अद्ययावत करण्यासाठी शासनाकडून तीन कोटी रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. या निधीच्या माध्यमातून येथे सोयी सुविधा होणार आहेत. हे क्रीडा संकुल आता आणखीन सुसज्ज होणार आहे. याचा खेळाडूंना फायदा होणार असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले.

राज्यातील प्रत्येक तालुक्यातील क्रीडा संकुलासाठी शासनाकडून सुरुवातीला एक कोटींचा निधी मंजूर होता. मात्र आता नविन शासन निर्णयानुसार तालुका क्रीडा संकुल योजना विकास निधी हा १ कोटीवरुन तब्बल ५ कोटी रुपये इतका करण्यात आला आहे. त्यानुसार दक्षिण तालुक्यास त्यातील ३ कोटी निधीची मान्यता शासनाकडून प्राप्त झाली आहे. यासाठी आमदार सुभाष देशमुख यांचा सततचा पाठपुरावा आणि प्रयत्नातून ३ कोटीचा निधी प्राप्त झाला आहे.



या निधीमधून ४०० मीटर धावन मार्ग, बॅडमिंटन हॉल, जिम्नॅशियम हॉल, मुला-मुलींचे वसतीगृह, बहुउद्देशीय हॉल, प्रेक्षक गॅलरी, ओव्हर हेड वॉटर टँक, अंडरग्राउंड वॉटर टँक, स्ट्रीट लाईट, फायर फायटिंग व्यवस्था, अंतर्गत रस्ते आदी कामे होणार आहेत. त्यामुळे मंद्रूप येथील क्रीडा संकुल आता अधिक सोयीसुविधायुक्त होणार आहे. याचा लाभ खेळाडू आणि नागरिकांना होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांचे सहकार्य लाभल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ८० कर्मचाऱ्यांनी केली ४ स्मशानभूमीची साफसफाई

## स्वच्छता मोहिमेत १९ टन कचरा संकलित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

शहरातील विविध चार स्मशानभूमीच्या विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये महापालिकेच्या ८० कर्मचाऱ्यांनी साफसफाई करून १९ टन कचरा संकलित केला. ३ जेसेबी व ३ डंपर या यंत्रणेचा वापर करीत येथील ही मोहीम फत्ते केली. शेळगी, मोदी स्मशानभूमी, अक्कलकोट नाका येथील नीलकंठ,पद्मशाली स्मशानभूमी व जुना कारंबा नाका या स्मशानभूमीमध्ये मोहिम राबविण्यात आली.

शहरात असलेल्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्काराच्या वेळी वापरण्यात आलेल्या साहित्य तसेच तेथील झाडामुळे निर्माण होणारा कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. यामुळे महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी दि.२९ जुलै २०२५ रोजी सोलापूर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.या स्वच्छता मोहिमेचा आज तिसरा दिवस होता.

दैनंदिन कचरा संकलना व्यतिरिक्त आज घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये एकूण १९ टन इतका कचरा संकलित करण्यात आला. ही मोहिम घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच विभागीय कार्यालयाकडील मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार,सफाई अधीक्षक अनिल चराटे यांच्या समन्वयाने राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये एकूण ८० सेवक ३ जेसेबी व ३ डंपर अशी यंत्रणा कार्यरत होती.

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज नं.८७/२०२५
नि.नं. ५

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि.साहेब यांचे कोर्टात
**मा. रेवती पी बागडे सो, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी**

**श्री. सुनिल नानासाहेब यादव,**
उ.वय-५१वर्षे, धंदा- शेती, रा. नांदणी ता. बार्शी जि. सोलापूर -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये**
**यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे**

यातील अर्जदार हे वर नमुद ठिकाणची कायमचे रहिवाशी आहेत. यातील अर्जदार यांची आई सत्यभामा नानासाहेब यादव या दि. २७/०२/२०२० रोजी मौजे नांदणी ता. बार्शी येथेच मयत झालेले आहेत. मयत सत्यभामा नानासाहेब यादव यांचे अर्जदार हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत सत्यभामा नानासाहेब यादव यांना अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नाही.

**त्याअर्थी,** वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत सत्यभामा नानासाहेब यादव यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २८/८/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.00 वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे /हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत सत्यभामा नानासाहेब यादव याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता. २३/७/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर** **बार्शी**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ८६/२०२५
निशाणा नं. ५

### बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डी. सो यांचे कोर्टात
**मे. H.U.U पाटील कोर्ट**

**१) नवनाथ भिमाशंकर घोंगडे**
वय-६६ वर्षे, धंदा-शेती
रा. सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी जि.सोलापूर.
**२) सोमनाथ भिमाशंकर घोंगडे**
वय-६९ वर्षे, धंदा-शेती रा.सदर.
**३) पार्वती शिवाजी साखरे**
वय - ७९ वर्षे, धंदा-शेती रा.सदर. — **अर्जदार**
विरुद्ध
**कोणी नाही**

**अर्ज-भारतीय पुरावा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे**

ज्या अर्थी यातील अर्जदार नं १ ते ३ यांना मयत बहिण काशीबाई हनुमंत वैद्य (लग्नापूर्वीचे नाव काशीबाई भिमाशंकर घोंगडे) ह्या असून, काशीबाई हनुमंत वैद्य ह्या दि. २०/१०/२०२४ रोजी शैलजा हॉस्पिटल बार्शी येथे मयत झालेल्या आहेत. त्यांचे पश्चात त्यांचे पती नामे हनुमंत नीलकंठ वैद्य हे देखील दि. १७/१२/२०२३ रोजी मयत झाले आहेत. यातील मयत नामे काशीबाई हनुमंत वैद्य (लग्नापूर्वीचे नाव काशीबाई भिमाशंकर घोंगडे) यांचे त्यांच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी शाखा अधिकारी यांनी अर्जदार नं १ ते ३ यांना वारसप्रमाण पत्र आणायला सांगितल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमलेले तारखेस ३०/९/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील. दि. २४/०७/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं ३५/२०२५

### अक्कलकोट येथील मे. सिव्हिल जज्ञ साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात

**गुंडप्पा निंगप्पा पुजारी** -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी रा. बोरोटी बु., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ही मौजे बोरोटी बुद्रुक येथे दि. ०३/०९/२०२१ रोजी मयत झाली आहे. कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी यांच्या नांवे मोजे बोरोटी बु. येथे घरकुल बांधकाम करण्याकरीता महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मंजूरी क्रमांक १२३८२७१९५ या आदेशाने रक्कम रु.१,५८,७३०/- इतके अनुदान मंजूर झाले आहे. कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी यांच्या नांवे जमा असलेली अनुदान रक्कम गुंडप्पा निंगप्पा पुजारी, महादेवी भिमाशंकर चोड्याळ, मायव्वा सिध्दण्णा पुजारी यांना मिळणेकरीता व कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी यांचे गुंडप्पा निंगप्पा पुजारी, महादेवी भिमाशंकर चौड्याळ, मायव्वा सिध्दण्णा पुजारी हेचा कायदेशीर वारसदार असल्याचा वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केले आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत, कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी यांचा मृत्यू अथवा अर्जदार हे वारस नाहीत असे कोणाची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठार्थ अथवा विरुध्द कोणाचे कांही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. २२/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे कै. कस्तुराबाई निंगप्पा पुजारी यांचे वारस सर्टिफिकेट देण्यात येईल.

ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली. ता. १९/०७/२०२५.

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय** **अक्कलकोट**

---

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१
**जनता सहकारी बँक लि, कुर्डुवाडी** -- **अर्जदार**
**विरूध्द**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ०८/२०२५-२६ | २१९६६७/- | १<br>२ | **विलास नामदेव भिसे** रा.दास प्लॉट, एसटी स्टेंड पाठीमागे, कुर्डूवाडी<br>**सय्यद हसन नजीर इनामदार** रा.रेल्वे पोलीस लाईन, जेऊर, कुर्डूवाडी, |
| २ | ०७/२०२५-२६ | ३१८०७/- | २<br>३ | **सचिन राहुल वाळके** रा.गिता नगर, गिताबाईचा मळा, कुर्डुवाडी<br>**गणेश सुभाष लोखंडे** रा.जिजाऊ नगर, माढा रोड, कुर्डुवाडी |
| ३ | ०६/२०२५-२६ | ८१९५६/- | १ | **महावीर रविंद्र शहा** रा.तात्या पार्क, ओम टॉवर्स होटगी रोड, मजरेवाडी उत्तर सोलापूर |

कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे माडंण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. १२/०८/२०२५ रोजी दुपारी १२.00 वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.२९/०७/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**शिक्का** | **सही/-** **उपनिबंधक,** **सहकारी संस्था (परसेवा)** **सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को. ऑप. असोसिएशन लि, सोलापूर**

---

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (आयडीएफसी बँक लिमिटेडसह एकत्रित आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे रद्द केली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरईबीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात विशेषतः वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 148072685 | मालमत्तेवर कर्ज | १. अंजिनाथ दत्तू खरात<br>२. अपर्णा अंजिनाथ खरात | 05/07/2025 | रुपये 8,60,635.18/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायतीचे सर्व भाग आणि पार्सल मिलकट क्रमांक ७९८, एकूण प्रवेश क्षेत्र १९०० चौरस फूट, गाव येथे स्थितः कोरडावी ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोंडावी, तालुका माळशिनास, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि पूर्वेकडेः रस्ता पश्चिमेकडेः स्वतः उघडे क्षेत्र उत्तरः शंकर सारगर दक्षिणः गोठे | | | | | |
| 2 | 144957256 | मालमत्तेवर कर्ज | १. अमोल लालसो माने<br>२. सुनिता लालसो माने | 29/01/2025 | रुपये 10,70,857.98/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** सोलापूर येथील प्रॉपर्टीमधील ऑल दॅट पीस अँड पार्सल, उपविभाग माळशिरस, ग्रामपंचायत कोंडबेवच्या अंतर्गत, ग्रामपंचायत मिल्केट क्रमांक २६९ चे बेअरिंग, एकूण १५०० चौरस फूट क्षेत्रफळ, यादव वस्ती, सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि, पूर्वेकडील सीमाः प्राथमिक शाळा पश्चिमः लखन | | | | | |
| 3 | 112399523 | मालमत्तेवर कर्ज | १. बाळू अभिमान वाघमोडे<br>२. फुलाबाई सूर्यकांत बनजागोळे | 05/07/2025 | रुपये 5,34,142.14/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** जीपी मिकत क्रमांक ३७२, क्षेत्र २३०० चौ. फ्ल., बिल्ट-अप क्षेत्र १३०० चौ. फूट मौजे येथे स्थितः बॅडस्लेक्सियाडी, जी.पी. निमगाव (टीई) च्या हद्दीत बडालेवाडी, तालुकाः मधे, जिल्हाः सोलापूर महामशीर-४१३२'१०, आणि पूर्वेकडील सीमाः रूड पश्चिमः स्व-क्षेत्र उत्तरः दलासाहेब येल साउथ रोड | | | | | |
| 4 | 121386343 | मालमत्तेवर कर्ज | १. बालाजी जनार्दन वाघमोडे<br>२. दिलीप बालाजी वाघमोडे | 05/07/2025 | रुपये 05,38,771.28/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** ऑल दॅट पिस्क आणि पार्कल ऑफ कन्स्ट्रक्शन प्रॉपर्टी बेअरिंग जीपी मिल्कट नंबर १६२. एकूण क्षेत्रफळ २०५० चौ. Ft., Sitauted :निमगाव (ढए) बदालेवाड, तालुकाः माढा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१०, आणि Bounded as: Easi: Uinbrav Nivrutti Sarak West: Road North: Navnath Vithoba Sarak South: Road | | | | | |
| 5 | 156364205 | मालमत्तेवर कर्ज | १. बापू नागू नलवडे<br>२. शितल बापू नवलडे | 05/07/2025 | रुपये 8,96,183.79/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिकत क्रमांक ७९९, एकूण क्षेत्रफळ १८०० चौरस मीटर, चाकोर गाव येथे स्थित, चाकोर ग्रामपंचायत चाकोरच्या हद्दीत, उपविभाग मालशिनास विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि पूर्वेकडीलः रस्ता पश्चिमेकडीलः रस्ता दक्षिणेकडीलः सचिन डोल्फोडे यांचे घर उत्तरः खुले क्षेत्र | | | | | |
| 6 | 121427477 | मालमत्तेवर कर्ज | १. गणेश दादा सारक<br>२. शितल गणेश सारक | 09/04/2025 | रुपये 5,20,353.72/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायतीचा सर्व तुकडा आणि पार्सल मिलकट क्रमांक १६७, टोलाल ॲडमेझरिंग एरिया १७५० चौ. फूट, बिल्ट-अप एरिया ७२० चौ. फूट, निमगाव (टीई) बडालेवाडी येथे स्थित, ता.: माढा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१०, आणि पूर्वेकडेः दात्रे लॉर्डे वेस्टः सोमनाथ सरक उत्तरः रस्ता दक्षिणः उंबामो सरक | | | | | |
| 7 | 115546774 | मालमत्तेवर कर्ज | १. महिंद्रा गोरख जाधव<br>२. सुजाता महिंद्रा जाधव | 05/07/2025 | रुपये 5,35,968.73/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** सर्व बांधकाम जागा आणि पार्सल मालमत्ता ग्रामपंचायत मिकत क्रमांक १५५. क्षेत्रफळ १४३२ चौ. फूट मुंगी बांधलेले क्षेत्रफळ ४३२ चौ. फूट, कोंडसबावी येथे स्थित, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमाः पूर्वः भरत श्रीरंग फडतेरे पश्चिमः रस्ता उत्तरः रस्ता दक्षिणः खुला क्षेत्र | | | | | |
| 8 | 152696550 | मालमत्तेवर कर्ज | १. सागर तुकाराम कदम<br>२. किसाबाई तुकाराम कदम | 05/07/2025 | रुपये 8,54,995.09/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिल्कल क्रमांक ३१८, तोलाल ॲडमेझरिंग एरिया १८०० चौरस फेस्टचा ऑल दॅट पीस अँड पार्सल. ग्रामपंचायत कोंडबावीच्या हद्दीत स्थित, उपविभाग माळशिरस, विभागः सोलापूर महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमाः पूर्वः खुला क्षेत्र पश्चिमः रस्ता उत्तरः गोरख कदम दक्षिणः बलभीम कदम (घर) | | | | | |
| 9 | 158225494 | मालमत्तेवर कर्ज | १. सुधीर जालिंदर माने<br>२. सुरेखा माने | 30/06/2025 | रुपये 7,62,710.75/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ५८४ चा सर्व तुकडा आणि पार्सल. टोलाल ॲड्रिसॅरिंग क्षेत्र १६५० चौ. फूट. ग्रामपंचायत चाकोरच्या हद्दीत स्थित, उपविभागः माळशिरस, विभागः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१ आणि सीमाः पूर्वः रस्ता पश्चिमः खुला क्षेत्र दक्षिण गायगोठा उत्तरः स्वाती माने | | | | | |
| 10 | 150743833 | मालमत्तेवर कर्ज | १. सुनिल फंची माने<br>२. जया माने | 09/04/2025 | रुपये 8,74,803.96/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक २२४ चा संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण १९०० चौरस फूट, ग्राम पंचायतीच्या हद्दीत स्थितः कोंडाबावी, ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि सीमाः पूर्वः साहेबराव माने (घर) पश्चिमः रस्ता उत्तरः रस्ता दक्षिणः चांदर मारे (घर) | | | | | |

वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशीलांनुसार, त्यांच्या संबंधित डेल्स आणि इतर खर्चातून करारबद्ध व्याजदरासह आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (इर्सटव्हिल कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांना रक्कम देण्याचे आवाहन केले जाते. या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत शुल्क इत्यादी आकारले जाऊ शकतात, अन्यथा खालील स्वाक्षरीदारांना डठ्रऋएडख कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, वर उल्लेख केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) ची देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : ३०/०७/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

---

## उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १. सोलापूर यांचे कार्यालय

**पत्ता- सिध्देश्वर पेठ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर**
**संकलन-भूसंपादन**

दूरध्वनी क्रमांक- ०२१७२७३१००९ Email ID-ssolapur1.rfsol-mhgov.in

**जा.क्र.२०२४/उविअक्र. १/ भूसंपादन/एस.आर. १७/२०२४/कादि-१९४** **सोलापूर दिनांक- २१/०७/२०२५**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डीव्हिजन व सब डीव्हीजन मौजे ताडर्सीदणे, ता. बाशी येथील खालील अनुसुचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीन धारकाच्या जमीनी मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे नावे जलसंपदा विभागाचे प्राधिकृत प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सोलापूर यांनी ल. पा. तलाब बाभुळगाव प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याच्या कामाकरिता मौजे ताडसींदणे, येथील आवश्यक जमिनी महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागांकडील निर्णय क्र. संकिर्ण/०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२/०५/२०१५ व शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ अन्वये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणे प्रस्तावित आहे.

खालील अनुसूचीमध्ये संबंधित जमिन मालकाचे नांव, गट नंबर, संपादित क्षेत्र इ. तपशील दिला आहे. सदर जमिनीबाबत जमिन मालकाच्या हिस्स्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपुत्र, वारसा हक्क, गहाण, दान, बोजा व आकी, लिज, कर्ज, बक्षिस पत्र, जप्ती करारमदार इतर हक्क असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार या कार्यालयास कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते ५.३० वा. पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेद व निजोखमी असल्याचे समजुन इकडील कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे वतीने मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली समितीने मंजूर केलेल्या दरानुसार मुदतीनंतर केव्हाही उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, तालुका बार्शी यांचेकडुन प्राप्त झालेल्या संयुक्त मोजणी नकाशे व प्रत्यक्ष मोजमापानुसार येणाऱ्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल, दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपर्यु नोटीस दिली.

### परिशिष्ट-अ
### कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १. सोलापूर

एस.आर. १७/२०२४, गाव ताडसर्सीदणे, तालुका बार्शी, जिल्हा- सोलापूर
प्रयोजन- ल. पा. तलाव बाभुळगांव प्रकल्पाच्या डाव्या मुख्य कालव्याच्या कामासाठी संपादनाखालील बाधित शेतकऱ्यांची यादी-

| अ. क्र. | भुधारकाचे नांव | गावाचे नांव | गट क्र. | भुधारणा पध्दती | गाव नमुना नं.७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र हे. आर | खरेदी करावया चे क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती कौशल्या गजेंद्र गायकवाड व इतर १ | ताडसौंदणे | ६० | जिरायत | १.५९ | ०.०२ |
| २ | श्रीमती मंदाकिनी माणिकराव सातपुते | ताडसौंदणे | ६१ | जिरायत | १.५९ | ०.०२ |
| ३ | श्री. लक्ष्मण रघुनाथ सातपुते व इतर ६ | ताडसौंदणे | ६२ | जिरायत | ४.१० | ०.०२५ |
| | **एकुण** | | | | | **०.०६५** |

**ठिकाण : सोलापूर**
**दिनांक : २१/०७/२०२५**

**शिक्का** | **सही/-** **(सदाशिव पडदुणे)** **उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १. सोलापूर**

**जिमाका/सो/जाहि/७७/२०२५-२६**

---

## दर्शनासाठी मंदिरात गेलेल्या वृध्दाला माकडाचा चावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या ६५ वर्षीय वृध्दाला माकडाने चावा घेतला. हा प्रकार सांगोला येथे २८ रोजी सकाळी ११ वाजता घडला.

दशरथ भिमराव सूर्यवंशी (वय ६५, रा. सांगोला) असे माकडाने चावा घेतलेल्या वृध्दाचे नाव आहे. दशरथ हे सोमवारी सकाळी अकराच्या सांगोला शिवारातील अंबिका मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे आलेल्या माकडाने त्यांच्या डाव्या हाताला चावा घेतला. सांगोला येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन मंगळवारी दुपारी ४.३५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज नं.३७/२०२५

### अक्कलकोट येथील मे. सिव्हिल जज्ञ साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात

**कमलाबाई टाकण्णा मिरजे वगैरे** -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी के. टाकण्णा नागप्पा मिरजे रा. गौडगांव खु., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर हे दिनांक १७/०१/२०२५ रोजी मयत झाले आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा अक्कलकोट येथील कै. टाकण्णा नागप्पा मिरजे यांचे प्रधान मंत्री सुरक्षा बिमा योजना अंतर्गत रक्कम रु.२,००,०००/- चे प्रकरण मंजूरी करीता स्टेट बँक ऑफ इंडिया च्या वरिष्ठ कार्यालयात सक्सेशन सर्टिफिकेट दाखल करणेकरीता अर्जदारांना टाकण्णा नागप्पा मिरजे यांचे वारस म्हणून मिळणेचा कायदेशीर हक्क आहे. कमलाबाई टाकण्णा मिरजे, नागेश टाकण्णा मिरजे, आरती बसवराज बाके, शिवराज टाकण्णा मिरजे हे वारसदार असल्याचा वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केले आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत, के टाकण्णा नागप्पा मिरजे यांचा मृत्यू अथवा अर्जदार हे वारस नाहीत असे कोणाची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठार्थ अथवा विरुध्द कोणाचे कांही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. २२/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे टाकण्णा नागप्पा मिरजे यांचे वारस सर्टिफिकेट देण्यात येईल.

ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता. १९/०७/२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय** **अक्कलकोट**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.३९/२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश साो, कनिष्ठ स्तर (मे. कल्याणकर) यांचे कोर्टात

**अमीन लायकअली नदाफ** वय-४० वर्षे, धंदा-मजुरी,
रा. घोळसगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. मयत लैला राजेभाई नदाफ यांचे दि.२४/०३/२०२० रोजी मौजे घोळसगांव येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. तसेच लैला राजेभाई नदाफ हिचे चाँद मौला नदाफ यांच्याशी विवाह झाले होते. पुढे त्यांचा घटस्फोट झाला. तद्नंतर लैला राजेभाई नदाफ ही पुनर्विवाह केला नाही. त्यामुळे तिला मूलबाळ होणे शक्य नव्हते. त्यामुळे लैला राजेभाई नदाफ हिने आपला भाऊ नाने लायकअली राजेभाई नदाफ यांचा मुलगा नामे अमीन लायकअली नदाफ यास दि. १९/०७/२००१ रोजी नोंदणीकृत दत्तकपत्र दस्त क्र. २३५१ अन्वये दत्तक घेतली आहे. सदर दत्तकपत्राप्रमाणे सदर दत्तकाचे म्हणजेच यातील अर्जदार यास सर्व अधिकारास व जबाबदाऱ्यास आपल्या दत्तक कुटूंबियामध्ये अवरस पुत्राप्रमाणे सर्व हक्कास लायक आहे. तसेच दत्तकपत्रामध्ये पृष्ठ क्र. ७ वर असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, 'अमीन' हेच ठेवीत आहेत व सदर दत्तक घेतलेल्या मुलांचे यापुढे ही अमीन लायकअली नदाफ हेच नांव राहील.

मयत लैला राजेभाई नदाफ यांना यातील अर्जदार यांचेशिवाय दुसरा कायदेशीर वारस किंवा प्रतिनिधी नाही. वरील सर्व अर्जदार हे मृत व्यक्तीचे वर्ग-१ कायदेशीर वारस आहेत.

त्यामुळे अर्जदार यांनी मे. न्यायालयाकडून वारसाप्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेली तारीख ०४/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर रहावे, तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची काही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

ही जाहीर प्रसिध्दीकरण माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी दिली असे दिनांक २९/०७/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय,** **अक्कलकोट**



## उंच उंच माझा झोका...

**सोलापूर : नागपंचमीनिमित्त शहरात विविध ठिकाणी महिलांसाठी झोका बांधण्यात आला आहे. महिलांनी या झोक्याचा आनंद लुटण्यासाठी गर्दी केली होती.**

# मतदान यंत्र तपासणीत २६ बॅलेट युनिट निघाले नादुरुस्त

### आता कंट्रोल युनिटची करणार तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

गेल्या दहा दिवसात महापालिकेतील बॅलेट युनिट तपासण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तज्ञांच्या या तपासणीत मात्र २६ बॅलेट युनिट्स हे नादरूस्त असल्याचे आढळून आले आहे.यानंतर आता नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांकडून कंट्रोल युनिट तपासण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अपालिका प्रशासनाकडून त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट या मतदान यंत्राची प्राथमिक स्तरावरील तपासणीला दि. १९ जुलैपासून प्रारंभ करण्यात आला. गेल्या दहा दिवसात बॅलेट युनिट तपासण्याची प्रक्रिया सोमवारी



पूर्ण झाली. तज्ञांच्या या तपासणीत मात्र २६ बॅलेट युनिट्स हे नादरूस्त असल्याचे आढळून आले आहे. यानंतर आता नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांकडून कंट्रोल युनिट तपासण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. येत्या आठ दिवसात ही प्रक्रिया देखील पूर्ण होणार असल्याचे सांगण्यात आले. मतदान यंत्र तपासणीत नादुरुस्त आढळून आलेल्या बॅलेट युनिटची सविस्तर माहिती आणि पुढील कंट्रोल युनिट तपासणीत आढळणाऱ्या यंत्रांची माहिती पुढील आठवड्यात राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केली जाणार आहे. नादुरुस्ती यंत्रे तपासणी पथकाने बाजूला काढली असून यावर पुढील आदेशानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तयारी पूर्ण करण्याच्या अनुषंगाने लगबग सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयुक्तांनी दि. ११ जुलै २०२५ रोजी घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीत दिलेल्या आदेशानुसार महापालिका प्रशासनाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. याच आदेशानुसार महापालिकेतील उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी सुरू करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी करुन घेण्यात येत आहे. त्यानुसार महापालिकेचे नियुक्त अधिकारी-कर्मचारी तसेच प्रशासनाने मतदान यंत्राच्या तपासणीसाठी नियुक्त केलेले १२ मास्टर ट्रेनर यांच्याकडून महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या २२८४ बॅलेट युनिट्स आणि १२१८ कंट्रोल युनिट्स यंत्रांची तपासणी करण्यात येत आहे. महापालिका आयुक्तांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये उपलब्ध मतदान यंत्राचा आढावाही घेतला असून त्याचा अहवाल देखील महापालिका प्रशासनाकडून पाठविण्यात आला आहे. महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या नियंत्रणाखाली ही कार्यवाही करण्यात येत आहे.

> **निवडणूक आयोगाला अहवाल सादर करण्यात येणार**
> महापालिका कौन्सिल हॉल स्ट्राँगरूमम धील तपासणीत आढळलेले नादुरुस्त यंत्र वेगळे केले जात असल्याने त्यानुसार आणखी किती यंत्र लागणार याचा आढावाही घेतला जाणार असून त्याचा अहवालही निवडणूक आयोगाला सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# ५२५ मोटार सायकलचे मॉडीफाईड सायलेन्सवर फिरवले रोड रोलर

### शहर वाहतूक शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

सोलापूर शहर वाहतूक शाखेने गेल्या काही दिवसामध्ये कारवाई करून जप्त केलेल्या ५२५ मोटारसायकलींच्या मॉडीफाईड सायलेन्सरवर रोड रोलर फिरवून ती निकामी करण्यात आली.

सोलापूर शहरात काही वाहन चालक हे वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन बुलेट अथवा इतर दुचाकी वाहनास कर्कश आवाज करणारे मॉडीफाय सायलेंन्सर बसविणेचे प्रकारामध्ये वाढ झालेली होती. अशा मॉडीफाय सायलेंन्सरच्या कर्कश आवाजामुळे जेष्ठ नागरीक, महिला, हॉस्पीटलमधील रुग्ण व शांतता प्रिय नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने अशा मॉडीफाय सायलेंन्सर बसविलेले वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करुन ही अशा वाहन चालकाकडून कारवाईस न जुमानता सायलेंन्सर वापर सुरुच असल्याने अशा कृत्यास प्रभावीपणे आळा घालण्यासाठी दुचाकी वाहनांचे मॉडीफाय सायलेंन्सर काढून घेण्याची कारवाई करण्यात आलेली होती. १ जानेवारी ते १७ एप्रिल २०२५ रोजी पर्यंत शहर वाहतूक शाखा दक्षिण विभागाकडून ४१० व उत्तर विभागाकडून ११५ असे एकूण ५२५ काढून घेण्यात आलेले मॉडीफाय सायलेंन्सर जप्त करण्यात आले होते. शहर वाहतूक शाखेने जप्त केलेल्या मॉडीफाय सायलेंन्सर रोलर फिरवून निरोपयोगी करण्यात आलेले आहेत.

# भगवान चिम्मटेश्वर यांचा रथोत्सव जल्लोषात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

पूर्व भागातील तेलुगू भाषिक नाभिक समाजातर्फे कुलदैवत चिम्मटेश्वर यांचा रथोत्सव नागपंचमी रोजी मोठ्या भक्तीभावात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

कन्ना चौक नजीकच्या हनुमान मंदिर येथून चिम्मटेश्वर रथ मिरवणुकीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी माजी आ. शिवशरण पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय दासरी, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, अमोल शिंदे, विनायक कोंड्याल आदींची प्रमुख उपस्थिती होती. मिरवणुकीत एका सजविलेल्या वाहनावर भगवान चिम्मटेश्वर यांची मूर्ती ठेवण्यात आली होती. मिरवणुकीत टिपरी, नृत्य आदी मंडळे सहभागी झाली होती. यामध्ये विजेता डान्स अकॅडमी, आर्या टू डान्स ग्रुप, फ्रेंड्स डान्स ग्रुप, चिमटेश्वर ग्रुप्स आदी मंडळी तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. फिल्मी गाण्यांवर तरुणाई थिरकत होती. औद्योगिक बँक, जोडबसवण्णा



चौक, पद्मशाली चौक, दत्तनगर, अशोक चौक, आम्रपाली चौक, वालचंद कॉलेज रोड, साईबाबा चौकमार्गे भगवान चिम्मटेश्वर मंदिराजवळ मिरवणुकीचा समारोप झाला. दरम्यान भगवान चिम्मटेश्वर मंदिरात पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. पहाटेपासूनच समाज बांधवांची दर्शनासाठी रीघ लागली होती. मिरवणूक मंदिराजवळ आल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. दरम्यान विणकर बगीचा येथे सिंगराल परिवारातर्फे भक्तांना प्रसाद देण्यात आला. यावेळी सोलापूर तेलुगू नाभिक ज्ञाती संस्थेचे ट्रस्टी अध्यक्ष चंद्रमौली तमनूर, समाज अध्यक्ष अनिल कोंडूर, युवक संघटना अध्यक्ष भास्कर तमुनूर, उत्सव समिती अध्यक्ष राजेश तमनूर, रामलू जम्पल, विठ्ठल सिंगराल, आनंद सिंगराल, अभय कुमार क्रांती, आनंद सिंगराल, गोपाल नडीगोटू, ओमप्रकाश सुरमपल्ली, अंजय्या जंपाल, प्रकाश शिंदे, पांडुरंग चौधरी आदी उपस्थित होते. तेलुगु भाषिक नाभिक शिवाय मराठी आणि कन्नड भाषिक बांधव सुद्धा मरवणुकीत सहभागी झाले होते.

उत्सव यशस्वी करण्यासाठी विक्रम जंपाल, सतीश दुब्बका, पुंडलिक रासुमल, संजय कोंडूर, राजू रासकोंडा, अंबादास सामल, चंद्रकांत खोंडूर, श्रीनिवास वल्लोजी, भास्कर बोदुल आणि युवक संघटना, समाज पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**सोलापूर : श्रावणातील पहिल्या मंगळवारी नववधूंनी पिंडीची पूजा करत मंगळागौरी मोठ्या उत्साहाने साजरी केली. दक्षिण कसबा परिसरात टिपलेले छायाचित्र.**

## तोल जाऊन पडला

**सोलापूर :** घरावरील पत्र्यावर दारुच्या नशेत चढलेला तरुण तोल जाऊन खाली पडून जखमी झाला. ही घटला तालुका पोलीस ठाण्यामागील डॉ. आंबेडकर नगरात सोमवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. विष्णु धर्मा नडखांबे (वय ३५) असे पत्र्यावरून पडलेलया व्यक्तीचे नाव आहे. सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## आरएएफ फौर्सकडून संचलन...

**सोलापूर : आगामी सण-उत्सव व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रॅपिड ॲक्शन फोर्स (आरएएफ) कडून बोरामणी येथे संचलन करण्यात आले.**



# लक्ष्मी समर्थ मंदिर प्रांगणात ऊंच माझा झोका गं...

### माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या हस्ते उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

नागपंचमीनिमित्त प्रभाग क्रमांक २६ मधील उद्धव नगर भाग एक येथे श्री लक्ष्मी समर्थ मंदिर प्रांगणात झोका बांधण्यात आला आहे. नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. परिसरातील महिलांनी या झोक्याचा आनंद लुटला.

महिलांचा महत्त्वकांक्षी व आनंदाचा क्षण म्हणजेच नागपंचमी सण आहे. यानिमित्ताने प्रत्येक घरात नागोबाची पूजा करून आदल्या दिवशी भावासाठी उपवास केला जातो. नागपंचमी सणादिवशी नागोबा व वारूळाची पूजा केली जाते. यानिमित्ताने येथील प्रांगणात पिंगा, फुगडी खेळून, फेर धरून गाणी म्हणत महिलांनी झोक्याचा आनंद लुटला. यावेळी नगरसेविका चव्हाण, प्राप्ती अलकुंटे, लक्ष्मी समर्थ ग्रुपच्या ज्योतीताई अलकुंटे, योग शिक्षिका स्वाती शिंदे, अर्चना अचलेर, अनिता माने, पुजारी काकू, व श्री लक्ष्मी समर्थ ग्रुपमधील सर्व सेवेकरी महिलावर्ग उपस्थित होत्या.






# नेदरलँडच्या जॉन ड्यूईंगचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**• 'इट्स व्हेरी नाईस अँड व्हेरी टेस्टी फुड' असे म्हणत महाप्रसादाचा घेतला आस्वाद**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ जुलै-**

अभ्यास दौऱ्यासाठी आलेल्या नेदरलँड येथील जॉन ड्युईंग यांनी स्वामींचरणी लीन होऊन येथील अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेतला व तोंडभरून कौतुकही केले.

यावेळी त्यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते



कृपावस्त्र व स्वामींची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसादगृहात जॉन ड्युईंग यांनी आपल्या भारतीय सहकाऱ्यांसमवेत महाप्रसाद घेतला. श्रावणी शनिवार निमीत्त अन्नछत्र मंडळात खीर, भाजी, आमटी, चपाती, भात व मठ्ठारुपी प्रसाद ठेवण्यात आला होता. यावेळी नेदरलँडच्या या भक्ताने मोठ्या आवडीने या पदार्थांवर ताव मारला व उपस्थित असलेल्या भारतीय भक्तांना येथील अन्नपदार्थांचे कौतुकही सांगितले. आमच्या देशातील पदार्थांपेक्षा भारतीय पदार्थांची चवच वेगळी असून स्वामींच्या दरबारात घेतलेल्या हा महाप्रसाद मी आयुष्यात कधीही विसरणार नसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखालील अन्नछत्र मंडळाचे कार्य पाहून भारावलो आहे. इट्स व्हेरी नाईस अँड व्हेरी टेस्टी फुड अशी भावना ड्युईंग यांनी व्यक्त केली. यावेळी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील अभियंता गणेश पाटकर, जयश्री सोलंकी, अरुण सोलंकी, चपळगावचे सामाजिक कार्यकर्ते सिद्धाराम भंडारकवठे, गणपती कोळी, रविकांत कोरे आदी उपस्थित होते.

# द्वारकानगर येथील पाईपलाईनची दुरूस्ती

### माजी नगरसेविका राजश्री चव्हाणांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जुलै-**

प्रभाग क्रमांक २६ मधील द्वारकानगर येथे पाण्याची पाईपलाईन फुटल्याने चिखलाचे साम्राज्य पसरले होते. माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या पुढाकारातून येथील पाईपलाईनची दुरूस्ती करण्यात आल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

जुळे सोलापूर येथील जाधव मेजर, देशमुख सर, सेवा निवृत्त पोलीस ए.एस.आय.भासगी यांनी याबाबत तक्रार दिली होती. त्याची दखल घेत माजी नगरसेविका चव्हाण यांनी महापालिकेत पाठपुरावा करून दुरूस्तीचे काम करून घेतले. पाण्याची पाईपलाईन फुटल्यामुळे नगरामध्ये रस्ता चिखलमय झाला होता. दुरूस्ती केल्याने गळती थांबली आहे. येथे गेल्या कित्येक दिवसापासून एलईडी लाईट बंद असलेबाबतही निवेदन दिले होते. त्याची दखल घेत चव्हाण यांनी पाहणी करून संबंधित विभागातील अधिकारी यांना काम करून घेणे बाबत सूचना दिल्या होत्या. त्याची दखल घेऊन गेल्या कित्येक



दिवसापासून बंद पडलेला एलईडी बल्ब चालू करण्यात आला. तसेच सदर नगरात उद्या व परवा दिवशी मुरूम टाकून रस्ता दुरुस्त करून घेणार असल्याचे माजी नगरसेविका चव्हाण यांनी सांगितले.

## मुलाला बसला विजेचा धक्का

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

विद्युत डेपोजवळ खेळत असताना १२ वर्षाच्या मुलाला विजेचा धक्का लागला. हा प्रकार भिमानगर येथे सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडला.

अमोल धनंजय सावळे (वय १२, रा. सुशिल नगर, भारती विद्यापीठ) असे विजेचा धक्का लागलेल्या मुलाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारस अमोल हा भिमानगरातील विद्युत डेपोजवळ खेळत होता. त्यावेळी त्याच्या हाताला विजेचा धक्का लागल्याने त्यास आई मिनाक्षी यांनी सायंकाळी सातच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# चाटला पैठणीच्या आषाढम् सेलला महिलांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जुलै-**

केवळ सोलापूरातील नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातल्या महिला चाटला पैठणीच्या आषाढम् सेलचे प्रतिक्षा करत असतात. इतका विश्वास व प्रेमाचे स्थान चाटला पैठणीच्या आषाढम् सेलने निर्माण केला आहे या सेलचे वैशिष्टय म्हणजे सर्वोत्कृष्ठ फ्रेश साड्या जसे बनारस शालू, कंचीवरम्, रेशमी शालू, डिझाईनर वर्क साड्या, खरेदी करायला भाग पाडणारी भरजरी पैठणी, लेटेस्ट कॉटन साड्या, प्रिंटेड सिंथेटिक्क साड्या इ. विविध प्रकारच्या साड्या या सेलमध्ये ग्राहकांना ५० टक्के पर्यंत सूटमध्ये मिळत असतात.



दरवर्षी दसरा, दिवाळीसाठी आम्ही फ्रेश साड्याचा स्टॉक करतो ग्राहकांना प्रत्येक वेळेस खरेदीला एक नवा पॅटर्न देता यावा व देशातील लेटेस्ट फॅशनच्या साड्या त्यांना मिळाव्यात या भावनेने आम्ही प्रत्येक वर्षी आषाढ महिन्याच्या मुहूर्तावर हा सेल आयोजित करतो. जरी ५० टक्के पर्यंत सूट असला तरी साड्याचा दर्जा मात्र सर्वोत्कृष्ठ असतो. त्यामुळे महिलांच्या प्रचंड प्रतिसाद दरवर्षी या सेलला लाभतो आहे. चाटला पैठणीच्या आषाढम् सेलने महिला वर्गात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. आमचे आषाढम् सेल महिलामध्ये एवढे लोकप्रिय झाले आहे याचा मला अभिमान वाटतो असे व्यंकटेश चाटला यांनी सांगितले व आषाढम सेलला या वर्षीही महिलांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे असे चाटला पैठणीचे लक्ष्मीकांत व चंद्रकांत चाटला म्हणतात. एकाच वेळी प्रचंड गर्दीमुळे ग्राहकांना खरेदीचा आनंद घेता येत नाही त्यामुळे ग्राहकांनी सकाळी १०.३० ते सायंकाळी ७.३० पर्यंत खरेदीस येऊन गैरसोय टाळावी असे नम्र आवाहन याप्रसंगी केले

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)